# श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय, पिपरी -वर्धा

# COMMUNITY DEVELOPMENT AND EXTENSION

## B.A.(R.S.) - SEMESTER - I

सामुदायिक विकास व विस्तार

बी . ए. (आर. एस.) प्रथम सत्र

अभ्यासक्रम

घटक – १ पान क्र.१ ते १८

१. सामुदायिक विकास - अर्थ, व्याख्या आणि उद्देश

२. सामुदायिक विकास - तत्वज्ञान व तत्वे

३. सामुदायिक विकासाची ऐतिहासिक पार्श्वभूमी - गांधीजींचा ग्रामीण पुनर्रचना प्रकल्प (सेवाग्राम प्रकल्प)

४. सामुदायिक विकासाची प्रक्रिया

घटक -२ पान क्र.१९ ते ४०

१. सामुदायिक संघटना - अर्थ, उद्देश आणि कार्ये

२. समाज शिक्षण - अर्थ, व्याख्या, उद्देश आणि महत्व

३. लोकशाही विकेंद्रीकरणाची संकल्पना - मेहता समिती

४. महाराष्ट्र राज्यातील पंचायत राज पद्धती - प्रमुख वैशिष्ठे ( नाईक समिती )

घटक - ३ पान क्र.४० ते ५२

१. विस्तार शिक्षण - अर्थ, व्याख्या आणि उद्देश

२. विस्तार शिक्षण - तत्वज्ञान व तत्वे

३. विस्तार शिक्षणातील टप्पे

४. औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षण

घटक - ४ पान क्र.५२ ते ६०

१. नेतृत्व - अर्थ, व्याख्या आणि प्रकार

२. ग्रामीण विकासात ग्रामीण नेतृत्वाचे / नेत्याचे कार्य / भूमिका

३. नेत्याचे कार्य / गुण

४. कृषी विज्ञान केंद्र (KVK) - संकल्पना, उद्देश, रचना आणि कार्ये

B.A.(R.S.)- I Semester class notes

**विषय : सामुदायिक विकास व विस्तार** (Community Development and Extension)

**घटक - १**

**सामुदायिक विकास** (Community Development)

**मानवाची निर्मिती झाल्यानंतर सुरुवातीला तो भटकत्या स्थितीत राहत होता. हिंस्त्र पशुंपासून संरक्षण करणे आणि उदरनिर्वाहाकरिता अन्न मिळविणे या मुलभूत गरजा रोडविण्याकरिता त्याने एकत्रित राहणे सुरु केले. त्यामुळे मानवाचे गट, समुह, समुदाय अस्तित्वात आले. गट, समूह, समूदाय व समाज यामध्ये एकापेक्षाजास्त व्यक्तीचा समावेश होत असला तरी प्रत्येकाच्या निर्मितीचे उदेश भिन्न आहेत. गटाची विशिष्ट उद्देशपूर्तीकरिता, समुहाची जीवनावश्यक गरजा भागविण्याकरिता तर समुदायाची कायमचे वास्तव्य करुन सांघिक जीवन जगण्याकरिता निर्मिती झालेली दिसून येते.**

"**विशिष्ट उद्देश पूर्तीकरिता एकत्रित आलेल्या लोकांना गट म्हणतात**" **गटाचा कालावधी व निर्मीती उद्देश पूर्तीकरीता झालेली असल्याने ते अल्पकाळ टिकणारे असतात. उद्देश पूर्ती झाल्यांनतर गट वित्सर्जित होतात. समाजातील प्रत्येक व्यक्ती एका वेळी अशा अनेक गटाचा सदस्य असू शकतो.** उदा.- शाळा, कॉलेज, क्रिडांगण, शेतकरी मंडळ, तरुण मंडळ, महिला मंडळ

जीवनावश्यक गरजांची पूर्ती करण्याकरिता एकत्रित आलेल्या लोकांना समुह म्हणतात. समुहाचा मुख्य उद्देश जीवनावश्यक गरजाची पूर्ती करण्याचा असल्याने त्याचे वास्तव्य एका ठिकाणी नसते तर ते जीवनावश्यक गरजाची पूर्ती करण्यासाठी सतत भटकत असतात. समहामध्ये अनेक गट असतात. **<u>समुदाय म्हणजे काय ?</u>**: Common या इंग्रजी शब्दापासून Community हा शब्द बनलेला आहे. समुदायात राहणाऱ्या लोकांच्या गरजा समान असतात व त्या त्याच गटात राहून भागविल्या जाऊ शकतात.

व्याख्या :

"ज्यावेळी एखाद्या गटातील लोक आपल्या जीवनाच्या सर्व प्राथमिक गरजा भागविण्याच्या हेतूने ऐकमेकांशी संबंध्द होतात व एकाच भुभागात वास्तव्य करतात तेव्हा त्या गटाला समुदाय असे म्हणतात." समुदाय हा लोकांचा गट आकाराने लहान किंवा मोठाही असू शकतो... किंग्जले डेव्हिस :- "सामाजिक जीवनाच्या सर्व अंगाना स्पर्श करणारा लहानात लहान अशा एकाच भुप्रदेशात राहणारा गट म्हणजे समुदाय होय." "The Community is the smallest territorial group that can embrace all aspects of social life" - Kingsley Davis

"**समुदाय म्हणजे एखाद्या विशिष्ट भूभागावर राहत असलेला आणि सारख्या सवयी व संस्कृती असलेला लोकांचा गट होय**" "A Community may be defined as a group of people living is a particular physical proximity of area with common culture and habits"

**समुदायाचे वैशिष्ट्ये** :

- व्यक्तीचा गट
- निश्चित भूभाग
- सामान्य जीवन
- भूभागाचे किंवा स्थानाचे स्थिरत्व
- स्वयंप्रेरित निर्मिती
- आत्मनिर्भरता
- विशिष्ट नाव
- निरनिराळ्या क्षेत्रामध्ये समानता
- सामुहिक भावना / स्थिरभाव

समुदाय हा एक सामाजिक गट असून त्यामधील प्रत्येक सभासद सामाजिक कार्यामध्ये उत्साहाने तसेच ते कार्य अधिक व्यवस्थित करण्याकरिता आणि लोकांमध्ये एकी वपरस्पर विश्वास कायम ठेवण्याकरिता प्रयत्न करीत असतो. जीवनातील सर्वांगीण विकास समुदायातच राहुन होत असतो. उदा. खेडे, नगर व शहर हे समुदाय होत.

**विकास** (Development):

**विकास म्हणजे प्रगती आणि ती परिवर्तनाव्दारे शक्य होत असते. परिवर्तन अथवा बदल हे चांगले किवा वाईटही असू शकतात. परंतु सामाजिक दृष्टीकोनातून चांगले परिवर्तन म्हणजेच विकास जो लोकाच्या सामाजिक व आर्थिक उत्कर्षाला कारणीभूत ठरतो. उदा. आर्थिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, नैतिक राजकिय, व्यावसायिक, कृषि, गृहव्यवस्था इत्यादी विकास आवश्यक असतो.**

**सद्य परिस्थिती व त्याना आवश्यक वाटणारी परिस्थिती यातील अंतर कमी झाले तेव्हाच विकास झाला असे आपण म्हणतो.**

**सामुदायिक विकासाचा अर्थ** (Meaning of Community Development)

प्राचीन काळातील आपल्या पूर्वजांना सामुदायिक विकासाची चांगलीच कल्पना असल्याचे दिसून येते. परंतू त्या कल्पनेचे स्वरूप, पध्दती व कार्य सद्यः परिस्थितीमधील कल्पनेपेक्षा भिन्न होते. विभिन्न परिस्थितीमध्ये कमी अधिक प्रमाणात सामुदायिक विकासाचे कार्य पूर्वपार चालत आलेले आहे. तथापि, या युगात सामुदायिक विकासाचे नविन स्वरूप, महत्व, कार्य व पध्दती जाणीवपूर्वक अमलात आणावयाचे असल्याने आपल्याला ही कल्पना नवीन वाटते.

लंडन स्कुलच्या मते सामुदायिक विकासाचा उदय किंवा निर्मिती सामुहिक शिक्षण (Mass Education) या कल्पनेतून झालेली आहे.

सामुदायिक विकासालाच 'सामूहिक विकास अथवा समाज विकास असे म्हणतात. समाज विकास या संज्ञेमधील समाज म्हणजे विशिष्ट जातीच्या, धर्माच्या किंवा पंथाच्या लोकांचा समूह असा पूर्वी केला जात असे. परंतुना संकुचित अर्थ सामुदायिक विकासामध्ये अभिप्रेत नाही. नागरी आणि विशेषतः ग्रामीण भागात राहणाऱ्या सर्व लोकांचा समावेश समाजात होतो. आपलेच सामुहिक जीवन उंचावण्यासाठी लोकांनीच पुढाकार घ्यायचा याला सामुदायिक विकास योजनेत विशेष महत्व आहे.

एकत्रित आणि सर्वाचा विकास साधण्याच्या कार्यात १९४८ मध्ये केंब्रिज येथे झालेल्या Summer Conference on African Administration "ने सामुदायिक विकास" से नामाभिधान करून त्याची व्याख्या पुढील प्रमाणे केली.

"**संपूर्ण समाजाला चांगले राहणीमान मिळवून देणारी व ती विशेषतः स्वंयप्रेरित चळवळ म्हणजे सामुदायिक विकास होय.**"

"Community Development is a movement designed to promote better living for the whole Community and if possible on the initiative of the Community". Cambridge Conference.

**श्री.टी.आर. बॅटन** :- "**सामुदायिक विकास ही एक प्रक्रिया असून ज्यामध्ये खेड्यातील लोक प्रथम एकत्र येऊन आपल्या आवश्यक गरजावर किंवा समस्यांवर चर्चा करतात नंतर त्याचे नियोजन करुन एकत्रपणे ती समस्या सोडविण्याकरिता प्रयत्न करतात.**"

According to T.R. Batten. - "Community Development is process during which the people in a small community first thoroughly discuss and define their wants and then plan and act together to satisfy.

**युनायटेड नेशन्स** - "**शासन व लोक याच्या संघटित प्रयत्नानी सर्व समाजाची आर्थिक, सामाजिक व सांस्कतिक परिस्थिती सुधारणारी व राष्ट्रीय विकास कार्यक्रमात सहभागी व्हावयास लागणारी एक परिवर्तनाची प्रक्रिया म्हणजे सामुदायिक विकास होय**"

**श्री. ओ.पी.दहामा यांच्या मते, सामुदायिक विकास ही एक अशी सतत चालणारी सामाजिक कृतीची प्रक्रिया आहे की, ज्यायोगे त्या समुदायातील लोक**

**अ) आपल्या सर्वसामान्य गरजा निश्चित करतात.**

**ब) औपचारिक आणि अनौपचारिकरीत्या संघटन करुन नियोजन व कृती ठरवतात.**

**क) त्याच्या गरजा व समस्या सोडविण्याकरिता वैयक्तिक गटयोजना तयार करतात.**

**ड) उपलब्ध असणाऱ्या साधनसामुग्रीचा जास्तीत जास्त उपयोग करुन योजनाची अंमलबजावणी**

करतात आणि

इ) बाहेरील मदतीचा पूरक साधने म्हणून उपयोग करतात.

According to O.P. Dahama - Community Development is a proces of social action by which the people of a community.

a) Define their common and group needs.

b) Organise themselves formally and informally for democratic planning and action.

c) Make group and Individval plans to meet their needs and solve their problems.

d) Execute their plans with a maximum of reliance upon their own resources and

e) Supplement their resources from outside the community when necessary with services & materials.

**श्री. ओ.पी.दहामा यांनी सामुदायिक विकासाचीच दुसरी व्याख्या पुढीलप्रमाणे दिली आहे.**

"विशिष्ट भूभागावर राहणाऱ्या व एकमेकाबद्दल अवलंब भावना असलेल्या समुदायातील लोकांच्या संभाव्य क्षमतेचा व गुणाचा विकास घडवून आणणारी योजना म्हणजे सामुदायिक विकास होय."

According to O.P. Dahama - "Community Development is bringing forth potential ablities and qualities of group of people who live together in a common territory and who have on interdependent relation ship with each other."

कार्ल टायलरच्या मते- "सामुदायिक विकास ही एक अशी पध्दती आहे की, ज्यामध्ये ग्रामीण लोक आपली आर्थिक व सामाजिक परिस्थिती सुधारण्याकरिता मदत करण्यासाठी सहभागी होतात व त्यायोगे समर्थपणे काम करणाऱ्या लोकांचा गट तयार होऊन राष्ट्रीय विकास कार्यक्रमात सहाय्यभूत ठरतात." According to Carl C. Taylor :- "Community Development is a method by which people of villages are involved in helping to improve their own economic and social conditions and thereby they become effective working groups in programme of National Development.

वरील व्याख्यावरुन सामुदायिक विकास ही एक प्रक्रिया, पध्दती व चळवळ असल्याचे दिसून येते. या दृष्टीने विचार केल्यास श्री. मुकर्जी याची व्याख्या उद्‍बोधक ठरेल.

"सामुदायिक विकास ही ग्रामीण समाजाच्या परंपरागत राहण्याच्या पध्दतीत परिर्वतने घडवून आणण्याची प्रक्रिया'. ग्रामीण लोकांजवळ उपलब्ध असलेली साधनसामुग्री व मनुष्यशक्तीच्या सहाय्याने त्याचाच विकास घडवून आणण्याकरिता मदत करणारी "पध्दती". ग्रामीण लोकांच्या कल्याणार्थ संबंधित क्षेत्रामध्ये साध्य करावे लागणारे कार्य म्हणून एक कार्यक्रम' आणि विशिष्ट कल्पना किंवा ध्येयातून ग्रामीण लोकांचा विकास करण्याची 'चळवळ' होय."

Mukherji B.B. - Community Development has been described as a "Process" or change from the traditional ways of living of rural communities to progressive ways of living, as a method by which people can be assisted to develoop themselves, on their own capacity and resoures as a "programme" for accomplishing certain activities in fields concerning the welfare of the rural people, and as 'movement for progress with a certain ideological content.

**श्री. मुखर्जी या व्याख्येवरून समुदायाची आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अशी सर्वांगीण उन्नती घडवन आणण्याचा मुख्य उद्‍देश स्पष्ट होत असला तरी सामुदायिक विकासाची संकल्पना**

विविध प्रकारे विशद केलेली आहे. जेव्हा सामुदायिक विकासाकडे एका प्रक्रियेच्या दृष्टीकोनातून पाहिले जाते तेव्हा लोकांमध्ये होणारे परिवर्तन सामाजिक व मानसिक असते.

- पध्दती या दृष्टीने विचार केला तर साद्यपूर्तीला महत्व दिले जाते.

- कार्यक्रम या नात्याने विशिष्ट क्षेत्रातील कार्याला प्राधान्य दिले जाते. उदा. आरोग्य, शिक्षण, कृषी गृहव्यवस्था.

- एक चळवळ म्हणून कार्याभागील भावनात्मक स्थान व ध्येयवादावर जोर दिला जातो.

तथापि, सामुदायिक विकासाची पूर्ण कल्पना येण्यासाठी या चारही प्रकारांचा एकत्र विचार होणे आवश्यक आहे. ही एक विकासाची प्रक्रिया म्हणून तिचे निश्चित व स्पष्ट उद्देश असून ते साध्य करण्याच्या विशिष्ट पध्दती आहे. परंतु ग्रामीण विकासाच्या कार्यक्रमात या पध्दतीव्दारे कार्याला चालना मिळून शेवटी लोकांच्या भावना व ध्येयाला आवाहन करुन चळवळीचे स्वरुप प्राप्त होत असते. यावरुन सामुदायिक विकास लोकांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व इतर क्षेत्रातील विकासावर केंद्रीत झाल्याचे दिसून येते. ही एक विकासाकरिता आवश्यक प्रक्रिया असून ती लोकांच्या संघटनामार्फत साध्य केली जाते. समुदायिक विकास हा एक समर्थपणे व संघटितरित्या ग्रामीण समस्या सोडविण्याचा मार्ग असून त्याव्दारे लोकांना औपचारिक आणि अनौपचारिक पध्दतीने शिक्षण दिले जाते. याव्दारे लोकांचाच विकास घडवून आणावयाचा असल्याने त्याचे सहकार्य मिळणे अत्यावश्यक असते. सामुदायिक विकास ही परिवर्तन किंवा प्रगतीची सामाजिक प्रक्रिया असून लोकशाही तत्वावर आधारित आहे. या वैशिष्ठ्यामध्ये ग्रामीण भागातील लोकांच्या विकासाला प्राधान्य, त्याच्यात स्वमदत आत्मविश्वास. सहकार्य व कार्याविषयी आवड निर्माण करणे, वैयक्तीक व गटाच्या समस्या निवडणे व त्यावर उपाय शोधून काढण्याची क्षमता निर्माण करणे, लोकांचा पुढाकार, सांघिक प्रयत्न ग्रामीण नेतृत्व विकास, स्थानिक उपलब्ध साधनसामुग्री जास्तीत जास्त उपयोग इत्यादी प्रमुख आहे.

सामुदायिक विकासाचा मुख्य घटक म्हणजे लोकांचे सहकार्य, कार्यात लोकांनीच पुढाकार घेऊन स्वतःचे राहणीमान सुधारण्याचे प्रयत्न करणे आणि दुसरा घटक म्हणजे लोकांना त्याच्या या कामासाठी तांत्रिक व इतर आवश्यक ज्ञान व सेवा अशा रितीने उपलब्ध करुन देणे की, ज्यामुळे त्यांच्यात पुढाकार, स्वमदत आणि परस्पर मदत याला चालना मिळेल अर्थात यापैकी पहिले कार्य लोकांनी तर दुसऱ्या प्रकारचे कार्य शासनानी करावे अशी अपेक्षा आहे.

सामुदायिक विकास कार्याची वैशिष्ट्ये

सामुदायिक विकास लोकांच्या सर्वांगीण विकासाच्या दिशेने उचललेले नाविन्यपुर्ण पाऊल आहे. व्दितीय महायुध्दानंतर जगाच्या ग्रामीण क्षेत्रात आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवनात मुलभूत परिवर्तन घडवून आणण्याचे प्रयत्न सुरु झालेत.जगातील दक्षिण-पूर्व आशिया, पश्चिम आशिया. पश्चिम आफ्रिका तसेच मध्य अमेरिका इत्यादी विभिन्न देशात सामुदायिक विकासाचे कार्य सूरू झाले. या सर्व देशात सामुदायिक विकासाचे नामाभिधान वेगवेगळे करण्यात आले असले तरी वास्तविक अर्थ एकच आहे.

भारतामध्ये १९५२ पासून सुरु झालेल्या सामुदयिक विकास कार्याची खास वैशिष्ट्ये खालील प्रमाणे आहे.

1) सामदायिक विकास हा स्थानिक लोक व शासन या दोघांचा संयुक्त प्रयत्न, सहभाग, उपलब्ध साधनसामुग्री यांना विशेष महत्व दिलेले आहे. परंतु आवश्यकता भासल्यास विकासाचे प्रयत्न ऐच्छिकरीत्या केले जाऊ शकतात आणि ते पूर्ण करण्याचे कामी तांत्रिक मार्गदर्शन व आर्थिक मदत सरकारकडून मिळू शकते.

2) कार्यक्रमाची योजना आखणे व अंमलबजावणी करणे ही जबाबदारी लोकनियुक्त प्रतिनिधीकडे सोपविलेली आहे. सरकार या संबंधात फक्तमार्गदर्शन देखरेख, आर्थिक मदत व उच स्तरावरील नियोजनाचे कार्य करते.

3) सामुदायिक विकास कार्यक्रमात ग्रामपंचायत, सहकार समिती व शाळा खेड्यातील या तीन मुलभूत संस्थाचे योगदान आवश्यक असते. या संस्थांच्या सक्रिय सहकार्याने नियोजन आर्थिक मदत व योजनांचे संचालन या कामी मदत घेतली जाऊन लोकविकासाच्या योजना राबविलेल्या जातात.

4) सामुदायिक विकासाकरिता ग्रामस्तरावर ग्रामसेवक, खंड स्तरावर/तालुका गट विकास अधिकारी व विस्तार अधिकारी आणि जिल्हा स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी व इतर प्रशासकिय प्रमुख म्हणुन असतात. त्याच्या कार्यकुशलतेवरच पूर्ण योजना आधारित असते.

5) सामुदायिक विकास कार्यक्रम ग्रामीण लोकांच्या महत्वपुर्ण गरजा लक्षात घेऊन व त्यावर आधारित नियोजन करून लोकांचा सर्वांगीण विकास घडवून आणतात.

## सामुदायिक विकासाची भूमिका (Role of Community Development)

विकसित देशामध्ये ज्या प्रमाणावर वैज्ञानिक प्रगती झालेली दिसून येते, त्या तुलनेत अविकसित देशामध्ये सामाजिक व वैज्ञानिक प्रगती झालेली दिसून येत नाही. उन्नत राष्ट्रामधील लोकांना वैज्ञानिक ज्ञानाचा फायदा मिळून तेथील लोकांची आर्थिक व इतर क्षेत्रामध्ये उन्नती होण्यासाठी त्याचा उपयोग होतो. भारतासारख्या विकसनशील देशामध्ये इतर अविकसित राष्ट्राप्रमाणेच तांत्रिक व वैज्ञानिक ज्ञानाचा लोकांना पर्याप्त उपयोग होऊ शकत नाही. परिणामी लोकसंख्या वाढीच्या तुलनेत धान्योत्पादनाची गती कमी झाल्याने अन्नसमस्या व इतर गरिबी, अज्ञान, दारिद्रय, बेकारी, अनारोग्य यासारख्या समस्या निर्माण झाल्या.

देशात सर्वांगीण विकासात सामुदायिक विकास कार्याचे महत्वपूर्ण स्थान आहे. ग्रामीण लोकांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व इतर क्षेत्रातील समस्या सोडवून त्याचा सर्वांगीण विकास पर्यायाने देशाचा विकास साधण्याकरिता सामुदायिक विकासाचे कार्य उपयुक्त ठरु शकते. तांत्रिक ज्ञानाचा उपयोग करुन कृषी उत्पादनात वाढ, ओलिताच्या सोयी, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, ग्रामीण स्वच्छता व आरोग्य, शिक्षणप्रसार, ग्रामीण उद्योगात वाढ व विकास, दळणवळण, पशुसंवर्धन, बालकल्याण योजना, युवक व महिला कल्याण कार्य इत्यादी बाबतीत विकास घडवून आणून संपन्न असा ग्रामीण समाज निर्माण केला जाऊ शकतो.

भारतातील सामुदायिक विकासाची कल्पना पुज्य महात्मा गांधीजींच्या तात्विक विचारावर अधारलेली आहे. ग्रामीण जनतेमधील अपार कार्यक्षमतेचा विकास सामुदायिक विकासामार्फतच होऊ शकतो आणि जर या कार्यक्षमतेचा पूर्णपणे उपयोग होऊ शकला तर देशातील अन्नसमस्या, गरीबी, दारिद्र, अज्ञान, बेकारी व इतर समस्या नष्ट होऊन देश प्रगतीच्या मार्गावर वाटचाल करू लागेल. ग्रामीण क्षेत्रातील लोकांच्या सर्वांगीण विकासाचा मुलभुत आधार आर्थिक विकास आहे. या क्षेत्रात विकास साध्य झाला तर सामाजिक, सांस्कृतिक व इतर क्षेत्रात विकास घडून येण्याला फारसा वेळ लागणार नाही. यासाठी कृषी ग्रामीण उद्योग व इतर व्यवसायात आधुनिक ज्ञान व तंत्राचा वापर करुन उत्पादन वाढविल्यास लोकांचे आर्थिक उत्पन्न वाढून राहणीमान सुधारेल.

भारतामध्ये जनशक्ती अधिक प्रमाणात आहे परंतु या जनशक्तीचा पुरेपुर उपयोग होत नसल्याने बेकारीची समस्या दिवसेंदिवस वाढत चालेली आहे. तसेच गरीबी, अज्ञान व अशिक्षीतपणा यामुळे नवीन ज्ञान व तंत्राचा वापर न केल्यामुळे या समस्या अधिक वाढीला लागलेल्या आहेत. त्यामुळे ग्रामीण क्षेत्रातील लोकांचे दरडोई उत्पन्न कमी होत चाललेले आहे. सामुदायिक विकास कार्यात शेती विकासाबरोबरच ग्रामीण लघु उद्योग व कुटीर उद्योगांचा विकास व नविन उद्योगांची स्थापना केल्याने ग्रामीण लोकांचे उत्पन्न वाढेलच परंतु काही प्रमाणात बेकारीची समस्याही सुटू शकेल.

देशाच्या सर्वांगीण विकासाकरिता सर्वच क्षेत्रामध्ये उत्पादन क्षमता वाढविणे आवश्यक आहे.शेतीमध्ये नविन व संकरित बियाणे, रासायनिक खते, यंत्रे, औजारे रोगनाशके, व किटकनाशके, ओलिताच्या सोयी इत्यादीव्दारे प्रती हेक्टरी उत्पादन वाढविले जाऊ शकते. तसेच ग्रामीण

**उद्योगामध्येसुध्दा आधुनिक तंत्र व पध्दतीचा अवलंब करुन जास्त उत्पादन मिळविले जाऊ शकते. या उत्पादनवाढीमुळे लोकांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होईल.**

सास्कृतिक विकास ग्रामीण शाळेच्या माध्यमातून होत असतो. संस्कृती, रुढी, परंपरा इत्यादी अनावश्यक असल्यास त्या दूर करणेकिंवा त्यांच्याशी समायोजन राखून लोकांच्या दृष्टीकोनातणात व विचारसरणीत बदल घडवून आणणे आवश्यक असते. आजकाल ग्रामीण क्षेत्रात परिवार नियोजनाची फार आवश्यकता आहे. यामळे लोकसंख्येतील वाढीची गती कमी होऊन माता व मुले त्यांचे आरोग उत्तम राहते. तसेच कुटुंबातील सदस्यांची संख्या सीमीत राहिल्याने त्याचे राहनीमान, मुलांचे संगोपन व शिक्षण आहार, इत्यादीबद्दल काळजी घेता येते. उत्तम स्वास्थाकरिता संतुलित आहार, स्वच्छता, आरोग्य संवर्धन कसे आवश्यक आहे याबद्दलचे शिक्षणही सामुदायिक विकास कार्यक्रमाव्दारे लोकांना दिले जाते.

### सामुदायिक विकासाचे उद्देश (Objectives of community Development)

जगातील सर्वच अविकसित, विकसनशील व विकसीत देशातसुध्दा सामुदायिक विकासाचे कार्य विविध स्वरुपात केले जाते. आर्थिक विकास, लोकशाही तत्वाचा वापर आणि सामाजिक न्याय हे मुलभूत आणि सर्वमान्य असे सामुदायिक विकासाचे उद्देश म्हणजे सुरुवातीला प्रत्येक समुदायाला (खेड्याला) मदत करून ग्राम पंचायत, सहकारी समित्या व इतर ग्रामीण संस्थाच्या कार्याला चालना देऊन त्याच्यामार्फत प्रत्येक कुटूब, खेडे, गट (Block) आणि जिल्हा करिता एकात्मिक परंतू प्रत्येक स्तराकरिता वेगवेगळ्या अशा कृषि उत्पादनात वाढ, अस्तित्वात असलेल्या ग्रामीण उद्योगधंद्याचा विकास व नवीन ग्रामीण उद्योगांची स्थापना, आरोग्य विषयक सेवा उपलब्ध करुन देणे, शिक्षण व प्रौढ शिक्षणाच्या सोयी, मनोरंजनाच्या सोयी, गृहव्यवस्थेमध्ये विकास, स्त्रिया व तरुणांच्या कल्याण व विकासाचे कार्यक्रम इत्यादीबद्दल योजना तयार करून राबविणे. सामुदायिक विकासाच्या या सर्वसाधारण उद्देशाव्यतिरिक्त काही उद्देश पुढील प्रमाणे आहेत.

1) खेड्याचा व खेड्यातील लोकांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे व त्यासाठी लोकांमध्ये वैचारिक बद्दल घडवून आणणे. त्याच्या रुढी, परंपरा, प्रथा, चालीरीती, एकंदरीत संस्कृतीशी मेळ राखून नवीन ज्ञान, कौशल्य व विचारसरणीव्दारे त्याच्यात उच्च राहणीमानाच्या अपेक्षा निर्माण करुन सामुदायिक विकासकार्यात सहभागी होण्यास प्रवृत्त करणे.

2) ग्रामीण संस्था व संघटनाचा विकास करण्याकरिता अधिक जबाबदार व कार्यक्षम नेतृत्व निर्माण करणे, विकासाचे स्वमदतीवर आधारित कार्यक्रम अधिक प्रभावशाली करण्याकरिता त्याचे नियोजन व अंमलबजावणी ग्रामीण नेत्यांकडूनच व्हावयास पाहिजे. ग्रामीण लोक, संस्था व संघटनाकडून आलेल्या समस्यावर योजना आखण्याची व अंमलबजावणीची अधिक जबाबदारी खेड्यातील पंचायत, सहकारी समित्या, शाळा, युवक, महिला व शेतकरी संघटना यांच्यावर सोपविली तर विकास योजनांना लोकांचे सहकार्य मिळून त्या यशस्वी होतात. या संस्था व संघटना यातील सदस्यांमध्ये असलेल्या नेतृत्वगुणाचा विकास करुन त्याचा सामुदायिक विकास कार्यात उपयोग करुन घेणे.

3) राष्ट्रनिर्मितीच्या कार्यासाठी आत्मनिर्भर व जबाबदार नागरिक निर्माण करणे, भारतासारख्या देशाची प्रमख शक्ती म्हणजे तेथील लोक आहे. अधिक प्रमाणात असलेल्या या मनुष्यशक्तीचा जास्तीत जास्त उपयोग करून सामुदायिक विकास साध्य करता येणे शक्य आहे. परंतू त्यासाठी नागरिकामध्ये स्वावलंबन. आत्मनिर्भरता, स्वमदत व परस्पर मदत, आत्मविश्वास, कार्यक्षमता, सामाजिक जबाबदारीची जाणीव, ज्ञान व कौशल्याचा उपयोग करुन विकास कार्यात सहभागी होणे इत्यादी गुणांचा विकास करुन राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात सहाय्यभूत ठरणे.

4) लोकांचा आर्थिक विकास घडवून आणणे, खेड्यातील लोकांच्या उत्तम आहार, वस्त्र, निवासस्थान, शिक्षण आरोग्यविषयक सेवा, पिण्याचे शुध्द पाणी, दळणवळण व इतर आवश्यक बाबीविषयीच्या वाढत्या अपेक्षा लक्षात घेऊन सामुदायिक विकास कार्यात लोकांची आर्थिक स्थिती सुधारण्याला प्राधान्य

देणे, यासाठी त्याचा मुख्य व्यवसाय असलेल्या शेतीमध्ये सुधारित तंत्र व आधुनिक पध्दतीचा अवलंब करून शेतीउत्पादन वाढविणे

5) खेड्यामध्ये अस्तित्वात असलेल्या लघु व कुटिर उद्योगधंद्याचा विकास करणे आणि नवीन ग्रामीण उद्योग सुरु करणे. ज्यामुळे खेड्यातील लोकांचे आर्थिक उत्पन्न वाढून अनेक युवकांना युवक कार्यक्रमाव्दारे नागरिकत्वाची जाणीव होण्याकरिता व खेड्याचा आर्थिक विकास साधण्याकरिता विविध विषयाचे आणि व्यावसायिक प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. हेच युवक उद्याचे नागरिक असल्याने राष्ट्रविकासाची खरी जबाबदारी प्रामुख्याने त्याच्यावरच आहे व त्यासाठी त्यांना सुरुवातीपासुनच शिक्षण व प्रशिक्षण देणे महत्वाचे आहे.

6) कुटूंबाच्या गरजा पुर्ण करण्याकरिता प्रत्येक कुटूंबाचा महत्वपूर्ण घटक म्हणजे स्त्रिया, त्यांना सामुदायिक विकासाची कल्पना देऊन अन्न, वस्त्र, गृहविज्ञान, आरोग्य, बालसंगोपन इ इतर सामाजिक, धार्मिक, नैतिक, सांस्कृतिक यासारख्या विषयाचे ज्ञान प्रदान करुन त्याचा विकास करणे आणि त्याच्याकडून कुटूंबातील इतर लोकांचा विविध बाबीमध्ये विकास घडवून आणणे यासाठी महिला संघटना निर्माण करून त्याव्दारे महिला कल्याणाचे कार्यक्रम आयोजित करणे. स्त्रियांचे नवीन पिढीला मार्गदर्शन करून कुटूंबाचा विकास घडवून आणू शकतात. प्रत्येक कुटूंबामूळे खेड्याचा आणि पर्यायाने देशाचा विकास साध्य होतो.

7) ग्रामीण शाळा व त्यातील शिक्षण यांचे सामुदायिक विकासकार्यात महत्वाचे योगदान प्राप्त होत असल्याने त्यांना विकास कार्यात सहभागी करून घेणे, शाळेतील विद्यार्थी हे उद्याचे नागरिक असल्याने त्यामध्ये राष्ट्रविकासाकरिता आवश्यक असलेल्या गुणांचा विकास शिक्षकच घडवून आणू शकतात. ग्रामीण शिक्षण खेड्यातील प्रतिष्ठित व सुशिक्षित व्यक्ती असल्याचे त्याचे सामुदायिक विकासकार्यात बहुमोल सहाय्य प्राप्त होते.

8) खेड्यातील रोगराई, आजार, मृत्यु, विविध रोगांच्या साथीमुळे होत असल्याने लोकांना रोगांची कारणे समजावून देऊन रोगावर आळा घालणे, लोकांना स्वच्छतेच्या सवयी लावून रोगराई बद्दल असलेला त्याचा अंधविश्वास दूर करणे. याशिवाय त्यांना आरोग्य शिक्षण व आरोग्यविषयक सेवा उपलब्ध करून देणे.

विभिन्न राष्ट्रातील सामुदायिक विकासाचे उद्देश तेथील परिस्थितीनुसार वेगवेगळे असू शकतात. वर दिलेली भारतीय परिस्थितीमधील सामुदायिक विकासाचे उद्देश सर्वस्पर्शी असून ग्रामीण क्षेत्राचा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व इतर क्षेत्रात पर्यायाने सर्वांगीण विकास घडविणारे व लोकांना चांगले जीवनमान मिळवून देऊन त्याच्यामध्ये एकप्रकारचा प्रागतिक दृष्टिकोण निर्माण करणारे आहेत.

## सामुदायिक विकासाचे तत्वज्ञान

(Philosophy of Community Development)

सामुदायिक विकासाचे तत्वज्ञान स्वप्रयत्नाच्या कल्पनेवर आधारित आहे. स्वप्रयत्नाचा विकास कार्याच्या दृष्टीने असा अर्थ आहे की, लोकांनी आपले प्रश्न सोडविण्याकरिता स्वतःची योजना तयार करणे आणि त्या त्याच्यामार्फतच कार्यान्वित करणे. लोकांचे प्रश्न त्याच्याच प्रयत्नातून सोडविले गेले नाहीत तर स्वपुढाकार, आत्मनिर्भरता, नेतृत्व, सामुदायिकरित्या निर्णय घेणे इत्यादी गूणाचा समाजातील लोकांमध्ये विकास होणार नाही आणि त्यामुळे समाजाचा विकास होतो आहे. असेसुध्दा म्हणता येणार नाही.

सामुदायिक विकासाच्या सुरुवातीपासुनच जवाहरलाल नेहरू, व्ही.टी.कृष्णामाचारी, एस.के.डे. इत्यादी नेत्यांनी असे दर्शविले की, मनुष्यजातीमध्ये वैयक्तीकरीत्या बदल घडवून आणून सामुदायिक विकासाच्या कार्यक्रमांत लोकांच्या सहकार्याला विशेष प्राधान्य द्यावयास पाहिजे.

पं. जवाहरलाल नेहरू यांनी असे स्पष्ट केले की, सामुदायिक विकास प्रकल्पाच्या सहाय्याने केवळ प्राकृतिक वा भौतिक बदल किंवा विकास साधावयाचा नाही तर सामुदायिक विकासाच्या

कार्यक्रमात प्रत्येक व्यक्ती सहभागी होईल. सामुदायिक विकासाचे ध्येय म्हणजे समाजाबरोबरच व्यक्ती घडविणे हे होय.

श्री. व्ही.टी. कृष्णामाचारी यांनी सामुदायिक विकास कार्यक्रमाबद्दल असे प्रतिपादन केले की, हा कार्यक्रम प्रत्येक व्यक्तीच्या प्रतिष्ठेवर आणि तिच्या मुल्यांवर आधारलेला आहे. या कार्यक्रमाची आद्यकल्पना प्रत्येक व्यक्तीमध्ये वैचारिक अथवा मानसिक बदल घडवून आणण्याची आहे आणि प्रत्येक व्यक्तीला आपले नवीन जीवन घडविणाऱ्या कार्यात मदत करण्याची आहे.

श्री. एस.के.डे यांनी सामुदायिक विकासाचे तत्वज्ञान पुढीलप्रमाणे विशद केले आहे. सामुदायिक विकास प्रकल्पाचा जन्म प्रत्येक व्यक्तीचे मुलभूत अधिकार जागृत करण्याकरिता झाला आहे. त्यांनी या अधिकारांची सुत्रे खालील प्रमाणे दिलेली आहे.

१. जगण्याचा अधिकार **(Right to live)**

२. काम करण्याचा अधिकार **(Right to work)**

३. केलेल्या कामाचा पूर्ण मोबदला मिळण्याचा अधिकार **(Right to receive what is earned)**

वरील सुत्राचे सुक्ष्म अवलोकन केल्यास प्रत्येक व्यक्तीच्या या आद्य अधिकारासोबतच त्या व्यक्तीची प्रतिष्ठा, मूल्य, सामाजिक व आर्थिक न्याय, घटनेचा आराखडा इत्यादीचा थोडक्यात समावेश केलेला दिसून येतो. अधिकाराच्या या सुत्राबरोबरच श्री.एस.के.डे यांनी त्यासंबंधी विश्वासाची त्रयसूत्री दिलेली आहे.

१. स्नायू कार्य करु शकतात. (Muscles can do it)

२. स्नायूना त्याप्रमाणे वळण लावले जाऊ शकते. (Muscles can be trained to do it)

३. त्याकरिता आवश्यक परिस्थिती निर्माण केली जाऊ शकते.(Condition can be created to do its)

वरील विश्वासाच्या सुत्रामधुन मनुष्यातील विकासाच्या सुप्त भावना जागृत करण्याकरिता त्याप्रकारची इच्छा निर्माण करण्याची गरज प्रत्येक व्यक्तीच्या विकासाकरिता हवी असलेली तांत्रिक मदत, समाजाच्या प्रगतीकरिता सांघिकप्रयत्न आणि योग्य परिस्थिती इत्यादी आवश्यक गोष्टी दिसून येतात. तसेच लोकांच्या विकासाकरिता योग्य परिस्थिती निर्माण करुन व कार्य करुन सामुदायिक विकासाचे उद्देश चांगल्या त-हेने यशस्वी होऊ शकतात.

राष्ट्रोन्नतीकरिता राष्ट्रातील मनुष्यशक्तीचे अनन्यसाधारण महत्व आहे. भारताजवळ भरपुर मनुष्यशक्ती आहे, परंतु आपला देश आर्थिकदृष्ट्या साधन संपत्ती, व्यवस्थापनाचे कौशल्य, अद्यावत व विकसीत तांत्रिक ज्ञान इत्यादी दृष्टीने मागासलेला आहे. येथील मनुष्यशक्तीचा पुरेपूर उपयोग केला जात नाही. सामुदायिक विकास योजना देशातील मनुष्यशक्ती राष्ट्रोद्धाराकरिता उपयोगात आणण्याचा प्रयत्न करीत आहे आणि त्या दृष्टीने वरील विश्वासाची त्रयसूत्री जागृतीकरिता अत्यंत उपयुक्त आहे.

भारतातील दारिद्रय, बेकारी. दळणवळणाचा अभाव, कमी उत्पादन इत्यादी व यासारख्या अनेक समस्या सोडविणे महत्वाचे आहे. परंतु वरील समस्या शिवाय व्यक्तीचे विचार आणि त्यांचे परस्पर संबंध यात सुधारणा घडवून आणणे अतिशय महत्वाचे आहे. यासाठी सामुदायिक विकास कार्यक्रमात विचार परिवर्तनाला विशेष महत्व दिले जाते. सामुदायिक विकास कार्यक्रमांशी मनुष्य जातीचा संबंध केवळ अन्न, वस्त्र, निवारा आणि उत्तम राहणीमान साध्य करण्याकरिता नसुन ते साध्य करण्याकरिता एक साधन म्हणन आहे. या योजनेचे साध्य म्हणजे लोकांना गरीबी, दारिद्रय, रोगराई बेकारी, असंरक्षण इत्यादीपासून दूर ठेवणे हे आहे आणि लोकांचे राहणीमान उंचावण्याकरिता त्यांना संधी उपलब्ध करुन देणे आहे. वरील उद्देश साध्य करण्याकरिता सामुदायिक विकासाचे कार्य ज्या तत्वज्ञानावर आधारित असते. त्याचे प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे आहे.

१. सामुदायिक विकासाचे कार्य नेहमी अस्तित्वात असलेल्या परंतू अत्यावश्यक गरजा सोडविण्यास मदत करणारे असावे.

२. सामुहिक विकासाचे कार्य लोकांना गरीबी व दुःख यापासून मुक्तता मिळण्याच्या कल्पनेशी सहमत असावे, लोकांच्या अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, याविषयीच्या गरजा सोडविण्याशी संबंधीत असावे. सामाजिक दृष्टिकोणातुन लोकांना संरक्षण, मान्यता, प्रतिसाद व नवीन अनुभव प्राप्त करून देणारे असावे.

३ लोकांची इच्छा स्वतंत्र्य जीवन जगण्याची असते त्यासोबतच त्याचा धनिष्ठ संबंध असणाऱ्या आर्थिक, शैक्षणिक, राजकिय इत्यादी संस्थाचे स्वरुप निश्चित करण्याचे त्यांना स्वातंत्र्य असावे.

४. लोकांच्या मूल्यांना विशेष महत्व दिले जावे. ज्यामध्ये सहकार, सामाजिक निर्णय घेणे, स्वपुढाकार, आत्मनिर्भरता, सामाजिक जबाबदारी, नेतृत्व विश्वसनियता, कार्यक्षमता याचा समावेश होतो.

५. सामदायिक विकास कार्यात स्वमदतीला विशेष स्थान आहे. लोकांनी आपल्या समस्या सोडविण्याकरिता सामुहिक निर्णय घेऊन नियोजन केले तर अंमलबजावणी करतांना सर्वाचे सहकार्य लाभते व विविध गणांचा विकास होतो. परंतु जेव्हा सामुदायिक विकासाचे कार्य बाह्यशक्तीच्या आधारे राबविले जाते. तेव्हा लोकांचे कमी प्रमाणात सहकार्य मिळून त्याच्यातील आवश्यक गुणांचा विकास होत नाही.

६.विकास कार्यात लोकांच्या सक्रिय सहकार्याला अतिशय महत्व आहे त्याशिवाय विकासाचे कार्य यशस्वी होऊ शकत नाही.

७. लोकांची विचारसरणी, सवयी, ज्ञान, कौशल्य इत्यादीमध्ये आणि विविध क्षेत्रातील कार्यामध्ये बदल घडवून आणावे लागतात.

सामदायिक विकास कार्याकरिता ग्रामीण स्तरावर विविध संघटना निर्माण केल्या जातात आणि या संघटनांच्या माध्यमातून ग्रामीण प्रश्न सांघिकरीत्या सोडविण्यास मदत केली जाते. ह्यातून ग्रामीण लोकांत बंधुभावनेने आणि सहकार्याच्या प्रवृत्तीचे कार्य करण्याचे शिक्षण मिळते. ग्रामीण लोकांना नियंत्रणाचे अधिकार आणि अधिक जबाबदारी सोपविल्यास आणि अधिक साधन सामुग्री उपलब्ध करुन दिल्यास ते स्थानिक विकासाची जबाबदारी अधिक स्विकारतात व स्थानिक लोकांच्या इच्छा, आशा-आकांक्षा लक्षात घेऊन कार्य करतात. ग्रामीण संस्था व संघटनाचा विकास करून व सत्तेचे विकेंद्रीकरण करून त्यांच्याकडे अधिक सत्ता, जबाबदारी व अधिकार सोपविल्यास असे दिसून येईल की, प्रत्येक खेडे आपला कारभार व्यवस्थितपणे सांभाळू शकतात. या पध्दतीने स्थानिक स्वराज्य निर्माण झाल्याने प्रत्येक खेडे स्वंयपुर्ण होऊन पुज्य महात्मा गांधीजीच्या कल्पनेप्रमाणे प्रत्येक खेड्यात रामराज्य निर्माण होईल. ज्यामध्ये आर्थिक, सामाजिक आणि राजकीय न्याय खेड्यातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहचेल.

सामाजिक विकास कार्यक्रम राष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीला आर्थिक आणि सामाजिक स्थैर्य पूरविण्याचे कार्य करते. प्रत्येकाला तांत्रिक ज्ञान उपलब्ध करुन देऊन विविध संघटनामार्फत सामुदायिक विकासाचे कार्य चालते. आणि यातून लोक जे जे काही निर्माण करतात त्याचा संपुर्ण फायदा घेण्याकरिता लोकांना समर्थ केले जाते. जाते.

## सामुदायिक विकासाची तत्वे (Principles of Community Development)

सामुदायिक विकासाचे उद्देश सफल करण्याकरिता सामुदायिक विकासाच्या तत्वज्ञानावर आधारित काही तत्वे पुढीलप्रमाणे आहेत. ज्यांचा उपयोग ग्रामीण भागातील सामुदायिक विकासाच्या योजनांचे नियोजन व अंमलबजावणी करतांना महत्वाचा ठरतो.

**१) समाज व समाजरचना ज्ञात असणे** : सामुदायिक विकासाचे कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना समाज म्हणजे काय, समाजाची वैशिष्ट्ये समाजाचे घटक उदा. शेतकरी, मजूर, कर्मचारी, व्यावसायीक इत्यादी समाजातील सामाजिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय गट इत्यादीविषयी समाजरचनेची माहिती असणे

आवश्यक आहे. समाजाच्या रचनेवरुन व वैशिष्ट्यावरुन समाजाच्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक, राजकिय व इतर बाबीची कल्पना येते. लोकांना कोणत्या कार्याकरिता एकत्रित करण्यासाठी कोणत्या व्यक्ती प्रभावी असु शकतात. समाजाच्या विकासाकरिता कोणती पध्दती व कशा रितीने प्रभावी ठरेल याची जाणीव होते. विकास कार्यकर्त्यांना जर समाजाची संपुर्ण माहिती असेल तर समाजाला सांघिकरीत्या निर्णय घेणे व त्याचबरोबर सामुदायिक भाग घेणे यासाठी लोकांना प्रवृत्त करता येते.

**२) सामाजिक रचनेवर परिणाम घडवून आणणारे घटक** : समुदायात महत्वाचे ठराव कोण घेतात, समाजातील प्रश्न व समस्या सोडविण्याच्या कामी कोण पुढाकार घेतात तसेच निर्णय घेतांना कोणत्या व्यक्तीचा समुदायावर प्रभाव पडतो इत्यादीचे ज्ञान विकास कार्यकर्त्यांना असावयास पाहिजे सामुदायिक विकासाचा कार्यक्रम आखतांना अशा महत्वपूर्ण व्यक्तीचा सल्ला घेऊन त्यांना कार्यक्रमात सहभागी करून घेतल्यास लोकांचे सक्रिय सहकार्य मिळते.

**३) समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या प्रतिष्ठेला मान्यता देणे** : समाजात प्रत्येक व्यक्तीची प्रतिष्ठा प्रचलित मूल्यांवर आधारलेली असते. व्यक्तीचे वैयक्तिक गुणवैशिष्ट्ये उदा. सत्यता, प्रामाणिकपणा, आदरशीलता, विश्वसनीयता इत्यादी व्यक्तीची जात, संपत्ती, वास्तव्याचा कालावधी, सामाजिक कार्याची आवड, राजकिय कार्यातील सहभाग, जमिनीची मालकी, कार्याशी प्रामाणिक व अंगमेहनती, वृध्दाचा आदर ठेवणे यावरुन व्यक्तीची मुल्ये व त्यावरुन प्रतिष्ठा ठरविली जाते. जीवनमुल्यामुळेच व्यक्तीला समाजात प्रतिष्ठा प्राप्त होते. निरनिराळ्या समाजाची जीवनमुल्ये वेगवेगळी असतात, सामाजिक मूल्ये म्हणजे कल्पना (Ideas) असतात. ज्यावरून समाजात विशिष्ट रीतीने वर्तन करणे चांगले की वाईट हे ठरविले जाते. ज्यावेळेस ही सामाजिक मूल्ये नियमांचे रुप धारण करतात आणि ज्या नियमाप्रमाणे समाजात प्रत्येक व्यक्तीला वागावे लागते तेव्हा त्याला सामाजिक बंधने (Social Norms) म्हणतात. ही सामाजिक मूल्ये सामाजिक बंधनानूसार बदलत असतात. लोकांचे सामुदायिक विकास कार्यात सहभागित्व वाढविण्यासाठी प्रत्येक व्यक्तीची प्रतिष्ठा माहित करुन घेण्यासाठी जीवनमूल्ये, सामाजिक मूल्ये व सामाजिक बंधनाची माहिती करून घेणे आवश्यक ठरते. या माहितीवरुन विकास कार्यकर्ता आपले वर्तनदेखील त्याप्रमाणे ठेवून लोकांचा विश्वास संपादन करु शकतो.

**४) समाजातील लोकांच्या मनोवृत्तीत परिवर्तन घडवून आणणे** : सामुदायिक विकास कार्यात परिवर्तनाच्या तत्वाला अतिशय महत्व आहे. परिवर्तनाकरिता शिक्षण आवश्यक असते. सामुदायिक विकास कार्याव्दारे स्थायी स्वरुपाचे सामाजिक परिवर्तन घडवून आणावयाचे असेल तर ते ग्रामीण लोकांच्या इच्छेतुनच निर्माण व्हावयास पाहिजे. म्हणजे त्याच्या वर्तनात होणारे बदल आत्मिक राहुन स्थायी असतील. यामुळे ग्रामीण लोक स्वप्रयत्नातून स्वतःच्या विकासाकरिता कार्य करण्यास प्रवृत्त होतील. त्याच्या ज्ञानात विचारात, इच्छेत, प्रवृत्तीत आणि योग्यतेत आंतरिक बदल झाल्यास ते स्वतःपुढाकार घेऊन कार्य करावयास तयार होतील.

**५) सामुदायिक विकास हा सतत चालणारा शैक्षणिक कार्यक्रम आहे** : सामुदायिक विकास कार्याव्दारे ग्रामीण लोकांच्या ज्ञानात, विचारात सवयीत, विचार पध्दतीत आणि परस्पर संबंधात परिवर्तन घडवून आणावयाचे आहे. तसेच ग्रामीण लोकांचे शिक्षण, आरोग्य कृषि व इतर व्यवसाय, गृहव्यवस्था इत्यादी क्षेत्रामध्ये बदल घडवून आणावयाचा आहे. या परिवर्तनात ग्रामीण समाजाच्या भौतिक रचनेचासूध्दा समावेश होतो. हे सर्व प्रकारचे परिवर्तन शिक्षणाशिवाय होऊ शकत नाही. मग ते औपचारिक, अनौपचारिक व कोणत्याही प्रकारचे शिक्षण असो म्हणून हा एक शैक्षणिक कार्यक्रम आहे. तसेच वरील सर्व बाबतीत एकदम परिवर्तन घडवून आणल्या जाऊ शकत नाही. परिवर्तनाचा एक कायक्रम सपला की, विकास कार्यकर्त्याला दुसरा सुरु करावा लागतो. समाजाच्या गरजा अनेक असल्यामुळे त्या पुर्ण करण्याकरिता सतत कार्यक्रम घ्यावे लागतात, म्हणुन सामुदायिक विकास हा सतत चालणारा व शैक्षणिक कार्यक्रम आहे.

**६) समाजात पुढारी व अनुयायी याचे परस्पर संबंध असतात** : समाजात विविध क्षेत्रात कार्य करणारे वेगवेगळे पढारी असतात. त्याच्या निवडीवरुन त्यांना निवडलेले (Selected), निवडुन आलेले (Elected)

आणि समाजमान्य (Accepted) पुढारी असे तीन प्रकार ग्रामीण समाजात आढळून येतात. सामुदायिक विकासकार्य लोकांचे जास्तीत जास्त सहकार्य मिळवून यशस्वी करण्याकरिता स्थानिक विविध प्रकारच्या पुढाऱ्यांशी ओळख असणे आवश्यक आहे व या कार्यात त्याचा सहभाग असणे महत्वाचे आहे. समाजातील सर्व प्रकारच्या संस्था व संघटनात पुढारी असतात आणि ते आपापल्या संस्था व संघटनेव्दारे लोकांचा सुधारणेचे प्रयत्न करीत असतात. लोकाचा आर्थिक व सामाजिक दर्जा उचावण्यास मदत करीत असतात. प्रत्येक गटातील पुढाऱ्याचा आपल्या गटावर प्रभाव असतो. गटातील पुढारी व अनुयायी यांचे परस्पर संबंध लक्षात घेऊन विकास कार्यकर्त्यांनी आपले सामुदायिक विकासाचे कार्यक्रम अमलात आणावे.

**७) सामुदायिक विकास कार्य लोकांच्या आवश्यक गरजावर आधारलेले असावे :** समाजाच्या अत्यावश्यक, आवश्यक व अनावश्यक प्रकारच्या गरजा असतात. तसेच काही सामाजिक गरजा असे सामाजिक प्रतिष्ठा, मालकी हक्क, इत्यादी तर काही मुलभूत गरजा. उदा. अन्न, वस्त्र, निवारा इत्यादी असतात. या सर्व गरजांना प्राधान्यक्रम देऊन त्यापैकी सर्वाच्या उपयोगाची आणि अत्यावश्यक स्वरुपाच्या गरजेचा प्रथम विचार करुन त्यावर सामुदायिक विकास कार्यक्रम आखावा. या सर्व गरजांची माहिती समाजातील लोकांकडूनच करून घेऊन त्याच्या सल्ल्याने व सहकार्याने कार्यक्रम आखावा म्हणजे तो यशस्वी होऊन सामुदायिक विकासाचे उदिष्ट साध्य होईल.

**८) समुदायात एकी निर्माण करण्याचा प्रयत्न असावा :** सामदायिक विकास कार्याव्दारे समुदायातील दोन पक्ष किंवा गटातील तणाव, संघर्ष, स्पर्धा, वैमनस्य इत्यादी टाळून दूर करुन एकी करण्याचा प्रयत्न केला जावा कारण सामुदायिक विकासाचे कार्य कोणत्याही विशिष्ट व्यक्ती, जात, गट किंवा पक्षाकरिता नसून संपूर्ण समाजाच्या विकासाकरिता आहे. समाजातील तणाव, संघर्ष, स्पर्धा, मतभेद इत्यादी वैयक्तिक मतभेदातून निर्माण झालेले असतात. सामुदायिक विकास कार्यात अशा बाबी निर्माण होऊ न देता त्या कमी करुन एकी घडवून आणण्याचा प्रयत्न करावा व समाजाचा विकास साधावा.

**९) सामुदायिक विकासाचे कार्य लोकांच्या ऐच्छिक सहकार्यावर अवलंबून असते :** सामदायिक विकासाचे कार्य लोकांच्या विकासाकरिता असले तरी या कार्यात त्यांनी सहभागी झालेच पाहिजे अशी जबरदस्ती त्याच्यावर करता येत नाही. त्यांना सामुदायिक विकासाचे महत्व पटवून दिल्यास ते आपले सहकार्य या कामी देऊ शकतील समुदायातील नेत्यांना व संस्था आणि संघटनांना सामुदायिक विकास कार्यात सहभागी करून घेतल्यास लोकांवर त्याचा परिणाम होऊन ते या कार्यात सहभागी होतात. विकास जरी लोकांचाच घडवून आणावयाचा असला तरी त्यांच्या मनाविरुध्द त्याचे सहकार्य न मिळविता अतः करणपूर्वक सहकार्य प्राप्त केले तर ते अधिक टिकाऊ, सक्रिय व दुसऱ्याला उत्तेजन देणारे ठरते.

**१०) सामुदायिक विकासाचा कार्यक्रम स्वप्रयत्नांवर आधारित असावा :** लोकांनी आपले प्रश्न सोडविण्याकरिता स्वतःच योजना तयार करणे व त्यांनी त्या स्वप्रयत्नातूनच सोडविणे आवश्यक असते. त्यासाठी, त्याच्यात शिक्षणाव्दारे परिवर्तन घडवून आणावे लागते. त्यांना त्यांच्या गरजांची जाणीव करून देऊन त्या सोडविण्याची आवश्यकता निर्माण करणे, त्याच्यामध्ये उच्च राहणीमानाबद्दल अपेक्षा निर्माण करणे व या गरजा सोडविण्याचे कामी त्यानीच स्वत: पुढाकार घेऊन कार्य करण्यास प्रोत्साहीत करणे आवश्यक आहे. सरकारनी आपल्या गरजा पूर्ण करुन द्याव्यात ही त्याच्यातील भावना व अपेक्षा नष्ट करुन लोकांना विकासाकरिता प्रवृत्त करणे व या कामी सरकारकडून तांत्रिक मदत व मार्गदर्शन मिळेल याची लोकांना कल्पना देऊन स्वमदतीच्या कल्पनेनुसार लोकांचा विकास घडवून आणावा.

**११) विकास कार्यकर्त्यांनी सामुदायिक निर्णयावर कार्यक्रम आखावा :** सामुदायिक विकासाचे कार्यक्रम आखतांना कोणतीही विशिष्ट व्यक्ती, गट, जात, याच्याकरिता कार्यक्रम न आखता सर्व समाजाची जी आवश्यक गरज असेल ती सोडविण्याकरिता सर्व लोकांनी घेतलेल्या निर्णयानुसार कार्यक्रम आखावा, तसेच कार्यक्रमाचे नियोजन व अमलबजावणी करतांनासुध्दा वेळोवेळी सामुदायिक निर्णय घेऊन त्यानुसार कार्य करावे. सामुदायिक कार्यात प्रत्येक वेळी लोकशाही तत्याचा वापर करुन या कार्याची जास्तीत जास्त जबाबदारी लोकांवर सोपवून कार्याच्या यशाचे मानकरी त्यांनाच केल्यास ते अधिक उपयुक्त ठरते.

**१२) लोकविकासाचे कार्यक्रम लोकांकडून पूर्ण करुन घेण्याकरिता विकास:** कार्यकर्त्याने लोकांशी विशेषतः पुढारी व मान्यवर लोकांशी मित्रत्वाचे व विश्वसनीय संबंध प्रस्थापित करुन लोकांचा विश्वास संपादन करावा, वेळोवेळी त्याचे मत व सल्ला लक्षात घेऊनच कार्य करावे व लोकांचे जास्तीत जास्त सहकार्य मिळवून कार्य यशस्वी करावे. यासाठी सुरुवातीला हाती घेतलेले विकासाचे कार्य सोपे व हमखास यशस्वी होईल असेच असावे. पहिल्या कार्यात यश मिळाल्याने लोकांचा विकास कार्याबद्दलचा दृष्टीकोन अनुकुल होऊन पुढील कार्यात ते अधिक आत्मविश्वासपूर्वक भाग घेतात.

**सामुदायिक विकासकार्यातील काही मर्यादा**

भारतातील सामुदायिक कार्यावर काही मर्यादा पडतात. ज्यामुळे देशाची अपेक्षित अशी प्रगती होऊ शकत नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे आपल्या देशातील बहुसंख्य जनता अशिक्षित, अज्ञानी, रुढीवादी व परंपरावादी आहे. त्यांना शिक्षण देऊन नवीन विचार प्रवाहाला अनुकूल करुन घेणे अतिशय कठीण कार्य आहे. शास्त्रीय दृष्टिकोण व पध्दतीचा अंगीकार करणे आणि त्यासाठी त्यांच्यात आवश्यक ते परिवर्तन घडवून आणणे ही एक दिर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे. बहुसंख्य लोक आपल्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्यास तयार होत नाहीत कारण त्याची रुढीवादी विचारसरणी व सामाजिक रीतीरिवाज यावर जास्त विश्वास असतो. म्हणून सामुदायिक विकास कार्याला काही विशिष्ट मर्यादेपर्यंत यश मिळु शकते.

सामुदायिक विकास कार्यात लोकांचा सक्रिय सहभाग पाहिजे. तो त्या प्रमाणात मिळत नाही. त्यामुळे निश्चित केलेले ध्येय किंवा उद्देश सफल होत नाही. सामुदायिक विकासाची चळवळ अजुनही लोकांना पूर्णपणे अवगत झालेली नाही. सामुदायिक विकासाचे कार्य आपले कार्य न समजता तो सरकारी कार्यक्रम समजला जातो. आपल्या विकासाची संपूर्ण जबाबदारी सरकारची आहे असा समज लोकांचा झालेला असतो. वास्तविक पाहता सामुदायिक विकास म्हणजे लोकांच्या योजना सहकारी मदतीने राबविणे होय. याउलट लोकांच्या मदतीने सरकारी कार्यक्रम असा लोकांचा समज असल्याने सामुदायिक विकासाच्या मुळ उद्देशावरच आघात होत आहे. लोकांना सामुदायिक विकासामधील आपली जबाबदारी ओळखता न आल्याने या कार्यावर काही प्रमाणात मर्यादा आलेल्या आहेत.

सामुदायिक विकासाचे स्वरुप व्यापक असले तरी देशातील सर्व ग्रामीणाच्या गरजा त्याव्दारे पूर्णपणे सोडविल्या जाऊ शकत नाही. सामुदायिक विकास ही एक पध्दती आहे, त्याव्दारे सरकारी आर्थिक मदत व तांत्रिक मार्गदर्शन मिळवून लोकांच्या गरजा सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. आतापर्यंत सरकारकडून पुरेशा प्रमाणात आर्थिक सहाय्य न मिळाल्याने तसेच अपेक्षित प्रमाणात सरकारी अधिकारी व कर्मचारी याचे सहकार्य न मिळाल्याने सामुदायिक विकासाला पाहिजे त्या प्रमाणात यश मिळू शकले नाही. ग्रामीण विकासाकरिता स्थानिक वित्तीय साधने आवश्यक असतात. परंतू खेड्यातील लोक गरीब व निर्धन असल्यामुळे सरकारकडून जास्तीत जास्त आर्थिक मदतीची अपेक्षा केली जाते. वास्तविक पाहता सामुदायिक विकासामध्ये जास्तीत जास्त स्थानिक उपलब्ध साधनसंपत्तीचा उपयोग करून विकास कार्य करावयाचे होते. परंतु लोक सरकारवर अवलंबुन राहु लागल्याने विकास कार्याला गती मिळू शकली नाही.

सामुदायिक विकासान्तर्गत ग्रामीण लोकांच्या गरजा सोडविण्याकरिता विशेषतज्ञांच्या सेवा आवश्यक असतात. परंतु सामुदायिक विकासाच्या प्रशासनिक यंत्रणेमध्ये विषयतज्ञ लोकांना विशेष स्थान देण्यात आलेले नाही. विकास कार्याच्या विभिन्न क्षेत्रात व सरकारच्या विभिन्न विभागात परस्पर समन्वय कमी प्रमाणात दिसून येतो. विकास कार्यकर्ते आपल्या कार्याविषयी असमाधानी असल्याने फारसे जागरुक नाहीत आणि असे कार्यकर्ते विकासकार्याचे उत्कृष्ट संघटन करु शकत नाहीत.

सामुदायिक विकासकार्यात सर्वाधिक प्राधान्य साध्य किंवा उद्देशपूर्तीला दिले जाऊन त्याकरिता वापरल्या जाणाऱ्या पध्दतीला फारसे महत्व नाही. त्यामुळे लोकांच्या विचारसरणीमध्ये बदल तसेच सामाजिक परिवर्तन योग्य रितीने होऊ शकत नाही. सामुदायिक विकासाच्या उद्देशाने योग्य आकलन न

झाल्याने मूळ उद्देशाकडे दुर्लक्ष होऊन सामुदायिक विकासाकरिता आवश्यक असलेल्या बाबीला प्राधान्य देण्यात येत नाही.

भारताच्या ग्रामीण क्षेत्रात योग्य कर्तुत्वशील नेतृत्वाचा अभाव आहे. योग्य नेतृत्वाच्या अभावी ग्रामीण समस्या सफलतापूर्वक सुटु शकणार नाहीत. ग्रामीण नेतृत्व फक्त राजकिय स्वरुपाचेच असून इतर क्षेत्रात नेतृत्व असून नसल्यासारखेच आहे. उच्च राजकिय नेतृत्व प्राप्त करुन घेण्यासाठी खेड्यातील लोकांत फुट व जातीयवाद निर्माण करून लोकांची निर्धनता, अशिक्षितपणा, अज्ञान याचा फायदा घेऊन वैयक्तीक स्वार्थ साधण्याचा प्रयत्न केला जातो.

भारतातील सामुदायिक विकासाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

भारतामध्ये सामुदायिक विकासाची कल्पना नवीन नाही, तर ती आपल्या संस्कृतीमध्ये मिळालेली आहे. सामुदायिक विकास या संज्ञेत दोन घटक आहेत. त्यापैकी, सामुदायिक या शब्दावरुन समुदायाचा बोध होतो. समुदाय म्हणजे लोकांचे एकत्रिकरण असून त्यावरुन सहकारी **तत्वे**, परस्पर आदर व प्रेम आणि निश्चित बाबीची जबाबदारी या विषयीची कल्पना येते. विकास या शब्दावरुन तंत्रज्ञान, प्रशासन, सेवा पुरवठा, पध्दती, क्रिया, कार्यक्रम, योजना, प्रक्रिया याव्दारे प्रगती असा अर्थ प्रतीत होतो. भारतातील सामुदायीक विकासामध्ये आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकिय, मानसिक प्रगती घडवून आणण्याचा समावेश आहे.

प्राचीन काळी सामुदायिक गटातील लोकांचे संपर्क प्रत्यक्ष असून परस्पर संबंधामध्ये घनिष्टता होती. ऐकमेकाविषयी आदार, प्रेम आपुलकी यांना महत्वाचे स्थान होते. प्राचीन काळातील समुदायाची सामाजिक व्यवस्था त्या काळातील सामाजिक मूल्य पध्दतीवर आधारलेली असून प्रत्येक व्यक्ती आपल्याकडे सोपविलेली सामजिक जबाबदारी पूर्ण करुन व समाजाच्या गरजा भागवून समुदायाची सेवा करीत असे, तर समुदाय याबदल्यात त्यांना आवश्यक सेवा, प्राकृतिक स्वातंत्र्य, स्वविकास साधण्याची महत्तम अनुकुल संधी देत असे. समाज कल्याणाच्या या कल्पनेत व्यक्ती, समुदाय आणि राज्य हे तीनही घटक परस्परावर अवलंबून होते आणि त्याकरिता ऐकमेकांना मदत व सहकार्य करीत होते. प्राचीन काळी राज्यकल्याणाची कल्पना पूर्णत्वाला पोहचले असून समुदायामध्ये एकता आणि सामुदायिक ऐक्य महत्तम होते. समाजातील सत्तेचे विकेंद्रीकरण हे त्या काळातील समाजाचे वैशिष्ट्य असून ग्रामीण समाज सर्वअर्थाने स्वायत्त, स्वंयपुर्ण आणि समृध्द होता. व्यक्तीपेक्षा समाज श्रेष्ठ ही भावना त्या काळात लोकांच्या मनावर खोलवर रुजलेली होती.

भारतातील समृध्दीच्या अभिलाषेपोटी परकीयांची अनेक आक्रमणे होऊन शेवटी मोगलांची सत्ता प्रस्थापित झाली. मोगल काळात खेड्याची पूर्वीची स्वायत्ता, समृध्दी, स्वयंपूर्तता कमी होऊन ग्रामीण समाज काही प्रमाणात परस्परापासून विभक्त झाला. या मध्ययुगीन काळात मोगल सत्तेने जहागिरीचे वाटप करण्याची पध्दती सुरु करुन प्रजा व सत्ताधिकारी यांच्यातील परस्पर संबंध कमी करुन दोघातील अंतर वाढविले. प्रजा व राजा यांच्यामध्ये मध्यस्थ निर्माण होऊन त्यांना शासकाकडून काही अधिकार व सत्ता सुपूर्त करण्यात आली. असे असले तरी खेड्याचे अस्तित्व काही प्रमाणात अबाधित राहिले.

व्यापाराच्या उद्देशाने तराजू घेऊन आलेल्या इंग्रजांनी हाती तलवार घेऊन भारतात अठराव्या शतकाच्याशेवटी आपली अबाधित सत्ता कायम केली. ब्रिटीश शासन काळात खेड्याने जतन करून ठेवलेली वैशिष्ट्ये शासनाने नाहीशी केली. ब्रिटीशांच्या केंद्रशासित व्यवस्थेमुळे ग्रामीण संस्था व लोकांच्या सांधिक जीवनाला तडा जाऊन ग्रामीण जीवन उध्वस्त झाले. स्वंयपूर्तता व स्वयंशासनाची सवय नष्ट झाली. व्यक्ती आत्मकेद्रित झाल्याने नवीन ज्ञान, नवीन कल्पना, नवीन ध्येय यांना समाजजीवनात वाव मिळेनासा झाला इंग्रजानी मोठ्या शहरात उद्योगधंदे व कारखाने सुरु केल्याने ग्रामीण हस्तव्यवसाय व उद्योगधंदे बंद पडलेत. परपरागत ग्रामपंचायती, न्यायपंचायती, जात पंचायती व कौटुंबिक जीवनाचे विघटन होऊन व्यक्तीस्वातंत्र्याच्या कल्पना बळावल्या. ग्रामीण क्षेत्रात जमीनदारांचा वर्ग निर्माण झाल्याने श्रीमंत अधिक श्रीमंत तर गरीब अधिक गरीब होऊन श्रीमंत व गरीब यातील अंतर वाढल्याने आर्थिक विषमता निर्माण झाली. थोडक्यात, औद्योगिक क्रांती व ब्रिटीशांची

बळकट केंद्रशासित सत्ता यामुळे परपरागत भारतीय ग्रामीण समाजाची मोठ्या प्रमाणावर आधोगती झाली व त्यातून अनेक समस्या निर्माण झाल्या.

ग्रामीण समस्या सोडविण्यासाठी तत्कालीन विचारवंत, साहित्यीक, संस्थानिक, समाजसुधारक, सामाजिक व राजकिय कार्यकर्ते यांनी आपपल्यापरीने ग्रामीण पुनरर्चनेच्या कल्पना मांडून त्या कार्यान्वीत करण्याचे प्रयत्नही केले. १९ व्या शतकात भारतामध्ये एकुण ३३ वेळा दुष्काळ पडलेत. यापैकी सर्वात जास्त म्हणजे १८ दुष्काळ १८७५ ते १९०१ या काळातील आहेत. यामुळे ब्रिटीश सरकारला देखील ग्रामीण विकासाकडे लक्ष द्यावे लागले.

अगोदर झालेल्या सामुदायिक विकास कार्यात ग्रामीण पुनर्रचनेच्या, अनेक विचारवंत, साहित्यीक, संस्थानिक, समाजसुधारक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, संस्था, संघटना राज्यसरकार आणि केंद्रसरकारने सुध्दा केलेल्या कार्याचा आढावा घेऊन त्याची विभागणी केली तर काळानुसार आपण त्यांना तीन कालखंडात विभागू शकतो.

**१. पहिले पर्व - १८६० ते १९२०**

**२. दुसरे पर्व -१९२० ते १९४७**

**३. तिसरे पर्व - १९४७ नंतर (स्वातंत्र्यप्राप्तीनंतर)**

**१) पहिले पर्व १८६० ते १९२० :**

या काळात सांमतशाही किंवा जहागिरदारी सत्ता नष्ट होऊन जमीनदारी पध्दती अस्तित्वात आली. लोकांवर पाश्चात्य शिक्षणाचा परिणाम होऊ लागला. सामुदायिक विकासाविषयी अर्धवट जागृती दिसून येऊ लागली. अनेक वेळा पडलेल्या दुष्काळांमुळे ब्रिटीश सरकारलादेखील भारतीयांच्या दैन्यावस्थेबद्दल विचार करावा लागला. त्यासाठी सरकारने ग्रामीण लोकांच्या परिस्थितीचा अभ्यास करुन ग्राम विकासकार्य सुरु करण्याची शिफारस इंग्रज सरकारला केली आणि त्याचाच परिणाम म्हणून या काळात विविध कायदे करण्यात आले.

१८८८ साली "जमीन सुधार कर्ज कायदा"' व "शेती कर्ज कायदा' करुन शेती विकास व पशुसंवर्धनासाठी स्वतंत्र खाती सुरु करण्यात आली. श्री. फ्रेडरिक निकोल्सन यांनी ग्रामीणांची ऋणग्रस्तता व त्यावरील उपाय याचा अभ्यास करून ग्रामीण क्षेत्रात सरकारी समित्या स्थापन करण्याचा आग्रह धरला त्यामुळे १९०४ साली 'सहकार समिती कायदा' होऊन, १९१२ साली त्यात सुधारणा करण्यात आली. सर डॅनियल हॅमिल्टन यांनी १९०० मध्ये बंगाल मधील सुंदरबन भागात सहकारी तत्वावर आदर्श खेडी निर्माण करण्याची योजना आखली तसेच १९२४ मध्ये सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक व को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग सोसायटी व १९३४ मध्ये ग्रामीण पुनर्रचना संस्था स्थापन केली.

याच काळात ग्रामीण विकासाचे सर्वात जास्त व महत्वाचे कार्य खिश्चन धर्मप्रसारक संस्थानी केले. परंतू त्याचे कार्य धर्मातर करुन खिश्चन झालेल्या लोकांकरिताच मर्यादित होते. खिश्चन धर्मप्रसारकांनी शिक्षण, आरोग्य **व** ग्रामविकास याकडे अधिक लक्ष दिले. लोकांना शिक्षण देण्यासाठी अंदाजे २००० प्राथमिक शाळा, ३२५ दुय्यम शाळा व ३८ महाविद्यालये स्थापन केली. आरोग्य सेवेसाठी सर्व देशभर कारखाने उघडण्यात आले. तसेच औषधी योजना नर्शिगबाबत प्रशिक्षण देण्याची केंद्रे सरू करण्यात आली. ग्रामविकासासाठी रामनाथपूर, पांडेचरी, त्रावनकोर येथे प्रायोगिक केंद्रे उभारून शेती, कुकुटपालन विणकाम, याबद्दल प्रशिक्षण देण्यासाठी प्रदर्शनव्याख्याने, समारंभ आयोजित करण्यात येत होते.

धर्मोपदेशकांनी सुरु केलेले कार्य धर्मप्रसाराच्या दृष्टिकोनातून असले तरी धर्मातरित खिश्चन लोकांच्या सुधारणेसाठी होते. त्यांनी केलेल्या कार्याचा परिणाम केरळ, गोवा, मद्रास या भागात व समुद्र किनाऱ्यावरील खेड्यात जास्त दिसून येतो.

**२) दुसरे पर्व (१९२० ते १९४७) :**

या काळामध्ये ब्रिटीश राजसत्तेविरुध्द भारतीय लोकांमध्ये असंतोष शिगेला पोहचून राष्ट्रीयत्वाची भावना जागृत झाली व त्याचा शेवट भारताला स्वातंत्र्य मिळण्यात झाला. याच काळामध्ये भारतात

ग्रामीण विकासाच्या दृष्टिने Y.M.C.A. (Young Men Christan Association) व I.V.S. (Indian Village Services) सारख्या धर्मप्रसारक संस्थानी, डॉ. रविंद्रनाथ टागोर, महात्मागांधी सारख्या देशभक्त व समाजसुधारकांनी, श्री.बायने सारख्या सरकारी अधिकाऱ्यांनी त्रावणकोर, बडोदा येथील संस्थानिकानी तर काही संस्था व संघटनांनी कार्य केले. यापैकी काही प्रयत्न विशिष्ट मर्यादित क्षेत्रामध्ये काही जिल्हा, काही संस्थाने, काही राज्यकरिता तर काही संपुर्ण भारताकरिता होते.

भारतीयांचा इंग्रजी राजवटीविरुध्द रोष पाहुन तत्कालीन शासनानेही १९३५-३६ मध्ये ग्रामीण विकास कार्यासाठी "ग्रामोध्दार मंडळाची स्थापना करून त्याची जबाबदारी प्रांतिक सरकारवर सोपविली व त्याकरिता केंद्रसरकारने आर्थिक सहाय्य देऊन मंडळामार्फत ग्रामीण विकास कार्याची सुरुवात केली. या व्यक्तिरिक्त, कृषिविषयक 'रॉयल कमिशन' नेमुन व 'अधिक धान्य पिकवा' मोहिम सुरु करून विकासकार्याला चालना देण्याचे प्रयत्न केले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सुरु झालेल्या समुदायीक विकासकार्याला चालना देण्याच्या दृष्टीने भरीव असे कार्य याच पर्वकाळात झाले.

**३) तिसरे पर्व (१९४७ नंतर) :**

भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यावर ग्रामीण विकासाची संपूर्ण जबाबदारी लोकशाही शासनावर येऊन पडली. त्यादृष्टीने भारत सरकारने पंचवार्षिक योजना, सामुदायिक विकास योजना, राष्ट्रीय विस्तार योजना, पंचायतीराज्य, सहकारी चळवळ, जमीन सुधारणा इत्यादी योजना राष्ट्रीय स्तरावर सुरु केल्या शिवाय भारतीय ग्राम सेवा, निलोखेरी प्रकल्प, इटावा प्रकल्प, सर्वोदय योजना, भूदान व ग्रामदान चळवळ इत्यादी कार्यक्रम काही नेत्यांनी व समाजसेवकांनी सुरु केल्या.

भारतीय सामुदायिक विकास योजनेला चालना देणारे व प्रेरक ठरलेले स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी व नंतर घेण्यात आलेल्या काही महत्वपुर्ण ग्रामीण पुनर्रचनेच्या प्रकल्पाची सूची पुढील प्रमाणे आहे.

| अ. क. | प्रकल्पाचे/ कार्यक्रमाचे नाव | वर्ष | कार्यकर्ता/संस्था संघटनेचे नाव | कार्यस्थळ व प्रदेश |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री निकेतन प्रकल्प | 1921 | रविंद्रनाथ टागोर | श्रीनिकेतन जिल्हा, बिरभूम प.बं |
| 2 | गुरगाव प्रकल्प | 1927 | एफ.एल. ब्रायने | जिल्हा गुरगाव पंजाब |
| 3 | मारथ्याडम प्रकल्प | 1928 | डॉ.स्पेन्सर हॅच | मारथ्याडम, तामिळनाडू |
| 4 | बडोदा योजना | 1933 | व्ही.टी.कृष्णामाचारी | बडोदा संस्थान, गुजरात |
| 5 | सेवाग्राम प्रकल्प | 1936 | महात्मा गांधी | सेवाग्राम, वर्धा, महाराष्ट्र |
| 6 | अधिक धान्य पिकवा | 1942 | भारत सरकार | सर्व भारतात |
| 7 | भारतीय ग्रामसेवा | 1945 | विलीयम वायजर | आलेगंज (कानपूर)यु.पी. |
| 8 | फिरका विकास योजना | 1946 | मद्रास राज्य सरकार | मद्रास राज्य |
| 9 | इटावा पायलट प्रकल्प | 1948 | अल्बर्ट मेयर | महेवा(इटावा जिल्हा)यु.पी. |
| 10 | निलोखेरी प्रकल्प | 1948 | सुशिलकुमार डे | निलोखेरी(कुरुक्षेत्र) हरियाना |
| 11 | सर्वोदय योजना | 1948 | मुंबई राज्य सरकार | मुंबई राज्य |
| 12 | भूदान व ग्रामदान चळवळ | 1951-1952 | विनोबा भावे | भारत |

**सेवाग्राम प्रकल्प - महात्मा गांधी** (१९३६)

रविंद्रनाथ टागोर, ब्रायने, हॅच यांनी ग्रामीण पुर्नरचनेचे घेतलेले कार्यक्रम हे विशिष्ट मर्यादित क्षेत्राकरिताच होते. परंतू गांधीजीनी हिंदुस्थानातील ७ लाख खेड्यातील लोकांच्या विकासाचे प्रयत्न करण्यात यावे असे प्रतिपादन करुन ग्रामीण लोकांचा विकास घडवून आणल्याशिवाय भारताचा विकास होऊ शकणार नाही. असे आपले ठाम मत व्यक्त केले. गांधीजींच्या ग्रामीण पुनर्रचनेच्या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश हिंदुस्थानातील प्रत्येक खेडे स्वावलंबी, स्वायत्त व स्वंयपुर्ण करण्याचा होता. ग्रामीण जीवनाचे तत्वज्ञान आणि खेड्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी लक्षात घेऊन लोकांच्या आर्थिक परिस्थितीला अनुरुप असे कार्यक्रम घेऊन सुधारणा घडवून आणावी असा त्याचा विचार होता.

गांधीजी १९१७ मध्ये चंपारण्यामधील निळीची शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या व शेतमजूराच्या सानिध्यात आले. त्यांना तेथे मोठ्या प्रमाणात गरीबी, अज्ञान, अशिक्षितता आणि अनारोग्य आढळून आले. चंपारण्यातील खेड्यानी भारतीय खेड्याचे आदर्श चित्र त्यांच्या गरजेनुसार उपस्थित केले. तेथील लोकांचा विकास साधण्यासाठी म्हणून शिक्षण, आरोग्य, व स्वच्छता इत्यादी क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्याचे कार्य त्यांनी सुरु केले. गांधीजीचे चंपारण्यामधील आठ महिने अल्पकालावधीचे वास्तव्य आणि तेथील स्थानिक नेत्यांकडन मिळालेला अल्पप्रतिसाद यामुळे गांधीजीच्या पुर्नरचनेचा हा प्रथम प्रयत्न यशस्वी झाला नाही. तरीही राजकिय क्षेत्रातील सत्याग्रहाच्या अस्त्राबरोबरच ग्रामीण पुनर्रचनेसाठी कराव्या लागणाऱ्या कार्याची कल्पना व प्रेरणा येथूनच मिळाली.

**सेवाग्राम येथील कार्य :**

गांधीजींनी विविध क्षेत्रामध्ये केलेले कार्य भारतीय माणूस कधीही विसरु शकणार नाही. ग्रामीण क्षेत्रातील बेकारी आणि अर्ध बेकारीची तीव्रता कमी करण्यासाठी त्यांनी १९२५ मध्ये 'अखिल भारतीय विणकर संघटना व १९३४ मध्ये 'अखिल भारतीय ग्रामीण उद्योग संघटना' सुरु केल्या. ज्याचे मुख्य ध्येय खादीचा प्रसार करण्याचे आणि ग्रामीण क्षेत्रातील ऱ्हास पावत चाललेल्या उद्योगधंद्याचे पुनरूज्जीवन करुन खेड्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याचे होते.

गांधीजीनी ग्रामीण विकासाचे कार्य १९३१ पासून सुरु केले असले तरी ते अधिक प्रभावीपणे करण्यासाठी एप्रिल १९३६ मध्ये वर्धा शहराजवळील ६०० लोकवस्ती असलेल्या शेगांव (सेवाग्राम) या खेड्यामध्ये स्थायी झाले. या खेड्यामध्ये अनेक सोयीचा आणि आवश्यक बाबीचा अभाव होता. गांधीजीने आपल्या वयाच्या ६७ व्या वर्षी सेवाग्राम येथे स्थापन केलेल्या आश्रमात माती आणि बांबू यांच्या सहाय्याने तयार केलेल्या एका खोलीत राहुन ग्रामीण विकासावर आपले लक्ष केंद्रीत केले. ग्रामीण सुधारणेच्या दृष्टीने आरोग्य व स्वच्छता ही महत्वाची बाब असल्याने गांधीजीनी आपल्या कार्यकर्त्यासोबत रस्ते झाडून स्वच्छता निर्माण करण्याचे तसेच लोकांना विशिष्ट ठिकाणी मलमूत्रविसर्जन करण्यासाठी प्रवृत्त केले. आपल्या मुलांना शाळेत पाठवून शिक्षणासोबत विशिष्ट व्यवसायाचे शिक्षण घेण्यासाठी सांगण्यात आले. अखिल भारतीय ग्रामीण उद्योग संघटनेच्या मदतीने काही उद्योग या खेड्यामध्ये निर्माण करून लोकांनी आपल्या फुरसतीच्या वेळेचा उपयोग हे उद्योग करण्यामध्ये करावा असे सांगितले. आश्रमाच्या काही भागात ऊस आणि पपया या पिकांची लागवड करुन तसेच सुधारित कृषितंत्राचा उपयोग लोकांना प्रात्यक्षिकाव्दारे दाखविण्यात आला. छोट्या प्रमाणावर दुग्धव्यवसाय आणि दवाखानाही सुरु करण्यात आला. परंतू सुरुवातीला ग्रामीण लोक या कार्याविषयी साशंक होते. जसेजसे त्याच्या वृत्तीमध्ये नवीन ज्ञान व कृती याविषयी अनुकूल परिवर्तन होत गेले. तसतसा या कार्याचा परिणाम लोकांवर दिसून येऊन लागला. गांधीजीना ग्रामीण पुनर्रचनेच्या या कार्यात अपेक्षित असे यश न मिळण्याचे कारण म्हणजे त्यांनी वयाच्या ६७ व्या वर्षानंतर विकासाचे कार्य सुरु केले आणि याच सुमारास त्यांना राजकारणात सक्रिय भाग घ्यावा लागल्याने ते आपला पूर्ण वेळ या कार्यासाठी देऊ शकले नाही.

गांधीजीच्या ग्रामीण पुनर्रचनेच्या कार्यातील महत्वाचा भाग म्हणजे त्यांनी आपले विकासाचे कार्य अधिक परिणामकारीत्या करुन लोकांना आवश्यक सेवा उपलब्ध करुन देण्याकरिता विविध संस्था व संघटनाची स्थापना केली.

१) अखिल भारतीय विणकर संघटना

२) अखिल भारतीय ग्रामीण उद्योग संघटना 1934

३) गौसेवा संघ

४) आदिम जाती सेवा संघ

५) हरिजन जाती सेवा संघ

६) हिंदुस्थानी तालीमी संघ

७) गांधी सेवा संघ

८) कस्तुरबा ट्रस्ट

या शिवाय खादी विद्यालय (सेवाग्राम) गांधी आश्रम (त्रिचून गोडी) गांधीनिकेतन (कुलूपट्टी) गांधी सेवा सदन (डिन्डीगल) गांधी सेवा सदन (पोरुर मारवाड) कस्तुरबा आश्रम (त्रिचुर) यांची स्थापना केली. या संस्था व संघटना गांधीजींच्या ग्रामीण विकास कार्याच्या कल्पना व संदेश असंख्य खेड्यातील लोकांपर्यंत पोहचविण्याचे कार्य करीत होत्या.

गांधीजीना हिंदुस्थानातील प्रत्येक खेड्याचा कायापालट घडवून आणण्यासाठी करावयाच्या ग्रामीण पुनर्रचनात्मक कार्याची कल्पना खालील बाबीवरुन येते. त्यांना ग्रामीण जीवनाच्या विभिन्न क्षेत्रात विविध पध्दतीने बदल घडवून विकास साधावयाचा होता.

अ) आर्थिक विकास :

१. खादीचा प्रचार व प्रसार

२. ग्रामीण उद्योगांचा विकास

३. पशुपैदासीमध्ये सुधारणा व विकास

४. सामाजिक व आर्थिक समानता सामाजिक विकास

५. सामुदायिक ऐक्य

६. अस्पृश्यता निवारण

७. दारुबंदी

८. महिलांना समान दर्जा

९. आदीवासीचे कल्याण

क) शैक्षणिक विकास :

१०. बुनियादी (Basic) शिक्षण/मुलभूत शिक्षण

११. प्रौढ शिक्षण

१२. प्रांतिय भाषेचा विकास

१३. हिंदी राष्ट्रभाषा म्हणून मान्यता व तिचा विकास

ड) आरोग्यविषयक सुधारणा:

१४. खेड्यात आरोग्य व स्वच्छता कायम ठेवणे

१५. आरोग्यविषयक शिक्षण देणे.

१६. महारोग्याची सेवा शुश्रुषा करणे

इ) राजकिय सुधारणा :

१७. शेतकरी व मजूर यांना न्याय हक्क प्राप्त करून देणे.

१८. सामाजिक कार्याकरिता विद्यार्थ्यांचा उपयोग करुन घेणे.

गांधीजीना देशातील लोकांची गरीबी व भूक मिटवावयाची होती. त्याकरिता त्यांनी खादी व ग्रामीण उद्योगांना चालना देऊन स्वमदत व स्वावलंबनाच्या आधारे प्रामाणिकपणे कार्य करण्याची जिज्ञासा व आवड लोकांमध्ये निर्माण केली. पशुपैदासीमध्ये व पशुसंवर्धनामध्ये सुधारणा घडवून आणण्याची गरज भारतासारख्या कृषिप्रधान देशाला असल्याने त्यादृष्टीनेही लोकांचे उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न केले. गांधीजीना सामाजिक कार्यान्तर्गत देशामध्ये ऐक्य निर्माण करण्यासाठी स्त्रिया, मागासलेल्या जाती व जमातीतील लोकांचा सामाजिक स्तर वाढवावयाचा होता. धर्म, जात, पंथ,

यानुसार लोकामध्ये भेद केला जाऊ नये तसेच हिंदु-मुस्लीम ऐक्य, अस्पृश्यता निवारण, आदीम जातीचे कल्याण, स्त्रियांना कुटंब व समाजयामध्ये मानाचे स्थान इत्यादी सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्न केले. मागासलेल्या जाती जमातीमध्ये दारु पिण्याचे जास्त व्यसन असून त्यामुळे स्त्रिया व मुलावर होणारे अत्याचार नाहीसे करण्यासाठी समाजातच संपूर्ण दारुबंदी केली जावी यादृष्टीनेही त्यांनी कार्य केले.

प्रचलित शिक्षण पध्दती दोषपूर्ण असल्याने गांधीजीनी १९३७ मध्ये ग्रामीण मुलामुलीकरिता सात वर्षे कालावधीची प्राथमिक शिक्षणाची "बुनियादी शिक्षण" (Basic Education) नावाची एक योजना तयार केली, विद्याथ्यांचे शरीर, मन व आत्मा याचा विकास घडवून आणण्याचा उद्देश या योजनेचा असल्याने ही जीवनकेंद्रीत व व्यावसायिक शिक्षणपध्दतीची होती. विद्यार्थीच्या उपजत गुणाचा स्वातंत्र्य मिळून विकास होण्यासाठी त्यांनी अभ्यासक्रमामध्ये चित्रकला, संगीत, सामाजिक शास्त्रे, आरोग्य व स्वच्छता, आहार इत्यादी विषयाचा समावेश केला. गांधीजीच्या मते ही योजना समाजात सामाजिक व्यवस्था प्रस्थापित करण्यास अनुकूल अशी आहे. देशाच्या काही भागात ही योजना सुरु होऊन यशस्वी ठरली.

ग्रामीण पुर्नरचनात्मक कार्यात खेड्यातील आरोग्य व स्वच्छता यांना महत्वपुर्ण स्थान आहे. यासाठी गांधीजीनी आपल्या विकास कार्यकर्त्यांना ग्रामीण लोकांनी आरोग्य व स्वच्छता कायम ठेवण्यासाठी अद्युक्त करावे असे सांगितले कोणत्याही रोगाचा समुळ नायनाट स्वच्छतेनेच होतो. गांधीजीनी लोकांना संतुलित व सकस आहार प्राप्त व्हावा यासाठी आहारात असडीक तांदळ, दळलेले पीठ, सोयाबीन हिरवाभाजीपाला आणि प्रत्येक मोसमामध्ये मिळणारे फळ याचा समावेश करणे हितकारक राहते. यामागील त्याचा दृष्टीकोन म्हणजे समतोल आहाराचे घटक स्वस्त असल्याने प्रत्येकाला त्याचा आपल्या आहारात समावेश करता येईल हा होता. रोग झाल्यावर उपाय करण्यापेक्षा तो मुळात होऊन देणेच योग्य व त्यासाठी सकस आहार, स्वच्छता यांचा उपयोग करावा. त्याच्यामते निसर्ग हाच सर्वात उत्तम डॉक्टर आहे.

गांधीजीचे पुनर्रचनात्मक कार्य समाजाच्या खालच्या स्तरापासून सुरु होऊन वरच्या स्तरातील लोकांमध्येसुध्दा आर्थिक, सामाजिक, शारिरिक, मानसिक आणि राजकिय विकास घडवून आणण्याचे होते. त्यानी आखलेले कार्यक्रम ग्रामीण लोकांच्या दृष्टिकोनातून आखलेले होते. गांधीजीच्या कार्याचे महत्वाचे वैशिष्ट म्हणजे साध्य आणि उत्पन्न यांना विशेष प्राधान्य न देता साधने आणि प्रक्रियेला दिलेले आहे. शैक्षणिक विकासामुळे कोणतेही कार्य साध्य होऊन अल्पमुदतीने ग्रामीण लोक स्वावलंबी होऊ शकतात व त्याच्यात इच्छित बदल घडवून आणला जाऊ शकतो. गांधीजीचे विकास कार्यातील महत्वाचे योगदान म्हणजे विकास कार्याकरिता अहिंसा, सत्य, ब्रम्हचर्य प्रामाणिक, साहसी, स्वदेशी, समभाव व बंधुभाव ठेवणारा ग्रामीण कार्यकर्ता आवश्यक असतो. अशा कार्यकर्त्याने स्थानिक मतभेद किंवा राजकारणामध्ये भाग न घेता सामुहिक विकासाच्या भावनेने कार्य केले तर ते यशस्वी होऊ शकते. गांधीजीनी खेड्यातील उपलब्ध साधने व संपत्तीचा उपयोग करुन उद्योगधंद्याच्या सहाय्याने शेतीव्यवसायातील उत्पन्न वाढवून लोकांचे राहणीमान वाढविण्याचे प्रयत्न केले.

प्रकल्पाच्या मर्यादा :

१) गांधीजीनी विकासाचे कार्य हिंदुस्थानातील सात लाख खेड्याकरिता सुरु केले असल्याने प्रत्येक खेड्याचा विकास घडवून आणण्यासाठी लायक असे ग्रामीण विकास कार्यकर्ते मिळाले नाहीत.

२) ग्रामीण विकास कार्यकर्त्यांना आपापले व्यवसाय सांभाळून विकास कार्य करावयाचे असल्याने

विकास कार्याकरिता पुरेशा वेळ दिला जात नव्हता.

३) प्रत्येक खेड्यामध्ये कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी स्थानिक नेतृत्व निर्माण न झाल्याने लोकांचे अपेक्षित सहकार्य या कार्यक्रमाला मिळू शकले नाही.

# घटक - २

## सामुदायिक संघटना (Community Organization)

सामुदायिक संघटना **(Community Organization)** :सामुदायिक विकास कार्यकर्त्याला ज्या समदायाचा विकास घडवून आणावयाचा आहे अशा समुदायाची विस्तृत माहिती असणे आवश्यक आहे. समाज रचनेच्या अभ्यासावरून प्रभुत्वसंपादित किंवा अर्जित व्यक्तींना शोधून काढून त्याना विकास कार्याचे महत्व पटवून दिल्यास ते जास्त योग्य ठरते. अशा व्यक्तींना समाजात प्रतिष्ठा लाभलेली असते व तिचा उपयोग इतरांवर प्रभाव टाकण्याकरिता करुन घेता येतो. विकास कार्यकर्त्याने सामाजिक उद्देश सामाजिक बंधने, सामाजिक मुल्ये, सामाजिक स्तर, दर्जा, भूमिका, प्रभुत्व, सामाजिक व सांस्कृतिक संबंध, सामाजिक मर्यादा इत्यादी विविध सामाजिक पध्दतीच्या घटकावरुन एक सामाजिक नकाशा मनाशी तयार करावा. ज्यावरून त्याला विकास कार्य करण्यासंबंधीचे मार्गदर्शन वेळोवेळी मिळू शकेल. विकास कार्यकर्त्याला जर या सामाजिक घटक व पध्दतीचे योग्य आकलन झाले तर विकास कार्यावर परिणाम करणाऱ्या विविध घटकांतील संबंध त्याला कळून येतो. समुदायातील समुदाय, सस्था, संघटना, शिक्षण, धर्म, कुटुंब, सामाजिक वर्ग, आरोग्य, संदेशवहन इत्यादीवरून विकासाचे झालेले कार्य लक्षात येऊन पुढील कार्याची दिशा त्याला निश्चित करता येते.

समुदायाचा अर्थ वेगवेगळ्या विचारवंतांनी आपापल्या दृष्टिकोनातुन केलेला आहे. भारतामध्ये समुदाय किंवा समाज म्हटले की, विशिष्ट जात किंवा धर्म यावर आधारित लोकांचा गट नजरेपुढे येतो. "एका विशिष्ट भूभागावर राहणाऱ्या, ज्यातील लोकांचे सामाजिक व धार्मिक भेद लक्षात न घेता साधारपणे कार्य व जीवन एकसारखे आहे अशा लोकांच्या समुहाला समुदाय म्हटले जाते." समुदायात धर्म, जात, वंश, भाषा किंवा व्यवसाय यांना फारसे प्राधान्य न देता तेथील लोकांची जीवनपध्दती एकसारखी असून ऐकमेकाबद्दल प्रेम, आदर, आपुलकी, व सहकार्याची भावना दिसून येते. समुदायात सामाजिक व इतर स्वरुपाचे कार्य करण्यासाठी विविध प्रकारच्या संघटना अस्तित्वात असतात व ज्या समुदायाचा विकास घडवून आणण्यास जबाबदार असतात. या संघटना व्यक्तीचा, कुटुंबाचा पर्यायाने समुदायाचा सर्वांगीण विकास घडवुन आणतात. सामुदायिक संघटना समाजामध्ये जागृती घडवून आणून उपलब्ध सांधनांच्या सहाय्याने सामुहिक गरजा सर्वाच्या सहकार्याने सोडविण्याचे कार्य करतात.

'सामुदायिक संघटना ही एक पध्दती असून तिच्याव्दारे व्यक्तीवर, ती कार्य करीत असलेल्या गटाकडून नैतिक दडपण आणले जाते.'

या व्याख्यावरून त्या व्यक्तीला कार्यक्षेत्र उपलब्ध करून देतात. त्या व्यक्तीला त्या कार्यक्षेत्रातील घटकांच्या परस्परसंबंधीची जाणीव झाल्यास कार्य करणे सोपे जाते.

'लोकांच्या सामान्य हितसंबंधाकरिता आणि भल्याकरिता व्यक्ती आणि गटातील परस्पर संबंध वाढवून सहकार्य करण्याच्या सतत सुरु असलेल्या प्रक्रियेला सामुदायिक संघटना म्हणतात." सामुदायिक संघटना प्रथमतः सामाजिक समायोजन व सोयीशी संबंधीत असून अधिक निश्चितपणे ते समुदायाच्या विविध गटातील परस्पर संबंधाशी निगडीत आहे.

विशिष्ट क्षेत्रातील/क्षेत्रीय भूभागातील समाज कल्याणाच्या गरजा व समाज कल्याणाची साधने यात समायोजन घडवून आणण्याला प्रारंभ करुन ते प्रस्थापित करण्याच्या प्रक्रियेला सामाजिक संघटन म्हणतात, सामुदायिक संघटन ही एक शैक्षणिक प्रक्रिया म्हणून गटातील मतभेद कमी करुन समुदायाच्या भल्याकरिता सहकार्याला चालना देते. सामुदायिक संघटनामुळेच समाजातील संघर्ष कमी होऊन सहकाराची भावना बळावण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जातात. यामुळे स्पर्धेच्या नकारात्मक बाकी सहकाराच्या विधायक बाबिमध्ये बदलविणे शक्य होते. सामुदायिक संघटना कल्याणाच्या दृष्टीने एकत्रित प्रयत्न करण्यासाठी समुदायातील व्यक्ती, गट आणि संस्था याच्यामधील एकत्रित सामाजिक आंतरक्रिया प्राप्त करण्याची प्रक्रिया आहे.

**सामुदायिक संघटनाचे उद्‌देश (**Objectives of Community Development)

सामाजिक कार्याची एक पध्दती म्हणून सामुदायिक मुख्य उद्‌देश समुदायाच्या गरजा आणि आशा आकांक्षाची ओळख करून देऊन त्याना तशी जाणीव करून देणे या दृष्टीने सामुदायिक संघटनाचे कार्य दोन प्रकारचे आहे. एक म्हणजे समुदायाला त्याच्या समस्याची जाणीव करून देणे आणि दसरे म्हणजे या समस्या सोडविण्यासाठी सामुदायिकरीत्या कार्य करण्याकरिता समुदायाला प्रवृत्त करणे, समुदायाच्या प्रत्येक क्षेत्रात काहीतरी समस्या असतात त्याच प्रमाणे त्या सोडविण्याकरिता मानवीश्रम आणि साधने या दोन्ही स्वरुपात उपायही उपलब्ध असतात. सामुदायिक संघटना सामुदायातील समस्या सोडविण्याकरिता योग्य त्या साधनांचा उपयोग करतात. समुदायात कोणत्या सोयी उपलब्ध आहेत आणि कोणत्या सोयीचा अभाव आहे. थोडक्यात म्हणजे उपलब्ध सोयी आणि अपेक्षित सोयी यातील अंतर म्हणजे समस्या हे अंतर कमी करण्याचे कार्य सामुदायिक संघटनांचे असून समाजाच्या कल्याणाच्या गरजा सोडविण्याकरिता उपलब्ध समाज कल्याणाची साधने उपयोगात आणली जातात. सामुदायिक संघटनाचे इतर सर्वसामान्य उद्‌देश पुढील प्रमाणे देता येतील.

**१) समुदायाबद्‌दल जाणीव निर्माण करणे :** समुदायातील ऐक्य भावना व प्रगती घडवून आणण्याकरिता समुदायातील सदस्यामध्ये आपुलकी व एकीची भावना निर्माण करणे आवश्यक आहे. या भावनेमुळेच आपला समुदाय दुसऱ्यापासुन सामाजिकदृष्ट्या अलग दिसून येतो. ज्याप्रमाणे एकत्रीकरणाची ही लोकांमधील जाणीव समुदायाच्या विकासाकरिता आवश्यक आहे. यामुळे समुदायातील लोक सामुदायिकरित्या कार्य करुन संपूर्ण विकास घडवून आणतात.

**२) असाध्य गरजा सोडविणे :** समुदायाच्या अशा काही गरजा असतात की, ज्या एका व्यक्तीकडून वा गटाकडुन सोडविल्या जाऊ शकत नाही. त्या गरजा समुदायातील सर्व लोकांच्या सामुदायिक प्रयत्नानेच सुटु शकतात. या समस्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक किंवा अन्य क्षेत्रातीलही असू शकतात. सामूहिक कार्य समुदायाच्या एकत्रिकरणासाठी आणि कार्याला चालना देण्यासाठी आवश्यक असते. समाजातील या असाध्य आणि कठिण समस्यांची निवड करून त्या सोडविण्याच्या दृष्टीने निश्चय करुन प्रयत्न करावे लागतात.

**३) समाजीकरणाचे साधन म्हणून सामाजिक सहकार्य मिळविणे :** सर्व मानवी संघटनाचे अंतीम ध्येय म्हणजे संघटनातील सदस्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास घडवून आणण्याचे असते. समुदायात अनेकविध प्रकारचे गट असून त्यात समुदायातील लोक विभागले जातात. त्यापैकी काही व्यक्ती किंवा कुटूंब कोणत्याही सामाजिक गटाचे वा संघटनाचे सदस्य नसतात. त्यांना फक्त आपल्या कुटूंबाशी किंवा जास्तीत जास्त शेजाऱ्यांशी थोडा संबध ठेवतात. अशा लोकांना सामुदायिक संघटनामध्ये सहभागी करुन घेण्याकरिता त्यांना अनुरुप व उपयुक्त कार्यक्रम घेणे आवश्यक ठरते. सामुदायिक संघटनाव्दारे सामुहिक कार्यात समुदायातील व्यक्ती किती प्रमाणावर सहभागी होतात यावर **समाजीकरणाचे प्रमाण अवलंबुन असते**.

**४) सामाजिक नियंत्रण ठेवणे:** सामुदायिक संघटना लोकांची समुदायाबद्‌लची निष्ठा व आपुलकी याव्दारे तसेच लोकांच्या चाली, रीती, रुढी, प्रथा, रीतीरिवाज याव्दारे समाजात नियंत्रण ठेवीत असतात. समुदायाबद्‌दलच्या निष्ठेचा विकास, ऐक्यभावना आणि सामुदायिक कार्याचे उद्‌देश दर्शविणारे काही संकेत यावरुन सामाजिक नियंत्रण ठेवणे शक्य होत असते. यादृष्टीने नीतीमत्ता, सामुहिक ऐक्य व समुदायाबद्‌दलची निष्ठा हे तीन घटक महत्वाचे ठरतात.

**५) विविध गट आणि कार्य यामध्ये समन्वय साधणे :** प्रत्येक समुदायात विविध प्रकारचे गट असतात. प्रत्येक गटाची आवड त्यादृष्टीने कार्य व पध्दती वेगवेगळी असते. यामुळे विविध गटाच्या कार्यामध्ये मतभेद व संघर्ष वाढीला लागू शकतो. या दृष्टीने गटागटातील मतभेद व संघर्ष टाळून त्याच्यामध्ये व त्याच्या कार्यामध्ये समन्वय घडवून आणून एकमेकांना सहकार्य करण्याकरीता समुदायात सामुदायिक संघटना असणे आवश्यक आहे. मतभेद कमी झाल्याने प्रत्येक गटाची कार्यक्षमता वाढते त्यामुळे विकासाचे इच्छित साध्य पूर्ण करण्यासाठी प्रत्येक गटाच्या क्षमतेला चालना मिळते.

**६) अनिष्ट परिस्थिती व घटकांपासून समुदायाचे संरक्षण करणे :** समुदायातील लोकांचा विकास समुदायातच घडवून आणणे पुरेसे नसते तर त्याचबरोबर समुदायातील लोकांचे अनिष्ट घटना किंवा परिस्थितीपासून संरक्षण करण्याचे महत्वाचे कार्य सामुदायीक संघटनाला करावे लागते. शारीरिक व सामाजिक आरोग्याला विघातक असलेल्या बाबीचे उच्चाटन करणे सामुदायिक संघटनालाच शक्य होत असते.

**७) सर्वसाधारण गरजा पूर्ण करण्याकरिता इतर समूह / समुदायाशी सहकार्य करणे :** बरेचदा समुदाय अतिशय लहान असल्यास त्याला आपले इच्छित ध्येय साध्य करता येत नाही. अशावेळी दोन व अधिक समुदायाची/समुहाची एकच समस्या असेल उदा. रस्ता तयार करणे, पिण्याच्या पाण्याची सोय, शाळा इत्यादी तर त्या सोडविण्याकरिता दुसऱ्या जवळच्या समुदायाचे सहकार्य घेऊन अशा समस्या सोडविणे अधिक हितावह ठरते. या कामी सामुदायिक संघटनाच पुढाकार घेऊन कार्य करू शकतात.

**८) मतैक्य निर्माण करणे :** समुदायात सामुहिक कार्य करण्यासाठी समाजातील सर्वसाधारण गरजा निश्चित करणे आवश्यक आहे. लहान समुदायात लोकांशी चर्चा करुन हे शक्य होते. परंतु गप्पा, लोकवार्तेव्दारे गरजेचा विपर्यास केल्याने त्या गरजा सोडविण्यासाठी लोकांत मतैक्य होण्याऐवजी मतभेद निर्माण होतात. समाजातील समस्यविषयी मतैक्य घडवन आणण्याकरिता गटातील लोकांची किंवा त्यांच्या प्रतिनिधीची सभा ठराविक ठिकाणी घेऊन त्यात लोकशाही पध्दतीने समस्येवर चर्चा करून निर्णय घेणे आवश्यक असते. सामुदायिक सघटनाने कोणत्यातरी पध्दतीने किंवा साधनांचा उपयोग करुन समुदायात सामूहिक कार्यासाठी लोकांमध्ये मतैक्य घडवून आणल्याशिवाय लोकांत नीतीधैर्य निर्माण न झाल्याने अपेक्षित कार्य पूर्ण होक शकणार नाही.

**९) नेतृत्वाचा विकास करणे :** कोणत्याही समुहाकरिता / सामूहिक कार्याकरिता नेतृत्व आवश्यक असते. समुदायातील संभाव्य व्यक्तीची नेता म्हणून ओळख पटल्यावर त्याच्यातील गुणवैशिष्ट्यांचा विकास घडवून आणावयास पाहिजे. स्थानिक पुढाकार व स्थानिक नेतृत्वाशिवाय स्वावलंबी व आत्मविश्वासी समुदाय निर्माण होऊ शकत नाही. समुदायाच्या विकासासाठी बाह्यशक्तीनी प्रयत्न करण्यापेक्षा स्थानिक नेतृत्वाचा विकास करून त्याचा उपयोग करणे अधिक उपयुक्त ठरते. सामुदायिक संघटनामुळे असे नेतृत्व उदयास येण्यास मदत होते.

सामुदायिक संघटनांमुळे समुदायाला व त्यातील व्यक्तिना खालील फायदे मिळतात :

१. सामुदायिक विचारामुळे सामुहिक कल्याण साधले जाते. सामूहिक विचारामुळे प्रत्येकाच्या योग्येतेनुसार आपापल्या कल्पना व विचार लोकांपुढे मांडले जाऊन त्यावर चर्चा झाल्याने उचित व योग्य निर्णय घेतला जातो.

२. प्रत्येकाची सामुहिक कार्याबद्दलची योग्यता दिसून येते व त्या योग्यतेला संघटना व समाजाची मान्यता मिळून त्यानुसार समाजात प्रतिष्ठा व स्थान प्राप्त होते.

३. प्रत्येकाची योग्यता लक्षात घेऊन त्याकडे जबाबदारीचे विभाजन करुन योग्य कार्य सोपविल्याने संघटनांचे उद्देश लवकर साध्य होतात.

४. सामुहिकरीत्या विकास कार्य केले गेल्याने प्रत्येकाला परस्पर प्रेम, आपुलकी, सहकार, इतराबद्ल आदर इत्यादी सामाजिक गुणाचा विकास होतो.

५. काही समस्या अशा असतात की, ज्या वैयक्तीक प्रयत्नानी सोडविल्या जाऊ शकत नाहीत. अशा समस्या सामुहिक प्रयत्नातुन सोडविल्या गेल्याने विकास साध्य होतो.

समाजात विविध प्रकारच्या संघटना सामुदायिक संघटनाचे कार्य करीत असतात. त्यापैकी कोणत्याही समुदायात आढळून येणाऱ्या ग्रामपंचायत, सहकारी समिती, व शाळा या तीन मुलभूत संघटना, आहेत. ज्यावर प्रामुख्याने विकास कार्याची जबाबदारी असते. याशिवाय जात पंचायत, शेतकरी, संघटना, युवक संघटना, महिला व बालसंघटना इत्यादी आढळून येतात.

## १. ग्रामपंचायत (Grampanchayat)

खेड्याच्या हिताचे रक्षण आणि कल्याणाचे कार्य करण्यासाठी काही निवडक लोकांचे मंडळ म्हणजे ग्रामपंचायत होय. प्राचीन काळी पंचायतीच्या सदस्यांची संख्या पंचायत या शब्दात्या शब्दश: अर्थाप्रमाणे पाच राहात असली तरी अर्वाचीन काळात ती लोकसंख्येच्या प्रमाणाशी संबंधित असल्याने त्यावर बंधन नाही. प्राचीन भारतातील खेडी ही स्वंयपूर्ण, स्वायत्त व आत्मनिर्भर होती. पंचायतीचे जन्मदाता राजा प्रथु याना समजले जाते.

बिटीश शासनकाळामध्ये पंचायतीची प्रतिष्ठा, अधिकार व शक्ती कमी झाली कारण प्रशासन व न्याय शाने केंदीकरण करण्यात आले. १९४७ मध्ये सत्तेचे हस्तांतर झाल्याने प्रशासन विविध स्तरावर लोकप्रतिनिधीच्या हाती सोपविले गेले. लोककल्याणाच्या अनेक योजना राबविल्या जाऊ लागल्या १९५७ मध्ये बलवंतराय मेहता कमेटीने पंचायत राज्याची शिफारस केली आणि त्यानुसार जिल्हा खंड/तालुका व ग्रामस्तरावर असलेल्या अनुक्रमे जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत यासंस्थांकडे अधिकार व जबाबदारी सोपविण्यात आली. तत्पूर्वी मुंबई राज्य ग्रामपंचायत अधिनियम १९५८ प्रमाणेही ग्रामपंचायतीला विशेष अधिकार प्राप्त झालेले होते. ग्रामपंचायत ही प्रशासकीय स्वरूपाची लोकांची संघटना असून खेड्याच्या विकासाची संपूर्ण जबाबदारी तिची असते. लोकांनी निवडून दिलेले लोकप्रतिनिधी लोकांच्या इच्छा, आशा, आकांक्षा व गरजा लक्षात घेऊन विकासाच्या योजना तयार करतात. सर्वांनी त्या योजनांना संमती दिल्यानंतर त्यांच्याच सहकार्याने खेड्यातील साधन सामग्रीचा उपयोग करुन त्या अमलात आणल्या जातात.

## २. **सहकार समिती** (Co-operative Society)

सहकार ही ग्रामस्तरावर असलेली महत्वाची आणि आर्थिक संघटना आहे. सहकार ही ग्रामीण लोकाना एका सुत्रात बांधून त्याचे प्रयत्न सांघिकरीत्या एकत्रितपणे करते. प्रत्येकाने स्वत: पुरते आणि स्वतंत्र्य कार्य न करता अनेकांनी एकत्र व परस्पर सहकार्याने काम करणे असा सहकाराचा अर्थ आहे. 'सह' म्हणजे बरोबर आणि कार्य म्हणजे काम करणे सहकारामध्ये लोक आपल्या समान गरजा भागविण्यासाठी एकत्र आलेले असतात. काटकसर, स्वावलंबन, परस्पर सहकार्य आणि स्वार्थत्याग या गुणांची वाढ करणे हा सहकाराचा उद्देश असून आपली आर्थिक, सामाजिक व नैतिक सुधारणा घडवून आणण्यासाठी स्वखुषीने ते एकत्र आलेले असतात. समान दर्जा, समान हक्क व न्याय, आर्थिक लाभ ही तत्वे त्यांना मान्य असून सामूहिक नियंत्रणाखाली राहण्याची त्याची तयारी असते. सहकार म्हणजे स्वत: शी आर्थिक स्थिती सुधारण्याच्या हेतूने समतेच्या आधारावर स्वखुशीने व मानवतेचे एकत्रित मिळून इच्छिलेले काम करण्यासाठी निर्माण झालेली संघटना होय.

सहकार समिती ही लोकांचीच संघटना असून लोकहिताचे आर्थिक कार्य करण्यासाठी निर्माण केली जाते. "एकासाठी सर्व व सर्वासाठी एक' आणि खुले सभासदत्व, लोकशाही व्यवस्थापन भांडवलावर मर्यादित व्याज, व्यवहारानुसार आर्थिक लाभांत सहभाग, रोख व्यवहार, या राजकिय व धार्मिक तटस्थता, सभासद शिक्षण या तत्वावर सहकारी समित्या आधारलेल्या असून त्यामुळे परस्पर संयोग आणि आत्महिताचा विकास साध्य होतो. सहकारी समितीमध्ये आपापली शक्ती आणि साधने यांचा सदुपयोग करण्यासाठी स्वेच्छापूर्वक एकत्रित केली गेल्याने तिच्या प्रत्येक सदस्याला सामान्य फायदा मिळतो. विशेषत: अल्पभुधारक, ज्याचे लहान आकाराचे शेत आहे, उत्पन्न कमी आहे, साधने सीमीत आहे, भांडवलाची कमतरता आहे, ज्यामुळे त्यांना आपला माल कमी किंमतीत विकावा लागतो. अशा लोकांना सहकारी समितीमुळे अधिक फायदा मिळतो. भारतामध्ये सहकारितेचे आंदोल १९०४ मध्ये सुरु झाले परंतू नियोजनाच्या अभावी हे आंदोलन निर्धारित उद्देश पूर्ण करु शकले नाही.

सहकारी समित्यामध्ये व्यक्तीने ऐच्छिक संघटना, आर्थिक व्यवहार, स्वस्त सेवा, अभिप्रेत मिळणाऱ्या नफ्यात व्यवहाराच्या प्रमाणात सहभाग, भांडवलापेक्षा व्यक्तीला महत्व, व्यावहारिक प्रगतीपेक्षा नैतिक व सामाजिक जबाबदारी अधिक महत्वाची ही प्रमुख लक्षणे दिसून येतात. शेतीमधील वैज्ञानिक परिवर्तनामुळे शेतकऱ्यांसाठी आवश्यक वस्तूची खरेदी-विक्री, सुधारित बी-बीयाणे, रासायनिक

खते, सुधारित औजारे व यंत्रे भांडवल पुरवठा इत्यादी सेवा उचित दरात उपलब्ध करुन देऊन कृषी उत्पादन वाढविण्यामध्ये सहकारी समित्या महत्वपूर्ण भूमिका पार पाडते. सहकारी समित्या सरळरित्या सुसंघटितपणे कार्य करू लागल्या तर ग्रामीण क्षेत्रामध्ये आर्थिक, सामाजिक व इतर क्षेत्रात विकास घडवुन आणण्याकरिता सहकारी समित्या यशस्वीपणे कार्य करू शकतात.

ग्रामीण क्षेत्रात विविध प्रकारच्या सहकार समित्या निरनिराळे उद्देश व कार्य साध्य करण्याकरिता स्थापन केल्या जातात. उदा, शेतकी सहकारी पतपेढी, विविध कार्यकारी सहकारी समिती, सेवा सहकारी समिती, सहकारी विपणन समिती, ग्राहक सहकारी समिती, जंगल कामगार सहकारी समिती, मत्समार सहकारी समिती, विणकर सहकारी समिती, गृहनिर्माण सह. समिती, अशा इतर अनेक कार्य करण्यासाठी सहकारी समित्या निर्माण केल्या जाऊ शकतात. प्रत्येक समितीचे कार्य म्हणजे आपापल्या सदस्यांना उद्देशाप्रमाणे आर्थिक मदत किंवा उपलब्ध सेवा पुरविल्या जातात. ज्या प्रकारची सहकारी समिती असेल त्या प्रकारचे विकासाची कार्ये तिला करावी लागतात. सहकार समितीचे खेड्यातील शेतकरी, शेतमजूर व व्यावसायिक कुटूंब सदस्य व्हावयास पाहिजे. जेणेकरुन प्रत्येक कुटूंबाला सहकार समितीपासून विकास कार्य करण्यासाठी लाभ मिळू शकेल.

सहकार समितीमुळे साधारणतः पूढील फायदे होतात.

१. नफेखोरीला प्रतिबंध

२. सभासदाला कार्य तत्पर व स्वस्थ सेवा.

३. आर्थिक लाभाचे व्यवहाराच्या प्रमाणानुसार समान वाटप.

४. एकाधिकाराला विरोध

५. दुर्बल घटकांच्या आर्थिक व सामाजिक विकासाला उपयुक्त

६. सभासद शिक्षणाव्दारे खुले व प्राथमिक कारभार

७. प्रगतीशील सामाजिक न्याय.

सहकार समितीचे प्रमख कार्य म्हणजे प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला सहकारी समितीचे सदस्य बनविणे, केलेल्या भांडवल पुरवठ्याचा संबंध उत्पादन आणि विक्रीशी जोडणे, उत्पादनाचे निश्चित ध्येय गाठण्यास मदत करणे आणि काटकसर व बचत योजनेला प्रोत्साहन देणे हे आहे.

### ३. **ग्रामशाळा (Village School)**

समुदायाच्या शैक्षणिक व बौध्दिक गरजा भागविण्यासाठी शाळा ही महत्वपूर्ण संघटना आहे. ग्रामीण समाजाच्या आर्थिक व सामाजिक क्षेत्रामध्ये शिक्षणाव्दारे परिवर्तन घडवून आणण्याचे कार्य शाळा करते. एक प्रकारचा लहान समुदाय असून ज्यामध्ये मिळणाऱ्या शिक्षणाने शाळेबाहेरील समाजजीवन प्रभावित करता येते. व्यक्तिगत विकास आणि सामुदायिक विकास शाळा या संघटनेव्दारेच साध्य करता येतो. सामाजिक आवश्यकता व व्यावहारिक जीवनाच्या दृष्टिकोनातून उपयुक्त असलेली शिक्षण पध्दती ही आजची गरज आहे. व्यक्तिमहत्वाचा आणि नागरिकत्वाचा विकास शाळेतील शिक्षणाव्दारेच साध्य होत अस**तो**. शाळेत मिळणारे शिक्षण सामुदायिक क्रियाप्रक्रियांशी संबंधिक असेल तर ते अधिक उपयुक्त ठरते. नेतृत्वगुण शाळेमध्येच विकसित होत असतात. अशा नेतत्वाचा उपयोग भविष्यामध्ये लोकांच्या गरजा ओळखून त्याच्याच संमतीने व उपलब्ध साधनाच्या सहाय्याने त्या सोडविण्याकरिता होत असतो.

शाळा हे शैक्षणिक विकासाबरोबरच सांस्कृतिक विकासाचे माध्यम आहे. शाळेमध्ये मनोरंजन स्वच्छता व आरोग्य, खेळ व कवायतीव्दारे शारीरीक व मानसिक विकास होत असतो. शाळा शिक्षकाचा उपयोग सामूहिक विकास कार्यामध्ये व प्रौढ शिक्षण कार्यामध्ये करुन घेणे उपयुक्त ठरते. ही संघटना समुदायाच्या इतर संघटनांशी सहकार्य देऊन विकास कार्य करू लागली तर त्यादृष्टीने नवीन पिढी अधिक क्रियाशीलपणे विकास कार्यात सहभागी होते. शाळा शिक्षकाला समाजात लाभलेल्या प्रतिष्ठेचा

उपयोग लोकांमध्ये इच्छित परिवर्तन घडवून आणण्याकडे होतो. सामुदायिक जीवनामध्ये शाळा हे विकासाचे मुख्य केंद्र असून जबाबदार, कार्यक्षम व आत्मनिर्भर नागरिक निर्माण करणे, कुशल नेतृत्व विकसित करणे, मनोरंजनाच्या माध्यमातून शिक्षण देणे, साक्षरता प्रसार, व्यावसायिक प्रशिक्षण, जीवनात नवीन ज्ञानाचा अवलंब इत्यादी कार्य करीत असते. शाळेतील विद्यार्थ्यांच्या संघटित श्रमशक्तीचा उपयोग विकासाचे कार्य पूर्ण करण्याकरिता केला जाऊ शकतो.

ग्रामीण विभागातील ग्रामपंचायत, सहकारी समिती, शाळा या तीन मूलभूत संघटनांवर विकासाचे कार्य आधारलेले असते. ग्रामपंचायत - ग्रामविकासाचे नियोजन व कार्यवाही करणे, सहकार समिती - भांडवलनिर्मिती व पुरवठा साधनांची उपलब्धता करून देणे आणि शाळा - विकास कार्याबद्दलची जाणीव लोकांमध्ये निर्माण करुन त्याच्यात बौध्दिक व शैक्षणिक बदल घडवून आणणे ही प्रमुख कार्ये करीत असतात. थोडक्यात ग्रामपंचायत ही प्रशासकीय स्वरुपाची, सहकारी समिती ही आर्थिक स्वरुपाची व शाळा ही शैक्षणिक स्वरुपाची संघटना आहे. या सामुदायिक संघटनांच्या प्रभावीपणे व संघटितपणे कार्य करण्यावरच खेड्याचा विकास अवलंबून आहे.

### ४. जात पंचायत (जाती संघटना/caste Panchayat) :

ग्रामीण समाजातील सामाजिक स्तरीकरण अनेक शतकापासून जातीय आधारावर झालेले दिसून येते. प्रत्येक जातीच्या जीवनविषयक काही धारणा निश्चित झालेल्या असतात. अर्थात त्यातील काही उपयुक्त तर काही अनुपयुक्त देखील असू शकतात. प्रत्येक जातीची वैशिष्ट्ये टिकवून ठेवणे व आपल्या सदस्याचे कल्याण साधणे यासाठी जातपंचायती अस्तित्वात आल्या. प्रत्येक जातीची स्वतंत्र्य पंचायत असून ती अनौपचारिक किंवा औपचारिकपणे सामाजिक नियंत्रणाचे कार्य करून जातीव्यवस्थेमध्ये शांतता टिकवून ठेवण्याची भूमिका पार पाडते. जातीपंचायतीमुळे सदस्याचे कल्याण व त्यांना संरक्षण दिले जाऊन परंपरा व प्रथा टिकवून ठेवणे, विशिष्ट व्यवसाय, कौशल्ये, कला टिकवून ठेवणे व पुढील पिढीला हस्तांतरित करणे, जातीय कल्याण साधणे इत्यादी कार्य पार पाडतात. जातीतील सदस्यावर जातपंचायतीची काही बंधने असतात आणि त्याचे पालन प्रत्येकाने काटेकोरपणे करावयाचे असते नाहीतर जात पंचायत काही दंड वा शिक्षा देखील देऊ शकते.

जातीपंचायतीवर आधुनिक शिक्षण व औद्योगिकरणाचा फार मोठा परिणाम होऊन त्याच्या कार्यामध्ये काही प्रमाणात शिथिलता आलेली दिसून येते. लोकशाही पध्दतीचा वापर आणि जीवनविषयक बदललेली नीतीमुल्ये यामुळे जातीपंचायती पूर्वीसारख्या कार्यक्षम राहिलेल्या नाहीत. जाती पंचायती ग्रामीण क्षेत्रातील कास कार्याला बाधक नसून त्याचा योग्यरित्या व कुशलपणे वापर करून घेतल्यास प्रत्येक जातीतील सदस्यांचे पर्यायाने खेड्यातील प्रत्येकाचे सहकार्य मिळुन कार्य यशस्वी होण्याला मदत होते. तसेच जातपंचायतीमुळे संस्कृती व परंपरा टिकवून ठेवल्या जातात.

### ५) भारत युवक कृषक समाज (Young Farmers Associaton of India)

भारत युवक कृषक समाजाची स्थापना एप्रिल १९५६ मध्ये कृषीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. ही एक तरुण उत्साही शेतकऱ्याची संघटना असून राष्ट्र, राज्य किंवा जिल्हा स्तरावर कोणीही तरुण शेतकरी संघटनेचा सदस्य होऊ शकतो. संघटनेच्या सहयोगी व इतर सदस्यांकरिता वयोमर्यादेचे बंधन नसले तरी क्रियाशील सदस्य ३५ वर्षे वयापेक्षा कमी असावे लागतात. ही संघटना राष्ट्रीय व राज्य स्तरावर शेती परिसंवाद, चर्चा, प्रशिक्षण व शिबिरे आयोजित करते.

**संघटनेचे ध्येय व उद्देश:**

भारत युवक कृषक समाज मुख्यत: तरुण शेतकऱ्यांना सुधारित पध्दती व आधुनिक माहितीचे कृती युक्त प्रशिक्षण देऊन ज्ञानप्रसाराचे कार्य करते. ग्रामीण जीवनाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी तरुण शेतकऱ्यांना उत्तेजन देऊन कार्य करण्यास प्रवृत्त करते. संघटनेचे इतर उद्देश पुढील प्रमाणे आहेत.

१) कृषि व सामुदायिक विकासाकरिता ग्रामीण युवकांमधील विविध क्षमताचा उपयोग करुन देणे.

२) स्थानिक स्तरावर ग्रामीण मुले - मुली यांच्या संघटना स्थापन करुन शेतीमधील नवीन ज्ञानाचा अवलंब करण्यास मदत करणे, तसेच गृहविज्ञानाच्या नवीन ज्ञानाचा अवलंब करण्यास मदत करणे व यामुळे त्याच्यात नेतृत्व, उपयुक्त स्पर्धा, सहकार्य इत्यादी गुणाचा विकास घडवून आणणे.

३) कृषी व्यवसायासंबंधी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परस्पर संबंध ठेवून शेती विकासाला मदत करणे, कृषी उत्पादन वाढविण्यासाठी देश विदेशातील कृषी उत्पादक संस्थाचे व संघटनांचे सहकार्य प्राप्त करणे.

४) भारतीय शेतकऱ्यांच्या समस्यांचा अभ्यास करणे व त्याचा आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकास घडवून आणणे.

**संघटनेचे कार्य :**

भारत युवक कृषक संघटनेचे कार्य राष्ट्र, राज्य, जिल्हा व ग्राम स्तरावर चालते. या चारही स्तरामध्ये सतत परस्पर संबंध ठेवला जातो. विविध स्तरावरील संघटनेचे कार्य खालील प्रमाणे आहे.

**अ) केंद्रीय संघटना :**

१. ग्रामीण युवक, कार्यक्रमासंबंधीची परिपत्रके, आजीवन सदस्य, क्रियाशील सदस्य, सयुक्त सदस्य, प्रतिष्ठित सदस्य, आणि संरक्षक सदस्य यांना पाठविणे.

२. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय तरुण संघटनांशी संबंध ठेवणे.

३. "रुरल युथ" आणि 'ग्रामयुवक' ही मासिके दरमहा प्रकाशित करणे.

४. तांत्रिकदृष्ट्या माहितीपूर्ण अशा पुस्तिका प्रकाशित करणे.

५. ग्रामीण युवक संघटन कार्यकर्त्याची प्रशिक्षण शिबिरे, केंद्र आणि राज्यस्तरावर आयोजित करणे.

६. तरुण शेतकऱ्यांचे मेळावे, परिसंवाद, चर्चासत्र, राष्ट्रीय स्तरावर आयोजित करणे.

७. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय युवक संघटनेविषयी माहिती तरुण शेतकऱ्यांना पुरविणे.

८. विभिन्न राज्यातील संघटनेच्या कार्यामध्ये समन्वय ठेवणे.

९. आजीवन सदस्य, सहयोगी सदस्य, संयुक्त सदस्य, प्रतिष्टित सदस्य, संरक्षक सदस्य यांची नोंदणी करणे.

१०. कार्यक्रमांचे नियोजन तंत्र, ग्रामीण युवकामधील नेतृत्वाक्षमता याबद्दल संशोधन करणे.

**ब) राज्य संघटना :**

१. ग्रामीण युवक कार्यक्रमासंबंधी परिपत्रके प्रांतिक भाषेत छापून वितरित करणे.

२. भारत युवक कृषक संघटनेचे साहित्य प्रसारित करणे आणि ते प्रांतिक भाषेत छापणे.

३. प्रांतिक भाषेत मासिके व इतर माहिती पुस्तिका छापणे.

४. राज्यस्तरावर प्रशिक्षण शिबिरे आयोजिक करणे.

५. आंतरराज्यीय अभ्यास सहली आयोजित करणे.

६. राज्यातील विविध जिल्ह्याच्या कार्यक्रमात समन्वय स्थापन करणे.

७. सह्योगी व क्रियाशील सदस्याची नोंदणी करणे.

८. राज्यस्तरावर तरुण शेतकऱ्याचे परिसंवाद व चर्चा आयोजित करणे.

९. जिल्हास्तर शाखा संघटित करुन त्यावर नियंत्रण ठेवणे.

**क) जिल्हा संघटना :**

१. जिल्ह्यातील शेतकऱ्यामध्ये भारत युवक कृषक संघटनेचे साहित्य प्रसारित करणे.

२. **जिल्हयास्तरावर परिसंवाद**, **चर्चा आयोजित करुन तरुण शेतकऱ्यासाठी मेळावे**, खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे.

३. प्रशिक्षण शिबिरे आयोजित करणे.

४. शैक्षणिक अभ्यास सहली आयोजित करणे.

**ड) ग्रामसंघटना :**

१. ग्रामीण मुला-मुलीमध्ये नेतृत्व विकास, उपयुक्त स्पर्धा आणि सहकारी भावना निर्माण करण्याविषयीचे कार्यक्रम आयोजित करणे.

२. शेती, पशुसंवर्धन, कुटिरउद्योग, सहकारी भांडार याविषयीचे कार्य संघटनेच्या प्रत्येक सदस्याकडे (गटाकडे) कार्यान्वित करण्यासाठी सोपविणे.

३. गटाकडे किंवा सदस्याकडे सोपविलेले कार्य पूर्ण करण्यासाठी मदत करणे.

४. शेतीच्या सुधारित पध्दतीविषयीचे प्रात्यक्षिके आयोजित करणे.

५. सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रम आखणे.

६. प्रदर्शने व मेळावे भरविणे.

७. क्रियाशील व सहयोगी सदस्याची नोंदणी करणे.

भारत युवक कृषक संघटनेमार्फत दोन मासिके "Rural Youth" इंग्रजीमध्ये आणि ग्रामयुवक हिंदीमध्ये प्रकाशित केले जातात. त्याशिवाय तांत्रिकदृष्ट्या उपयुक्त अशा बऱ्याच माहितीपुस्तिका प्रकाशित केल्या जातात.

**६) युवक संघटना (युवक मंगल दल) :**

भारतामध्ये युवक कृषक संघटनेची स्थापना होण्यापूर्वी १९२० च्या दरम्यान पूर्व बंगालमध्ये विश्वभारतीच्या कार्यकर्त्यांनी श्रीनिकेतनच्या परिसरात ग्रामीण तरुण संघटनेचे प्रयत्न सुरु केले होते. अमेरिकेतील ४ एच क्लबच्या आधारावर त्यासारख्या तरुण संघटना भारतामध्ये सुरु करण्याविषयीचे प्रयत्न १९५३-५४ पासून सुरु झाले. युवक संघटनेचे मुख्य ध्येय म्हणजे तरुणांच्या फुरसदीच्या वेळेचा सदुपयोग विभिन्न प्रकारचे कार्य करण्यासाठी त्यांना संधी उपलब्ध करुन देणे, जी कार्ये त्याचे व्यवसाय, गृहोद्योग, शिक्षण तसेच इतर आवश्यक कार्यासाठी पुरक ठरतील व ज्यामुळे त्यांचा शैक्षणिक, मानसिक,शारिरिक व भावनात्मक विकास होऊन समाजाचे ते जबाबदार घटक बनतील, सद्यस्थितीत युवकांच्या अनेक संस्था व संघटना विद्यमान आहेत. परंतू या संघटनाचा उपयोग ग्रामीण क्षेत्राच्या विकासाकरिता करुन घेणे नितांत आवश्यक आहे. युवकाच्या प्रमुख संघटना बॉय स्काऊट **(Boy Scout)**, एन. सी.सी. **(NCC)**, राष्ट्रीय सेवा योजना **(National Service Scheme)** तसेच अन्य इतर संघटनातील युवकांना मार्गदर्शन करुन मनोरंजनाच्या माध्यमातून त्याच्या व्यक्तिमत्वाचा विकास केला जातो. त्याचे वर्तन शारिरिक, मानसिक, सामाजिक आणि नैतिक दृष्टिकोनातून अनुशासित केले जाते. नवयुवकामधूनच देशाचे भावी नेते निर्माण केले जातात.

युवक संघटनेचा प्रमुख उद्देश नागरिकांना उत्तम शेतकरी तसेच शेतकऱ्यांना उत्तम नागरिक या स्वरूपात विकसित करणे हा आहे. तसेच ग्रामीण युवक संघटनेचे इतर उद्देश पुढीलप्रमाणे देता येतील.

१. ग्रामीण युवक युवतीना सुखी जीवन व्यतीत करण्यासाठी व त्यांची मुल्ये, कल्पना, आशा व आकांक्षा लक्षात घेऊन विकास करण्यासाठी त्यांना शेती, कौटूंबिक जीवन, सामुदायिक जीवन नागरिकता, नेतृत्व जबाबदारीची भावना लक्षात घेऊन मदत करणे.

२. ग्रामीण मुलामुलींना शेती, गृहविज्ञान, सामुदायिक नेतृत्व याचे कृतीयुक्त व उपयुक्त प्रशिक्षण देऊन **व्य**क्तिगत आणि सामुदायिक योजना राबविणे.

३. श्रमदान, सामुदायिक वृक्षारोपन आणि इतर सामुदायिक कार्यक्रमाव्दारे सहकारी क्रियाचे प्रशिक्षण देणे.

४. स्वावलंबन, कर्तव्यपरायणता इत्यादी नेतृत्वविषयक गुणाचा विकास करणे याकरिता संघटना, सेवा शिबिरे, यात सहभागी होणे आवश्यक आहे.

५. कृषी, गृह आणि समुदाय यातील समस्या सोडविण्याकरिता शास्त्रीय दृष्टिकोन व विचारसरणीचा विकास घडवून आणणे.

**यवक संघटना स्थापन करण्याकरिता तीन गोष्टी आवश्यक असतात**.

१) एकत्रित येणे

२) एकत्रित राहणे

३) एकत्रित काम करणे

**युवक संघटना (युवक मंगलदलाच्या योजना)**

**१) आर्थिक व कृषीसंबंधी** :

आर्थिक स्थिती उंचावण्यासाठी किंवा सुधारण्यासाठी कृषी विकासाचे कार्यक्रम यामध्ये घेतले जातात. उदा. नवीन पध्दतीने लागवड, भाजीपाला, संकरित गाई, म्हशी पाळणे, कुक्कुटपालन, मधमाशा, पीक संरक्षण, सहकारी चळवळ, अल्पबचत योजना इत्यादी सामुहिक कार्यक्रम घेतले जातात.

**२) समाज सेवा कार्यक्रम** :

ग्रामीण साफसफाई, स्वच्छता, वृक्षारोपण, श्रमदान, शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, डासाचा नायनाट, सार्वजनिक साधनांची व वस्तुची देखभाल इत्यादी कार्यक्रम आयोजित करणे.

**३) सांस्कृतिक व मनोरंजन कार्यक्रम :**

या अंतर्गत भजन, कीर्तन, नाटक, लोकगीते तसेच शारीरीक खेळ आयोजित केले जातात.

युवक मंगल दलाजी 'नवयुवक' नावाची पत्रिका प्लॅनिंग रिसर्च सेक्शन इन्स्टिटयूट, लखनौ येथून प्रकाशित होत असते.

महिला संघटना (महिला मंगल दल)

ग्रामीण समाजातील परंपरा आणि रीतिरिवाजामुळे स्त्रियांचा दर्जा व स्थिती खालावलेली दिसून येते. महिला एक माता, पत्नी, भगिनी, कुटूंब व्यवस्थापिका व शिक्षिका या नात्याने समाजाच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विकासाच्या बाबतीत महत्वपुर्ण भूमिका पार पाडतात. ग्रामीण विभागातील महिला औपचारिक दृष्टिकोनातून अशिक्षित असतात आणि त्याच्या आर्थिक उत्पादनाची तसेच मनोरंजनाची साधनेही मर्यादित असतात. खेड्यातील स्त्रियांना मनोरंजन, सामाजिक शिक्षण, आरोग्य, शिक्षण, बाल संगोपन, गृहविज्ञान, गृहसजावट इत्यादी कार्यासाठी संघटित करणे आवश्यक आहे. भारतामध्ये 'केंद्रीय समाज कल्याण मंडळातर्फे' महिला कल्याण योजना ग्रामीण क्षेत्रामध्ये सुरु करण्यात आली. ही योजना विभिन्न राज्यात प्रत्येक जिल्ह्याकरिता सुरु करण्यात येऊन स्त्रियामध्ये जागृती व त्याचा विविध क्षेत्रात विकास घडवून आणणे हे या योजनेचे उदिष्ट ठरविले गेले. याकरिता प्रत्येक खेड्यातील स्त्रियांच्या विकासाचे कार्य करण्यासाठी सामुदायिक विकास गटांतर्गत ग्रामसेविका, दाई, आणि शिल्पशिक्षका यांची नियुक्ती काण्यात येते.

महिला कल्याण कार्यक्रमान्तंर्गत विविध प्रकारचे कार्य करतात.

१. माता व मुलांचे संगोपन व देखरेख

२. व्यक्तिगत आरोग्य तसेच सार्वजनिक आरोग्य व साफसफाई

३. शेती व शेतीसंबंधीत कार्य उदा.- परसबाग, जनावरांची देखरेख व व्यवस्था, कुक्कुटपालन इ.

४. गृहोद्योग ज्यामुळे वस्तूची बचत व उत्पन्न वाढू शकते. उदा सूत कातणे, चटया, टोपल्या पापड, मसाले तयार करणे.

५. महिला वर्गाचे महिला मंडळ, बालवाडी, बालसंघटना इ. सामुदायिक संघटना निर्माण करणे.

६. प्रौढ शिक्षण व साक्षरता प्रसार.

७. गृहव्यवस्था ज्यामध्ये कुटूंबाचे अंदाजपत्रक तयार करणे आणि गृहव्यवस्थापन व गृहसजावट

महिला आपल्या कुटूंबाचा विकास मुलांवर योग्य संस्कार घडवून त्याचे व्यवस्थित संगोपन व पालनपोषण करुन, काटकसरीने बचत करून, फुरसदीच्या वेळेचा उपयोग काही गृहोद्योगाव्दारे आर्थिक उत्पन्न मिळवून कुटूंबाचा विकास घडवून आणते, स्त्रियांनी मुलावर केलेल्या योग्य संस्कारावरच मुलांचे वर्तन अवलंबुन असते. शेतीचा मुख्य व्यवसाय असलेल्या ग्रामीण समाजात स्त्रिया शेतीमधील काही हलकी परंतू तितकीच महत्वाची उदा. काडीकचरा वेचणे, नोंदणी करणे, पिकांची कापणी इत्यादी कामे करुन कृषी उत्पादन वाढविण्याला मदत करते. थोडक्यात स्त्रिया संपूर्ण समाजाचा बऱ्याच प्रकारे विकास घडवून आणण्यात महत्वपूर्ण भूमिका पार पाडत असते.

महिला मंडळे :

महिला मंडळे या संघटनेव्दारे महिला आणि मुले यांच्या विकासाचे कार्यक्रम तयार करून कार्यान्वित केले जातात. काही राज्यामध्ये महिला संघटना स्थापन करून त्याच्या विकासाचे कार्य करण्यासाठी ग्रामलक्ष्मी किंवा ग्रामकाकी निवडल्या जातात. ज्या सहसा खेड्यातील प्रगतीशिल महिला असतात. महिला मंडळामार्फत कपडे शिवणे, सूत कातणे, कापड विणणे, ताट्या व टोपल्या तयार करणे इत्यादी कार्यासाठी खादी कमिशन आर्थिक सहाय्य देते. तसेच राष्ट्रीय लघुउद्योग महामंडळ महिला मंडळांना शिलाई मशिन व इतर स्वरूपात मदत करते. प्रत्येक पंचवार्षिक योजनेमध्ये महिला मंडळासारख्या महिला संघटनांना त्यांच्या विकासाकरिता आर्थिक मदत देण्यासाठी निश्चित रक्कम वेगळी ठेवलेली असते. प्रत्येक खेड्यात महिला मंडळाची स्थापना करून त्याच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक विकासाचे कार्यक्रम घेऊन सामुहिक प्रयत्न केले तर महिलांचा विकास व्हायला वेळ लागणार नाही.

**बाल संघटना (बाल मंगल दल)** :

भारतामध्ये १५ वर्षापेक्षा कमी वयोमर्यादा असलेल्या मुला मुलींची संख्या जास्तीत जास्त ग्रामीण विभागात आहे. १९५२ पासून बाल कल्याणाची योजना देशामध्ये सुरु करण्यात आली कल्याणासाठी प्रत्येक खेड्यात किंवा काही खेड्यांना मिळून प्रत्येक खेड्यात किंवा काही खेड्या मिळून शाळा, बालवाड्या, अंगणवाड्या, शिशुसंगोपन केंद्र, शिशु संस्कार केंद्रे इत्यादी संस्था व संघटना करुन त्याव्दारे विविध बाल कल्याण योजना राबविल्या जातात. त्यापैकी माता व मुलांचे संगोपन केंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र ज्यामध्ये माता व मुलांच्या आरोग्याची तपासणी करुन औषधे व इतर सेवा पुरविल्या जातात, व्दितीय पंचवार्षिक योजनेपासून शाळेत लहान मुलांना नि: शुल्क दूध देण्याची व्यवस्था इत्यादी प्रमुख आहेत. बालकल्याणकारी योजनेअंतर्गत ग्रामसेविका, ग्रामलक्ष्मी किंवा ग्रामकाकी प्रत्येक कुटुंबात जाऊन कोणता आहार कसा खाऊ घालावा, संतुलित आहार, बालसंगोपन, आरोग्यविषयक सेवा इत्यादी विषयीची माहिती देते. या दृष्टीकोनातून प्रत्येक खेड्यात बाल मंगल दलाची स्थापना करुन ते युवक मंगल दलाच्या सहाय्यानेच चालविले जातात. युवक मंगल दलाच्या एखाद्या सदस्याकडे बाल मंगल दलाची जबाबदारी सोपविली जाते. बाल कल्याणकारी योजनेंतर्गत विविध बालकल्याण कार्य करण्यासाठी शासनातर्फे भरघोस मदत दिली जाते. तसेच बाल कल्याणाच्या योजना राबविण्यासाठी काही मदत युनिसेफ व (UNICEF) व जागतिक संघटनेतर्फे दिली जाते.

## सामुदायिक संघटना आणि सामुदायिक विकास

## (Community Organization and Community Development)

सामुदायिक विकास आणि सामुदायिक संघटना यांची कल्पना आणि कार्यात फारसा फरक नसला तरी या दोन्ही क्रिया एकमेकांना पूरक अशा आहेत. सामुदायिक संघटना व्यक्ती आणि गटातील संबंध वाढविण्यास मदत करतात. ज्यामुळे समुदायातील व्यक्तीचा सर्वांगीण विकास घडून येण्यास मदत होते. सामुदायिक विकास म्हणजे समुदायामध्ये आर्थिक, सामाजिक व इतर क्षेत्रात बदल घडवून आणणे त्यामुळे समुदायातील मतभेद कमी होऊन एकी निर्माण करण्यास मदत होते. सामुदायिक विकास हा स्वमदतीच्या तत्वावर आधारलेला कार्यक्रम आहे.

सामुदायिक विकास आणि सामुदायिक संघटना या दोन्हीचा उद्‌देश समुदायाची सर्वागीण उन्नती घडवून आणण्याचा आहे. संघटनात्मक दृष्टीकोनातून वापरण्यात येणारे तंत्र सारखे आहे. दोन्ही क्रिया समाजाच्या कल्याणाकरिता असून समाजाच्या सर्वसाधारण गरजा सोडविण्याचे प्रयत्न करीत असतात. दोन्हीही दुसऱ्या समुदायाशी सहकार्य करुन सारख्या गरजा सोडविण्याचे, सामाजिक जागृती व नेतृत्व निर्माण करण्याचे कार्य करीत असतात.

सामुदायिक संघटनेचे क्षेत्र, व्याप्ती व उद्‌देश मर्यादित आहे. तर सामुदायिक विकासाचे क्षेत्र, व्याप्ती व उद्‌देश व्यापक स्वरुपाचे आहेत. सामुदायिक संघटनेमार्फत समाजात एकी निर्माण करुन सामाजिक सबंध वाढविण्याचे कार्य करणे थोडे कठिण जाते. तर सामुदायिक कार्यक्रमाव्दारे समाजात सर्व स्तर व वर्गामध्ये एकी निर्माण करून त्याचा उपयोग आर्थिक, सामाजिक, व राजकिय विकास करण्याकडे केला जातो सामदायिक संघटना ही एक पध्दती असून सामुदायिक विकास घडवून आणण्याचे ते एक साधना सामदायिक संघटना स्थानिक गरजा व साधने विचारात घेऊन कार्यक्रम तयार करतात. उलटपक्षी सामुदायिक विकास हा कार्यक्रम राष्ट्र, राज्य व जिल्हास्तरावर तयार केला जाऊन त्याव्दारे सर्वांच्या गरजा सोडविण्याचे प्रयत्न केले जातात. सामुदायिक विकासाचे कार्यक्रम आखतात, योजना तयार करतात, अमलात आणताना व त्याचे मुल्यांकन करताना त्या अधिक परिणामकारक व्हाव्यात यासाठी बाहेरील व्यक्ती, तज्ज्ञ, संस्था व संघटना इत्यादींची मदत घेतली जाते. तर सामुदायिक संघटनेचे कार्यक्रम आखताना व पूर्ण करताना स्थानिक बाबी लक्षात घेऊन त्या संघटनेतील सभासदांचेच सहकार्य घेतले जाते. थोडक्यात, सामुदायिक संघटनाचे स्वरूप गुणात्मक असते. तर सामुदायिक विकासाचे स्वरूप व पद्‌धती जास्त गुणात्मक व परिणामकारक (संख्यात्मक) असते.

सामुदायिक विकास आणि सामुदायिक संघटना या दोहोंमध्ये फार थोडा फरक असला तरी दोहोंचे कार्यक्षेत्र समुदाय अर्थात खेडे असून त्यांचे ध्येय एकच आहे आणि ते म्हणजे समाजाचा सर्वांगीण विकास त्याच बरोबर प्रत्येक व्यक्तीचा सर्वांगीण विकास साधणे हा होय. सामुदायिक विकासाचे स्वरूप सामुदायिक संघटनेपेक्षा व्यापक असले तरी सामुदायिक संघटनेमार्फतच साध्य केले जात आहे.

## **समाज शिक्षण** (Social Education)

स्वतंत्र भारताच्या राज्यघटेनेने लोकशाही प्रधान आणि प्रगतीशील असे राष्ट्रीय जीवन घडविण्याचे कार्य हाती घेतले असल्याने ग्रामीण भारतातील शिक्षण विषयक समस्या अधिक महत्वाच्या मानल्या गेल्या. शिक्षण म्हणजे केवळ एखाद्‌या विषयाची माहिती करून घेणे किंवा लिहिता वाचता येणे नव्हे तर जनसामान्यापेक्षा वेगळे विशेष असे संस्कारित वर्तन म्हणजे शिक्षण होय. शिक्षण हे व्यक्तीमधील अंतस्थ शक्तीचा अत्युत्तम अविष्कार करण्यास सहाय्य करते, त्यामुळे शरीर, मन, बुध्दी, भावना, व्यावसायिक कौशल्य, कलात्मक संवेदना, व जीवन मूल्यांसंबंधीची जाणीव या सर्व गुणप्रवृत्तीचा विकास शिक्षणामुळे घडून येतो. शिक्षणामुळे प्रत्येक व्यक्तीत जबाबदारीच्या भावनेचा, आवश्यक वृत्तीचा व मुल्याचा विकास होतो. थोडक्यात, व्यक्तीचा सर्वांगीण विकास करणारी, व्यक्तीच्या सुप्त शक्ती विकसित करणारी प्रक्रिया म्हणजे शिक्षण होय.

भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा देशातील फक्त १४ टक्के लोक साक्षर होते. आजही साधारपणे तीन व्यक्तीपैकी दोन व्यक्ती निरक्षर आढळून येतात. आर्थिक व सामाजिक उन्नतीच्या दृष्टीकोनातून सक्रिय व महत्वपूर्ण असलेल्या १५ ते ३५ या वयोगटातील अंदाजे १० करोड पेक्षा जास्त लोक निरक्षर आहेत. भारताच्या राज्यघटनेत घटना अंमलात आणल्यापासून "दहा वर्षाच्या कालावधीत चौदावर्षे वयापर्यंतच्या मुलांमुलींना निशुल्क आणि अनिवार्य शिक्षण दिले जावे'. असा स्पष्ट संकेत असतांनाही त्यादृष्टीने आपले प्रयत्न अपयशी ठरले. शिक्षण क्षेत्रात सर्व बाजूनी मिळालेल्या अपयशाला वाढती लोकसंख्या काही प्रमाणात कारणीभूत असली तरी केले गेलेले प्रयत्न अधिक व्यापक व तीव्र स्वरुपात करावयास पाहिजे होते. देशातील गरीबी, अज्ञान, दारिद्रय व मागासलेपणा या सारख्या समस्यांना निरक्षरता हीच प्रमुख समस्या कारणीभूत आहे. यादृष्टीने विचार केला तर भारतामध्ये असलेल्या असंख्य निरक्षर लोकाविरुध्द प्रचंड व परिणामकारक प्रौढ शिक्षणाची मोहिम उघडणे अत्यंत आवश्यक आहे. आधुनिक ज्ञान व तंत्र ग्रामीण निरक्षरापर्यंत पोहचविणे आवश्यक आहे. व त्यासाठी त्यांना प्रथम साक्षर करणे महत्वाचे आहे.

## प्रौढ शिक्षण व समाजशिक्षणाचा अर्थ :

इतर शिक्षणाप्रमाणेच प्रौढ व समाजशिक्षणाची कल्पनाही पाश्चत्य आहे. निरक्षर प्रौढ व्यक्तींना लिहिणे, वाचणे, आणि हिशेब करावयास शिकविणे असा सर्वसामान्यपणे प्रौढशिक्षणाचा अर्थ घेतला जातो. विविध विचारवंतानी केलेल्या प्रौढ शिक्षणाच्या व्याख्या पुढील प्रमाणे आहे.

ब्राइसनच्या मताप्रमाणे - "प्रौढ शिक्षण म्हणजे प्रत्येक व्यक्तीला सर्वकाळी आणि सर्व प्रकारच्या परिस्थितीमध्ये दिले जाणारे शिक्षण होय." "Adult education is education for every body at all times and in all conditions" - Lymon Bryson मॉरगन होम्स व बंडी यांच्या मते :- "नवीन गोष्टी शिकण्यासाठी प्रौढ व्यक्तीनी जाणीवपूर्वक केलेला प्रयत्न म्हणजे प्रौढ शिक्षण' "Adult education may be thought of as the conscious effort of a mature person to learn something new" - Morgan, Holmes & Bundy रीन्स फेन्सलर व हाऊले यांच्यानुसार - "प्रौढ शिक्षणांचा संबंध व्यक्ती जीवनाच्या व्यावसायिक, व्यक्तिगत आणि नागरिकत्व या एक किंवा अधिक अंगाशी येतो" "Adult education may be concerned with any or more of the three aspects of individual's life - his work life, his personal life OR his life as citizen" - Reenes, Fensler & Houle

## समाज शिक्षण (Social Education)

लोकशाही यशाचे लोकांतील साक्षरता, त्याचा प्रगतीशील दृष्टीकोन व त्याच्यातील नागरिकत्वाचा विकास असे मूलभत आधार आहेत. यासाठी प्रौढ शिक्षणात प्रौढाच्या साक्षरतेबरोबरच त्याचा नैतिक, सामाजिक व सांस्कृतिक विकास घडवून आणणे आवश्यक आहे. भारत सरकारने १९४८ मोहनलाल सकसेना याच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीची शिफारस मान्य करुन प्रौढ शिक्षणाला “समाजशिक्षण" ही संज्ञा देण्याचा निर्णय घेतला त्यावेळेचे शिक्षणमंत्री, श्री. मौलाना अबुल कलाम आझाद यांनी प्रौढ शिक्षणाची नवीन कल्पना स्पष्ट करतांना म्हटले की, प्रौढ शिक्षणाला लोकाना साक्षर करण्यापुरतेच मर्यादित ठेवण्यापेक्षा त्यात प्रत्येक नागरिकाला लोकशाही सामाजिक व्यवस्थेमध्ये सहभागी होण्यास तयार करण्याचासुध्दा समावेश केला पाहिजे. "समाज शिक्षण हे प्रौढ शिक्षणाचे व्यापक व विकसित स्वरुप असून त्यात साक्षरतेबरोबर लोकांच्या सामाजिक विकासाला महत्व दिलेले आहे. श्री. मौलाना आझाद यांच्या मते "समाज शिक्षण म्हणजे पूर्ण मानवाचे शिक्षण आहे." (By Social Education, we mean an education for complete man) श्री. हमायून कबीर याच्या मताप्रमाणे समाजशिक्षण म्हणजे प्रत्येक व्यक्तीमध्ये नागरिकत्वाची भावना निर्माण करून सामाजिक ऐक्याचा विकास करण्याच्या हेतूने संयोजित केलेला अभ्यासक्रम"

**समाज शिक्षणाची वैशिष्ट्ये :**

१. समाजशिक्षण हे प्रौढ शिक्षण आहे.

२. समाज शिक्षण नागरिकत्वाची भावना निर्माण करणारे शिक्षण आहे.

३. समाज शिक्षण समाजाचा विकास घडवून आणण्यास मदत करणारे शिक्षण आहे.

४. समाज शिक्षण प्रत्येक व्यक्तीचा वैयक्तिक, नैतिक, आर्थिक, सामाजिक व राजकीय विकास घडवून आणणारे शिक्षण आहे.

५. समाज शिक्षण लोकांना उत्तम कार्य, आराम, फुरसतीच्या वेळेचा उपयोग व मनोरंजन यांच्या पध्दती अवगत करून देणारे शिक्षण आहे.

समाज शिक्षणाच्या नवीन धारणेप्रमाणे समाज शिक्षण म्हणजे केवळ प्रौढांना साक्षर करणेच नव्हे तर समाजातील एक घटक म्हणून त्यांचा सर्वांगीण विकास करणे होय. हे ध्येय पूर्ण करण्यासाठी समाज शिक्षणान्तंर्गत एक खालील प्रमाणे पंचसूत्री कार्यक्रम आखलेला आहे.

१. निरक्षर प्रौढामध्ये साक्षरतेचा प्रसार.

२. प्रौढांना आरोग्य शिक्षण व आरोग्य नियमांचे शिक्षण देण्याची व्यवस्था.

३. प्रौढाचा आर्थिक विकासाकरिता उद्योगधंद्याच्या शिक्षण व प्रशिक्षणाची व्यवस्था.

4. प्रौढांच्या वैयक्तिक व सामाजिक गरजांना अनुकूल अशी मनोरंजनाच्या साधनांची व्यवस्था.

५. नागरिकाचे हक्क, कर्तव्ये व अधिकार याविषयी जागरुकता निर्माण करून नागरिकत्वाच्या भावनेचा विकास.

भारत सरकारने आखलेला समाजशिक्षणाचा हा पंचसूत्री कार्यक्रम अंत्यत व्यापक व सर्वस्पर्शी आहे. कार्यक्रमाचे ध्येय लोकांना साक्षर करण्याबरोबरच त्यांची आर्थिक, शारीरीक, मानसिक, सांस्कृतिक तसेच व्यावसायिक प्रगती घडवून आणण्याचे आहे.

## समाज शिक्षणाचे ध्येय व उद्देश

**समाज शिक्षणाचे राष्ट्रीय दृष्ट्रिकोनातून तीन सामान्य उद्देश दिलेले आहेत.**

**१) सामाजिक संघटन (Social Cohesion) :**

भारतीय समाजात धर्म, जात, पंथ, संप्रदाय, यावरुन तसेच ग्रामीण- नागरी, गरीब- श्रीमंत, शिक्षित - अशिक्षित असे सामाजिक वर्ग निर्माण झालेले आहेत. सामाजिक शिक्षणाचा उद्देश म्हणजे अशा सामाजिक वर्गातील भेदभाव नाहीसा करून सामाजिक संघटन निर्माण करणे.

**२) राष्ट्रीय कार्यक्षमता (National Efficiency) :**

भारत हे नवनिर्मीत राष्ट्र असल्याने त्यातील सुप्त शक्तीना जागृत करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने लोकांमध्ये नवचेतना निर्माण करून समृध्द असे राष्ट्र बनविणे.

**३) राष्ट्रीय संकल्पनाचा विकास (Development of National Resolution) :**

देशातील लोकांत आशा, आकांक्षा आणि विश्वास निर्माण करणे ज्यामुळे राष्ट्रीय शक्तीचा अपव्यय न होता त्याचा पुरेपूर उपयोग केला जाईल.

समाज शिक्षणाच्या वरील सामान्य उद्देशावरुन लोकांच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय स्पष्ट होत असले तरी समाजशिक्षणाचे काही कार्यउद्देश पूढील प्रमाणे आहेत.

**१) प्रौढाचा आत्मविश्वास (Self Confidence) :** प्रौढ व्यक्तीमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याकरिता त्याच्या गरजा व परिस्थितीला अनुकुल असे ज्ञान व माहिती देण्याकरिता प्रत्येक

व्यक्तीचे जीवनमुल्ये व उपजत गुणांचा विकास साध्य करण्याकरिता उचित साधनांची व पध्दतीची सोय करणे.

**२) प्रौढाचा शारीरीक विकास (Physical Development) :** शारीरिक विकास साध्य करण्याकरिता आरोग्य विषयक तत्वे, बालस्वास्थ, संतुलित आहार, प्रौढाचे सामान्य आजार व त्यावरील उपाय इत्यादी प्रौढांचे सामान्य आजार व त्यावरील उपाय इत्यादी विषयाचे लोकांना प्रशिक्षण देणे.

**३) प्रौढांचा मानसिक विकास (Mental Development) :** ज्या प्रौढ व्यक्ती आपल्या आर्थिक व कौटूंबिक अडचणीमुळे शालेय शिक्षण घेऊ शकल्या नाहीत त्यांचा मानसिक विकास घडवून आणण्यासाठी उचित व पर्याप्त शिक्षणाची व्यवस्था करणे.

**४) सांस्कृतिक विकास (Cultural Development) :** लोकांना प्राचीन व त्यानंतरच्या संस्कृतीचा परिचय व्हावा यासाठी गीत, लोकनृत्ये, लोकनाट्ये, परिसंवाद, चर्चा, व्याख्यान तसेच इतर सांस्कृतिक कार्यक्रमाव्दारे त्याचा सांस्कृतिक विकास करणे.

**५) सामाजिक कौशल्यांचा विकास (Development of Social Skill) :** लोकांना समाजात राहण्याकरिता, जीवन विकास साधण्याकरिता, कौटूंबिक जीवन सुखी करण्याकरिता आणि समाजातील आपली कर्तव्ये व अधिकार कार्यक्षमपणे पार पाडण्याकरिता सामाजिक कौशल्यांचा विकास व त्याच्या आधारभूत कौशल्याचा विकास घडवून आणणे.

**६) व्यावसायिक कौशल्याचा विकास (Development of Professional Skill):**

लोकांचे व्यावसायिक कौशल्य वाढविण्याकरिता शहरात व्यावसायिक व तांत्रिक शिक्षणाची आणि खेड्यात कृषी व ग्रामीण उद्योगधंद्याच्या शिक्षणाची व्यवस्था करणे.

समाज शिक्षणाच्या वरील उद्देशाने वैयक्तिक विकास साध्य होतो. परंतू व्यक्ती ही समाजाची एक घटक म्हणुन ही प्रत्येकाच्या काही जबाबदाऱ्या व कर्तव्ये असतात. सामाजिक विकासाच्या दृष्टिकोनातूनही समाज शिक्षणाचे खालील चार उद्देश दिलेले आहेत.

**१) सामाजिक ऐक्याचा विकास (Promotion of Social Unity) :**

समाजात परस्पर व्देष, मतभेद, संघर्ष यामुळे गट निर्माण होतात तसेच धर्म, भाषा, जात, वय, व्यवसाय, निवारा, यावरुनही सामाजिक गट निर्माण होतात. प्रत्येक गटाची काही वैशिष्ट्ये असल्यामुळे त्यांचे इतर गटाशी मतभेद असतात. या सर्व सामाजिक गटातील संघर्ष, कलह, भेदभाव, मतभेद कमी करुन समाजाला व देशाला पोषक अशी सामाजिक ऐक्याची भावना प्रत्येकात निर्माण करणे.

**२) राष्ट्रीय साधनांची सुरक्षा व विकास (**Conservation & Improvement of National Resources**):**

राष्ट्रीय साधने दोन प्रकारची असतात १) भौतिक साधने २) मानवी साधने - देशातील भौतिक साधने म्हणजे भूमी, वनसंपत्ती आणि मानवी साधने म्हणजे जनशक्ती. भारताजवळ दोन्ही प्रकारची साधने मुबलक प्रमाणात आहे. भौतिक साधनापेक्षा मानवी साधने अधिक महत्वपुर्ण असली तरी त्याचा योग्य उपयोग करुन घेणे महत्वाचे ठरते. त्यादृष्टीने मानवी श्रमशक्ती, कौशल्य व कार्यक्षमता याचा पुरेपूर उपयोग करून वापर करणे व भौतिक साधनांची सुरक्षा करुन मानवी व भौतिक साधनाचा योग्य समन्वय घडवून आणून उपयोग करणे राष्ट्रीय विकासाकरिता आवश्यक आहे.

**३) सहकारी संस्थाची स्थापना (Formation of Co - operative Institution) :**

देश व समाज विकासाकरिता सहकारी संस्था अतिआवश्यक असतात. याव्दारेच व्यक्ती आपला स्वाभिमान व स्वतंत्र्यता कायम ठेवून व समाजातील गरजा व समस्यांचा अभ्यास करून त्या सोडविण्याकरिता सामुहिकरीत्या प्रयत्न करु शकतात. यासाठी सहकारी संस्था व संघटनाची स्थापना करणे.

**४) सामाजिक आदर्शाचा विकास (Inculcation of Social Ideals):**

प्रत्येक व्यक्तीमध्ये स्वत:विषयी स्वाभिमान आणि गट, समाज व देशाविषयी अभिमान निर्माण करणे, परस्परप्रेम, आदर, आपुलकी, सहकार्य इत्यादी सामाजिक गुणाचा विकास करणे. या सामाजिक आदर्शावरच व्यक्ती समाज व देश यांची प्रगती अवलंबून असते.

## समाज शिक्षणाची आवश्यकता (Need of Social Education)

जगातील सर्वच विकसित, अविकसीत व विकसनशील देशात समाज शिक्षणाचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर राबविला जात आहे. संयुक्त राष्ट्र संघाची संस्था युनेस्को (UNECO) ने सर्वच देशात विशेषतः अविकसीत आणि विकसनशील देशात समाजशिक्षणाचे कार्य सुरु करुन आर्थिक मदतही देत आहेत. प्रत्येक देशाने आपापल्या प्रगतीचे कार्य सुरु केलेल आहे. समाज शिक्षण लोकांतील विज्ञान विषयीचा भ्रम नाहीसा करण्यासाठी आवश्यक आहे. भारतात अन्य देशाच्या तुलनेत सामाजिक, आर्थिक शैक्षणिक व इतर क्षेत्रातही बराच मागासलेला राहिला आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच भारताला इतर देशाच्या बरोबरीने विकास साध्य करून कार्य करावयाचे आहे. देशाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी भारत सरकारने पंचवार्षिक योजना, समुदायिक विकास योजना, राष्ट्रीय विस्तार योजना, सहकारी चळवळ इत्यादी योजना सरु केलेल्या आहेत. परंतू या योजनाची सफलता सर्वस्वी लोकांनी दिलेल्या सहकार्यावरच अवलंबून आहे. या योजना राबवितांना लोकाचे अपेक्षित सहकार्य मिळाले नाही. कारण देशातील बहुसंख्य लोकांची निरक्षरता आणि अज्ञानता याकरिता बाधक ठरली.

समाज शिक्षणाव्दारे लोकातील अंधविश्वास, स्वार्थ, रुढिप्रियता नष्ट करुन, वैयक्तिक व सामाजिक विकासाची त्यांना जाणीव करून देऊन विकास कार्यासाठी प्रवत्त केले जाते. सर्वसामान्य लोक राजनैतिक व सांप्रदायिक प्रचाराला बळी पडतात. त्याच्यात स्वनिर्णय घेण्याची क्षमता समाजशिक्षणामुळेच केली जाऊ शकते. देशात धर्म, जात, पंथ, वर्ग संप्रदाय यानुसार वर्गकलह निर्माण होत असल्याने अल्पसंख्याक लोकांना नेहमी असुरक्षिततेची भीती वाटत असते. तसेच अशा प्रकारचा वर्गकलह देशातील सांप्रदायिक ऐक्य कायम ठेवण्याकरिता व विकासाकरिता घातक ठरतो. विविध सामाजिक वर्गातील मतभेद, कलह, व्देष, संघर्ष कमी करुन परस्पर प्रेम, आदर, सहकार्याची भावना वाढविणे समाजशिक्षणामुळे शक्य होते. देशात वाढत्या लोकसंख्येमुळे सर्वांनाच रोजगार उपलब्ध न होऊ शकल्याने बरोजगारीची समस्या तीव्र रुप धारण करु लागली आहे. समाजशिक्षणाव्दारे लोकांना विविध व्यवसाय व फुरसदीच्या वेळेचा सदुपयोग करण्याचे शिक्षण दिले जात असल्यामुळे बेरोजगारीची समस्या कमी होण्यास मदत होते. समाज शिक्षणामुळे प्रत्येकाला आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजनितीक, नैतिक शैक्षणिक विकास होत असल्याने देशाचाही सर्वांगीण विकास साध्य होतो.

समाज शिक्षण हा बहुउद्देशीय विकासाचा प्रयत्न आहे. भारत एक धर्मनिरपेक्ष जनतांत्रिक राष्ट्र असल्याने नागरिकांना फक्त त्याचे अधिकार, कर्तव्ये व जबाबदारी यांची जाणीव करून देणे ऐवढेच कार्य नसून त्याचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याची जबाबदारी ही शासनावर आहे. त्यासाठी समाजशिक्षणाचा राष्ट्रीय कार्यक्रम व्यापक प्रमाणावर सुरु केलेला आहे. समाज शिक्षणाची आवश्यकता पुढील प्रमाणे स्पट करता येईल.

**१) निरक्षर प्रौढाची गरज :**

निरक्षर लोकांची संख्या लोकसंख्या वाढीमुळे दरवर्षी वाढत आहे. याची प्रमुख दोन कारणे आहेत. भारतीय राज्यघटनेप्रमाणे १४ वर्षे पर्यंतच्या मुलांमुलीना घटना अमलात आल्यापासून दहा वर्षाच्या कालावधीत अनिवार्य व निशु:ल्क शिक्षण देण्याचे निश्चित केल्या गेले होते. परंतू हे लक्ष्य अजूनही पूर्ण झालेले नाही. दुसरे कारण म्हणजे ग्रामीण क्षेत्रातील बहुसंख्य कुटूंबाची आर्थिक परिस्थिती इतकी हलाखीची असते की, मुले-मुली प्राथमिक शिक्षण देखील घेऊ शकत

नाही. या दोन्ही कारणामुळे शिक्षण न मिळालेले मुले-मुली मोठी झाल्यावर त्यांना निरक्षर प्रौढ म्हटले जाते. समाजात साक्षर लोकांपेक्षा निरक्षर लोकांचा दर्जा कमी लेखला जाऊन उच्च वर्गाकडून त्याचे शोषण केले जाते. अशिक्षित नागरिकांना समाज शिक्षणाव्दारे शिक्षण देऊन त्यांना आपल्या अधिकारांची जाणीव करून देण्याची गरज आहे.

**२) अर्ध शिक्षित प्रौढांची गरज :**

भारतातील अनेक मुले मुली त्याच्या आर्थिक, कौटूंबिक व इतर कारणामुळे आपले प्राथमिक शिक्षण पूर्ण करु शकत नाहीत. अशा मुलांना ती मोठी झाल्यानंतर अर्धशिक्षित प्रौढ म्हटले जाते. सामान्यत: प्राथमिक शिक्षण पाठ्यक्रम पुर्ण करणाऱ्या व्यक्तीची गणना साक्षर म्हणून केली जाते. अशा या अर्धशिक्षित लोकांना आपले शिक्षण पूर्ण करुन साक्षर करण्याकरिता व जबाबदार नागरिक बनविण्याकरिता समाज शिक्षणाची आवश्यकता आहे.

**3) प्रौढ नागरिकांची गरज :**

नागरिकांनी स्वत: ची आर्थिक व सामाजिक उन्नती घडवून आणून राष्ट्रीय सुरक्षा करण्याकरिता देशाच्या विकास कार्यक्रमात कौशल्यपूर्ण व बध्दिमत्तापूर्ण रीतीने सहभागी होणे आवश्यक आहे. भारतासारख्या प्रचंड व नवनिर्मीत राष्ट्राकरिता, ज्यातील बहुसंख्य लोकांना औपचारिक शिक्षण प्राप्त झालेले नाही व झाले असले तरी ते विकास कार्याकरिता निरुपयोगी आहे. अशा वेळी समाजशिक्षणाची आवश्यकता आहे. ज्या व्यक्ती शेती करतात त्यांना शेतीचे संपूर्ण ज्ञान असणे आवश्यक आहे. याकरिता प्रत्येक प्रौढ नागरिकाला आपापल्या व्यवसाय व कार्याचे ज्ञान देण्यासाठी समाज शिक्षणाची आवश्यकता आहे.

**४) पूर्ण शिक्षणाची गरज :** भारतातील प्रचलित शिक्षणपध्दती अपूर्ण व दोषपूर्ण आहे कारण हे शिक्षण व्यक्तीचे वास्तविक जीवन, आशा, आकांक्षा व गरजा यांच्याशी असंबध्द आहे. शालेय शिक्षणाचा व्यावहारिक जीवनपध्दतीत फारसा उपयोग होत नाही. नागरिकांना विज्ञानामुळे प्रत्येक क्षेत्रात होणारे परिवर्तन आणि समाजात निर्माण होणाऱ्या समस्या याची माहिती असणे आवश्यक आहे. शिक्षणातील याप्रमाणे दोष दूर करुन वास्तविक शिक्षण प्राप्त करण्यासाठी पूर्ण शिक्षणाची गरज आहे.

**५) आर्थिक गरजा :**

ग्रामीण विभागातील जनता नागरी समाजाच्या तुलनेत आर्थिकदृष्ट्या मागासलेली आहे. त्यांचे दरडोही उत्पन्न अत्यल्प आहे. लोकांची आर्थिक गरज पूर्ण करण्याकरिता विविध योजना अंमलात आणल्या जात आहेत. नागरी लोकांना व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण देऊन आणि ग्रामीण लोकांना शेती व ग्रामीण उद्योगधंद्याचे शिक्षण देऊन त्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी समाज शिक्षणाची आवश्यकता आहे.

**६) सामाजिक गरजा :** समाजाच्या विकासाचा मूळ आधार लोकांतील परस्पर सहकार्य हा आहे. सहकार्यामुळेच समाजाला शक्ती मिळून समाजाचे रक्षण व अस्तित्व कायम ठेवले जाते. परंतू समाजात परस्परव्देष, संघर्ष, वैमनस्य, भेदभाव, इत्यादी समाजविघातक प्रवृत्ती दिसून येतात. या समाज विघातक प्रवृत्ती नष्ट करून लोकांमध्ये परस्पर सहकार्य, आदर, आपुलकी, प्रेम, सदभावना, इत्यादी समाजजीवनाला पूरक अशा प्रवृत्ती निर्माण करण्यासाठी प्रौढ शिक्षणाची गरज आहे.

**७) राजकिय गरजा :** ग्रामीण व नागरी विभागातील मुले - मुली, तरुण - तरुणी यांना देशाचे कार्यक्षम, जबाबदार व आत्मनिर्भर नागरिक बनविण्यासाठी समाज शिक्षणाची आवश्यकता आहे.

**८) देशाच्या गरजा :**

निरक्षर व्यक्ती देशाला अभिशाप आहे. निरक्षरामुळे होणारी देशाची हानी दिसून येत नसली तरी त्यामुळे फार मोठे नुकसान होते. कारण आर्थिक उत्पादकता, लोकसंख्या, नियंत्रण, राष्ट्रीय एकात्मता, सुरक्षा आणि आरोग्य याविषयीच्या योजना निरक्षरामुळेच अयशस्वी होऊन

देशाच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीमध्ये बांधक ठरतात. देशाच्या आर्थिक, सामाजिक व राष्ट्रीय प्रगतीला सामर्थ्य प्रदान करण्यासाठी निरक्षरांना साक्षर करणे हे समाज शिक्षणाचे प्रमुख कार्य आहे.

थोडक्यात, समाज शिक्षण ही प्रत्येक व्यक्तीची गरज असल्याने पर्यायाने देशाचीही गरज आहे. समाज शिक्षणाने प्रत्येकाचा बौध्दिक विकास होत असल्याने त्याचा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकिय विकासही होत असतो.

## समाज शिक्षणातील प्रमुख अडचणी व त्यावरील उपाय :

भारतातील शासनकर्ते, राजनितीज्ञ, शिक्षणतज्ञ आणि समाजसुधारक यांनी जोपर्यंत समाजशिक्षणाचे योग्य रीतीने नियोजन करुन साक्षरता प्रसार केला जाणार नाही, तोपर्यंत लोकांच्या आर्थिक व सामाजिक विकासाच्या योजना पूर्ण होऊ न शकल्याने देशाचा विकास होणार नाही. याविषयी एकमत आहे. विविध योजनेअंन्तर्गत साक्षरता प्रसार करण्यात आला. देशातील साक्षरतेच्या प्रमाणात उत्तरोत्तर प्रगती दिसून येत असली तरी लोकसंख्या वाढीमुळे निरक्षरांची संख्याही पूर्वीपेक्षा वाढलेली आहे. निरक्षरता निर्मूलनाचे कार्य अजुनपर्यंत पूर्ण झालेले नाही. समाज शिक्षण कार्याला बाधक ठरणाऱ्या काही प्रमुख समस्या व अडचणी पुढील प्रमाणे आहेत.

**१) निरक्षरता :**

समाजशिक्षण कार्यातील प्रमुख समस्या निरक्षरता हीच आहे. देशातील बहुसंख्य जनता निरक्षर असल्याने समाजशिक्षणाचे प्रयत्न निरर्थक ठरतात.

**२) वाढती लोकसंख्या:** समाज शिक्षणातील दुसरी महत्वाची समस्या म्हणजे देशातील वाढती लोकसंख्या ही आहे. लोकसंख्या वाढीचा दर जास्त असल्यामुळे नवीन सर्वच बालकाकरिता प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था करणे कठीण जाते. त्यामुळे निरक्षरांची संख्या दिवसेंदिवस वाढत चाललेली असून घटनेत नमूद केल्याप्रमाणे अनिवार्य व निःशुल्क शिक्षणाची व्यवस्था करण्यात अपेक्षित यश आलेले नाही.

**३) अनुरुप अभ्यासक्रमाचा अभाव :**

प्रौढाच्या अभिरुची आणि आवडीशी अनुरुप असलेल्या पाठ्यक्रमाचा अभाव समाजशिक्षण कार्यात दिसन येतो. देशातील विविध राज्यात अनेक भाषा व लोकभाषा असल्याने सर्वांना उपयुक्त असा निश्चित पाठ्यक्रम तयार करणे कठिण कार्य आहे. तसेच नवसाक्षराकरिता परेशा प्रमाणात पाठ्य पुस्तके, पत्रपत्रिका, मासिके व इतर साहित्य निर्माण झालेले नाही.

**४) अनुरुप पध्दतीचा अभाव :**

औपचारिक शिक्षणात ज्या शिक्षणपध्दतीचा अवलंब करण्यात येतो ती शिक्षण पध्दती समाज शिक्षणाकरिता उपयुक्त ठरु शकत नाही. कारण प्रौढ वयात शिक्षण घेण्याचा उत्साह कमी झालेला असतो. त्याची अभिरुची निश्चित झालेली असते. कौटंबिक कारणामळे ते चिंताग्रस्त असतात. प्रौढ लोकांच्या शिक्षणात त्यांच्या वैयक्तीक समस्या, कौटंबिक जबाबदारी. आर्थिक कमतरता, रुढी परंपरा, अंधश्रध्दा इत्यादी बाधक ठरतात. प्रौढ व्यक्ती निरक्षर असल्यातरी त्याचा बौध्दिक विकास झालेला असतो. या सर्व अडचणी लक्षात घेऊन प्रौढांना शिक्षण देण्याकरिता अनुरुप अशी आदर्श शिक्षण पध्दती निश्चित झालेली नाही.

**५) शिक्षकांचा अभाव :**

समाज शिक्षणातील महत्वाची समस्या म्हणजे प्रौढ शिक्षणासाठी भासणारी शिक्षकांची कमतरता ही होत. समाज शिक्षणाचे कार्य साधारणत: सामाजिक कायकर्ते व प्राथमिक व माध्यमिक शाळाचे शिक्षण करतात. ज्यांना समाज शिक्षणातील अडचणी आणि प्रौढांच्या मनोविज्ञानाचे ज्ञान नसते. समाज शिक्षण देण्यासाठी कार्यक्षम अशा प्रशिक्षित शिक्षकांची संख्या

लाखोनी असावयास हवी, समाज शिक्षण देणाऱ्या शिक्षकांत अद्‌यम्य उत्साह, सेवाभाव, सहन शिलता, बंधुभावना, सहकार्य इत्यादी गुण असावयास पाहिजे. अशा गुणानी उपयुक्त अशा शिक्षकांची कमतरता आहे.

**६) शैक्षणिक साधनांचा अभाव :**

समाज शिक्षण यशस्वी करण्याकरिता विविध शैक्षणिक साधनांची कमतरता दिसून येते. ज्यामध्ये चित्रपट, माहितीपट, प्रकाशचित्रे, आलेख, तक्ते, भित्तीपत्रके, रेखाचित्रे झलकचित्रे, प्रदर्शनी, संग्रहालय, ग्रंथालय, टेलिव्हीजन, पत्रपत्रिका आणि नवसाक्षरांकरिता उपयुक्त साहित्य, चर्चासत्र, गटचर्चा, मेळावे, उत्सव सहली, परिसंवाद, नाट्य इत्यादी पध्दती व साधनांचा अभाव दिसून येतो. अर्थात ही समस्या प्रामुख्याने धनाच्या अभावामुळेच निर्माण झालेली आहे.

**७) आर्थिक अडचणी :**

देशातील बहुसंख्य लोकांचे दारिद्र्य ही समाजशिक्षणातील महत्वाची अडचण आहे. देशातील विशेषतः ग्रामीण लोकांचा जीवनस्तर खालावलेला आहे. त्याची आर्थिक परिस्थिती अंत्यत हलाखीची आहे आणि यामुळे त्यांना शिक्षणाची आवड असली तरी ते शिक्षणावर काहीही खर्च करू शकत नाही. महागाई आणि धनाच्या अभावामुळे ते आपल्या प्राथमिक गरजा पूर्ण करण्यास असमर्थ असल्याने शिक्षणावर खर्च करणे त्यांना योग्य वाटत नाही.

**८) परस्पर समन्वयाचा अभाव :**

समाज शिक्षणाची प्रमुख जबाबदारी राज्य सरकारची असली तरी संपूर्ण जबाबदारी कोणताही एक विभाग व संस्थेकडे नाही. समाज शिक्षणाचे कार्य केंद्र आणि राज्यसरकारचे विविध विभाग, शिक्षण विभाग, सामदायिक विकास योजना, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, नगरपरिषद, तसेच ऐच्छिक संस्था व संघटना याच्यात परस्पर सहकार्य व योग्य समन्वय साधला न गेल्याने व कुणाही एकाचा ता जबाबदारी नसल्याने समाज शिक्षणाचे मर्यादित प्रयत्न केले जातात.

**९) निरक्षरता निर्मूलनाचा अभाव :**

भारतातनिरक्षरता निर्मूलनाचे कार्य उत्साहाने चालविले जाते. प्रत्येक पंचवार्षिक योजनेमध्ये समाज शिक्षणाचे कार्य हाती घेऊन साक्षरता प्रसाराचे प्रयत्न केले जातात. परंतु हे सर्व प्रयत्न निरक्षरांना साक्षर करण्याकरिताच केले जातात. समाज शिक्षणाचे कार्य केवळ निरक्षरांना साक्षर करण्याचे नसून त्यांच्या आर्थिक व सामाजिक विकासाकरिता सतत शिक्षण देण्याचे आहे.

**१०) प्रौढ शिक्षणाचा अभाव :**

भारतातील निरक्षर लोकसंख्येच्या तुलनेत समाज शिक्षणावर केला जाणारा खर्च अत्यल्प आहे. पहिल्या चार पंचवार्षिक योजनेवरुन असे दिसते की शिक्षणावरील एकूण खर्चात उत्तरोत्तर वाढ केलेली असली तरी प्रौढ व समाज शिक्षणावरील खर्च कमी कमी होत गेलेला दिसून येतो. पाचव्या व सहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये समाज शिक्षणावर अधिक निधी उपलब्ध करुन दिल्याचे दिसत असले तर शिक्षणावरील एकूण खर्चाच्या तुलनेत व निरक्षरांची वाढती लोकसंख्या लक्षात घेता हा खर्च कमी असल्याचे जाणवते. समाज शिक्षणाचे कार्य अधिक जोमाने व जलद गतीने व्हावे यासाठी आणि देशातील निरक्षरता दूरव्हावी यासाठी खालील काही उपाय सूचविले गेले आहेत.

१) सर्वत्र प्रौढ शाळा स्थापन करून त्या नियमित चालविल्या जाव्यात.

२) समाजशिक्षणाकरिता व प्रौढ शिक्षणाकरिता पूर्ण वेळ अशा प्रशिक्षित शिक्षकांची नियुक्ती केली जावी.

३) ग्रामीण क्षेत्रातील तसेच मजूर व कामगार प्रौढांना समाज शिक्षणाविषयी आकर्षित करण्यासाठी छात्रवृत्ती व अन्य स्वरुपात मदत करण्यात यावी.

४) महिला, आदिवासी, हरिजन, मागासलेल्या जाती, जमाती, शैक्षणिक व सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या वर्गातील प्रौढांना त्याच्या परिस्थितीला अनुरुप व अनुकुल असे शिक्षण द्यावे.

५) प्रौढ शाळेची वेळ अशी निश्चित करावी की, जी समाजशिक्षण, शिक्षक व प्रौढांना सोयीची असेल विशेतः या वेळेमुळे प्रौढांचे आर्थिक नुकसान होणार नाही.

६) प्रौढ शिक्षणात शिक्षणाबरोबरच मनोरंजन कार्यक्रमाचाही समावेश करण्यात यावा.

७) प्रौढ शिक्षणाकरिता उपयुक्त अशा साहित्याची निर्मिती प्रांतीय भाषेतून केली जावी. समाज शिक्षणाकरिता विविध साधने पध्दतीचा वापर केला जावा. तसेच प्रौढांना केवळ साक्षर करुन कार्य न थांबविता ते पुढेही त्याच्या विकासाकरिता सतत सुरु ठेवावे.

भारतातील भौगोलिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, सामाजिक व इतर विषमता नष्ट करुन राष्ट्रीय एकता निर्माण करण्यासाठी समाज शिक्षण कार्याकरिता जलद गतीने व उत्साहाने प्रयत्न करणे महत्वाचे आहे. समाज शिक्षण ही कुणाही एकाची जबाबदारी नसून त्याकरिता शासन, पुढारी, संस्था, संघटना व जनता या सर्वांनी एक दिलाने संघटितरीत्या प्रयत्न करणे आवश्यक आहे.

## लोकशाही सत्तेचे विकेंद्रीकरण ( पंचायत राज )

भारतामधील ब्रिटिशांची सत्ता संपुष्टात आल्यानंतर देशाचा सर्वांगीण विकास साधण्याच्या दृष्टीने प्रथम पंचवार्षिक योजना तयार करण्यात आली व तिची अंमलबजावणी १ एप्रिल १९५१ पासून सुरू झाली. त्यानंतर ग्रामीण विकासाला चालना देण्यासाठी २ ऑक्टोबर १९५२ पासून सामुदायिक विकासाचा प्रयोग सुरू करण्यात आला. शेतीबरोबरच पशुसंवर्धन, पाटबंधारे, ग्रामीण उद्योग, सहकारी व्यवस्था दळणवळणाच्या सोयी, शिक्षण, आरोग्य इत्यादी विकास साधण्याचा प्रयत्न केला जात होता. लोकांचा सर्वांगीण विकासाकरिता उपलब्ध असलेल्या साधन सामुग्रीचा उपयोग करून घेण्यासाठी व विकासाच्या विविध योजना त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी राष्ट्रीय विस्तार योजना २ ऑक्टोबर १९५३ पासून सुरु करण्यात आली.

सामुदायिक विकास योजना व राष्ट्रीय विस्तार योजनेच्या प्रगतीचा आढावा घेऊन मूल्यमापन करण्यासाठी योजनांना मिळालेल्या अपयशाची कारणमीमांसा करून जनतेचे सहकार्य मिळाले नाही याची कारणे शोधून काढण्यासाठी आणि योजना यशस्वी करण्यासाठी जनतेचे सक्रिय सहकार्य मिळावे याकरिता उपाय देण्यासाठी म्हणून भारताच्या राष्ट्रीय विकास परिषदेने व नियोजन मंडळाने जानेवारी १९५७ मध्ये श्री बलवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यासगट नेमण्यात आला. त्या अभ्यासगटाला मेहता समिती या नावाने ओळखले जाते.

### मेहता समितीच्या लोकशाही विकेंद्रीकरणाबाबत शिफारशी :

भारतातील ग्रामीण जनतेला विकास कार्यात सहभागी करून घेण्यासाठी प्रातिनिधिक लोकशाही स्वरुपाच्या स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन करून त्या संस्थेला योग्य त्या रीतीने कार्य करण्यासाठी आवश्यक असलेले अधिकार व साधने विकेंद्रीत करावी अशी भूमिका मेहता समितीने घेतली. त्यामुळे केंद्र व राज्य याठिकाणी केंद्रीत झालेली सत्ता विकेंद्रित होऊन ती शासनाच्या खालच्या स्तरावरील स्थानिक संस्थांना प्राप्त होत असते. ग्रामीण विकासाचे ध्येय धोरण आखणे, स्थानिक समस्या सोडविण्याकरिता उपाय योजून अमलात आणणे याबद्दलचे संपूर्ण अधिकार शासकीय अधिकाऱ्याऐवजी संस्थेतील लोकप्रतिनिधीना प्राप्त होते. म्हणून या पध्दतीला" लोकशाही सत्तेचे विकेद्रीकरण" (Democratic Decantralisation of Power) असे म्हटले जाते. लोक विकासाचे अधिकार व सत्ता लोकप्रतिनिधीनाच प्राप्त झाल्यानेच या योजनेला "पंचायत राज' (पंचाचे राज्य) असेही म्हटले जाते. तसेच हे लोकशाही विकेद्रीकरण शासनाच्या खालच्या तीन स्तरावर ज्याचा ग्रामीण जनतेशी जवळचा व घनिष्ठ संबंध असतो अशा ग्रामस्तरावर

"ग्रामपंचायत" खंड / गट स्तरावर "पंचायत समिती" आणि जिल्हा स्तरावर "जिल्हा परिषद" या स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन करुन त्याच्याकडुन राबविले जात असल्यामुळे या योजनेला त्रिस्तरीय योजना किंवा त्रिसुत्रीय योजना (Three tier System) असेही म्हणतात.

मेहता समितीने आपला अहवाल शिफारशीसह २४ नोव्हेंबर १९५७ ला केंद्र सरकारला सादर केला त्या शिफारशी पुढील प्रमाणे आहेत.

१) ग्रामपंचायतीची स्थापना प्रौढ मतदान पध्दतीवर आधारलेल्या प्रत्यक्ष निवडणुकीव्दारे व्हावी.

२) पंचायतीमध्ये दोन स्त्री सभासद व अनुसूचित जातीचा आणि जमातीचा प्रत्येकी एक प्रतिनिधी स्वीकृत करण्याची तरतूद असावी.

३) ग्रामपंचायतीकडे जमीन महसूल वसूल करण्याची शिफारस केली आहे व ह्या कामासाठी त्यांना काही कमिशन द्यावे. (महसूलाच्या निव्वळ रक्कमेपैकी ७५ टक्के ग्रामपंचायतीना द्यावी).

४) ग्रामपंचायतीचे अंदाजपत्रक तपासण्याचा अधिकार व मंजूर करण्याचा अधिकार पंचायत समितीकडे राहावा.

५) न्याय पंचायतीचे कार्यक्षेत्र काही खेड्याच्या गटापुरते मर्यादित असावे.

६) पंचायत समितीला देण्यात आलेले सर्व अधिकार त्या संस्थेला देण्यात यावेत व पंचायत समितीकडे सोपविलेली सर्व कामे तिच्याकडे सोपवावीत. मात्र त्याचे प्रमाण तुलनात्मकदृष्ट्या मोठे असावे.

७) आवश्यक निधी, कर बसविण्याचे अधिकार आणि जरुर तो कार्यकारी आणि देखरेख करणारा नोकरवर्ग त्या संस्थेला मिळवून द्यावा.

८) जिल्हा संस्थेचा प्रतिनिधी म्हणून विकास गट क्षेत्रातील सर्व संकल्पित कामे पार पाडण्याकरिता विकास गटात पंचायत समित्या स्थापन करुन त्या गटात करण्यासाठी आवश्यक असलेला सर्व निधी त्याच्याकडे सुपूर्त करावा.

९) ज्या ठिकाणी पंचायत समित्या स्थापन झाल्या नसतील अशाच विभागात आणि विकास गटान्तर्गत व जिल्हा संस्थेने प्रत्यक्ष काम करावे.

१०) सदरहु संस्थेला ग्रामीण विकासाचे काम परिणामकारकरीत्या करावयाचे असल्याने तिच्यात एकात्मता राहील अशी ती आटोपशीर असावी.

मेहता समितीने या अहवालातील व दिलेल्या प्रमुख शिफारशी राष्ट्रीय विकास मंडळाने १९५८ मध्ये स्वीकृत करुन या शिफारशी थोड्याफार फरकाने आपापल्या राज्यात तत्संबधी कायदा करून लागू कराव्या अशा सूचना राज्य सरकारला करण्यात आल्या. राजस्थान सरकारने पूर्ण राज्यात सर्वप्रथम (नागोर) १९५९ साली २ ऑक्टोंबर महात्मा गांधी जन्मदिवशी पंचायत राज पध्दत सुरु करुन लोकशाही विकेंद्रीकरणाचा पाया घातला.

**महाराष्ट्रातील पंचायत राज व त्याची वैशिष्ट्ये**

१ मे १९६० रोजी व्दिभाषिक मुंबई राज्याचे विभाजन होऊन महाराष्ट्र व गुजरात ही दोन राज्ये अस्तित्वात आली. स्वतंत्र्य महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर लगेच २७ जून १९६० ला त्यावेळेचे महसूल मंत्री श्री.वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली पंचायत राज स्थापनेसाठी "लोकशाही विकेंद्रीकरण समिती" नेमण्यात आली. या समितीने आपला अहवाल शिफारशीसह १५ मार्च १९६१ ला सादर केला.

महाराष्ट्र राज्य सरकारने नाईक समितीच्या शिफारशीनुसार "महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१" हा कायदा तयार केला. १९५८ च्या मुंबई राज्य ग्रामपंचायत अधिनियमानुसार ग्रामपंचायती व ग्रामसभा अस्तित्वात होत्याच, त्याची सांगड जिल्हा परिषद व पंचायत समितीशी घालण्यात आली. दिनांक १ मे १९६२ या महाराष्ट्र दिनांपासून या कायद्याच्या

अंमलबजावणीला सुरु होऊन २५ जिल्हापरिषदा व २९३ पंचायत समित्या स्थापन करण्यात आल्या. जिल्हा स्तरावर "जिल्हा परिषद", खंड स्तरावर "पंचायत समिती" आणि ग्रामस्तरावर "ग्रामपंचायतीचा" कारभार सुरु होऊन लोकशाही सत्तेच्या विकेंद्रीकरणाव्दारे ग्रामीण लोकांच्या हातात सत्ता सोपविण्यात आली. पंचायत राज पध्दती कार्यवाहीत आणणारे महाराष्ट्र हे नववे राज्य होय.

**महाराष्ट्र पंचायत राज्याची वैशिष्ट्ये** :

मेहता समितीच्या शिफारशीनूसार प्रत्येक राज्यातच स्थानिक परिस्थितीप्रमाणे कमी अधिक प्रमाणात फरक करून लोकशाही विकेंद्रीकरकणाला मूर्त स्वरुप देण्यात आले. परंतु नाईक समितीच्या शिफारशीवरुन महाराष्ट्र राज्यात अस्तित्वात आलेले पंजायत राज्य इतर राज्यातील पंचायत राज पध्दतीपेक्षा आगळे, भिन्न स्वरुपाचे आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे.

१) महाराष्ट्र राज्यात जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत या स्त्रिस्तरीय संस्थापैकी जिल्हा परिषदेला अग्रक्रम देऊन स्वतंत्र्य व अधिकारपूर्ण कार्यवाहीचे स्थान दिलेले आहे. त्यामूळे पंचायत समितीला स्वतंत्र्य स्थान मिळालेले नाही. पंचायत समिती ही जिल्हा परिषदेचे प्रमुख कार्यवाहीचे अंग आहे. राज्य सरकारने वेळोवेळी सोपविलेली कामे जिल्हा परिषदेला पंचायत समितीमार्फतच करावी लागतात. या विशिष्ट रचनेमूळे जिल्हापरिषद व पंचायत समिती याच्यात संघर्षाचे प्रसंग होत नाही.

२) महाराष्ट्रातील पंचायत राजचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्यक्ष निवडणूकीचे स्वीकारलेले तत्व होय. पंचायत समित्यांच्या फक्त सभापतीना जिल्हा परिषदेवर पदसिध्द सदस्यत्व दिलेले आहे. त्यामुळे जिल्हा परिषद व पंचायत समिती याच्यात समन्वय साधला जातो. जिल्हा परिषदामध्ये प्रत्यक्ष निवडणूकीने लोकांनी निवडून दिलेल्या सदस्यांची संख्या जास्त असल्यामुळे ग्रामीण नेतृत्व विकासाला चालना मिळून खऱ्या अर्थाने जिल्हा परिषद प्रातिनिधिक स्वरूपांची संस्था झालेली आहे. सहकारी संस्थात राजकारण शिरु नये म्हणून सहकारी संस्थांच्या प्रतिनिधींना परिषदेवर सहयोगी सभासदत्व दिल्याने त्यांना पदाधिकारी होण्याचा व मताचा हक्क नाही. बहुतेक राज्यात स्त्रिया, अनुसूचित जाती व जमाती यांच्या प्रतिनिधीना स्वीकृत केले जाते. महाराष्ट्रात अशी योजना फक्त स्त्री प्रतिनिधीसाठीच आहे. अनुसूचीत जाती व जमाती यांच्यासाठी राखीव मतदार संघ असतात.

३) महाराष्ट्र पंचायत राज्यात आमदार व खासदारांना जिल्हा परिषदेमध्ये कोणतेही स्थान नाही. जिल्हा व त्याखालील नेतत्व विकासास अधिक संधी मिळावी म्हणन ही तरतूद केली आहे. तसेच जिल्हाधिकायांचा परिषदेशी दैनंदिन संबंध ठेवलेला नाही. लोकांच्या संस्थात सरकारी अधिकाऱ्यांना स्थान दिल्यास लोकशाही स्वरुपास बाधा येते असे नाईक समितीचे म्हणने आहे.

४) राज्यक्षेत्र व स्थानिक क्षेत्र असे विभाजन करणे हे महाराष्ट्र पंचायत राज्याचे महत्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. राज्य क्षेत्रातील कामे सरकारी खात्यामार्फत व स्थानिक क्षेत्रातील कामे जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत यांच्यामार्फत केली जातात.

५) महाराष्ट्रातील पंचायत राज्यात जिल्हा परिषद व तिच्या विषय समित्या, पंचायत समिती व त्याचे पदाधिकारी हे त्या त्या संस्थेने आपल्या निर्वाचित सदस्याकडून निवडून दिले जातात. महाराष्ट्रातील विषय समित्या मात्र प्रत्यक्ष कार्यवाही करणाऱ्या असून जिल्हा परिषद स्थायी समिती, विषय समित्या व पदाधिकारी याचे अधिकार स्वतंत्रपणे कायद्याने ठरवून दिलेले आहेत. पंचायत समितीच्या सभापतीलाही अधिकार दिलेले आहेत. महाराष्ट्रातील जिल्हा परिषदा केवळ सल्लागार स्वरुपाच्या नसून त्या कार्यकारी व प्रशासकीय आहे.

महाराष्ट्र सरकारने इतर राज्यापेक्षा अशी ही वेगळी व वैशिष्ट्यपूर्ण पध्दती सुरु करून लोकांच्या हातात सत्ता जायला पाहिजे म्हणून यामागील उदात्त हेतू सफल करण्याकरिता

लोकप्रतिनिधी जबाबदारीची जाणीव ठेवून कार्य करतील तरच पंचायत राज्याचे भवितव्य उज्वल आहे.

## पंचायत राजची उदिष्टे (Objective of Panchyat Raj) :

सामुदायिक विकासाच्या कार्यक्रमांना जिह्या-जिह्यातून गती मिळावी व लोकांनी त्याच्या समस्यांच्या परिपूर्तीसाठी स्वंयस्फुर्तपणे सक्रिय सहाय्य देऊन पुढाकार घ्यावा हा प्रमुख उद्देश पंचायत राज निर्मितीचा आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये पंचायत राज्याची जी उदिष्ट्ये घालून देण्यात आली ती पुढील प्रमाणे आहेत.

१) शेती उत्पादन वाढविणे.

२) ग्रामीण उद्योग धंद्याचा विकास करणे.

३) अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी सहकारी चळवळींना उत्तेजन देणे.

४) स्थानिक साधन संपत्तीचा व मनुष्यशक्तीचा पुरेपूर उपयोग करणे.

५) समाजातील दुर्बल घटकांना मदत करणे.

६) वाढत्या क्रमाने अधिकाराचे व कार्याचे वाटप करणे व असे करीत असतांना ऐच्छिक संघटनांना प्रोत्साहन देणे.

७) लोकामध्ये एकिची भावना निर्माण करुन त्याच्यात सहकार्याची भावना वाढीस लावणे.

८) जनतेचे सेवक व लोकप्रतिनिधी याच्यामध्ये एकोपा निर्माण करून त्याची कर्तव्ये व जबाबदाऱ्या ठरवून देणे.

९) सरकारी व बिनसरकारी अधिकारी याची कार्यक्षमता वाढविणे.

१०) पंचायत राज संस्थांना मिळणारा पैसा, सवलती, नोकरवर्ग, तांत्रिक सहाय्य इत्यादीचा जास्तीत जास्त उपयोग करणे.

# घटक - ३

## विस्तार शिक्षण (Extension Education)

विसाव्या शतकातील विस्तार -शिक्षण किंवा विस्तार कार्य ही योजनाबध्द सामाजिक परिवर्तन घडवून आणणारी महत्वाची प्रक्रिया आहे. जगातील समाज अनेकविध घटकांवरुन ग्रामीण आणि नागरी समाजात विभागला गेला आहे. नागरी व ग्रामीण समाजातील फरक कमी व्हावा व समाजवादाव्दारे सर्वांना समान आर्थिक व सामाजिक न्याय मिळावा यासाठी नवीन उपलब्ध झालेले ज्ञान व तंत्र ग्रामीण लोकांपर्यंत पोहचवून त्यांच्या आर्थिक व सामाजिक तसेच इतर क्षेत्रात परिवर्तन घडवून आणणे आवश्यक ठरते.

विस्तार Extension हा शब्द लॅटिन भाषेतील tensio म्हणजे Stretching आणि ex म्हणजे out या शब्दापासून बनलेला आहे. ज्याचा अर्थ Stretching out म्हणजे ज्ञान किंवा माहिती प्रसारित करणे असा होतो. यावरुन विस्तार - शिक्षण Extension - education म्हणजे लोकांमध्ये शाळा व महाविद्यालयातील शिक्षण पध्दती व्यतिरिक्त विविध बाबीचे ज्ञान शिक्षणाव्दारेच प्रसारित करणे. अमेरिकेच्या संयुक्त राष्ट्रसंघाने या प्रकारच्या शिक्षणाला "विस्तार शिक्षण' असे नाव दिले Websters Dictionary मध्ये विस्तार शिक्षणाचा विद्यापीठामध्ये जे विद्यार्थी शिक्षण घेऊ शकत नाही अशा विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकरिता असलेली विद्यापीठाची एक शाखा अशा अर्थ दिलेला आहे. थोडक्यात विस्तार शिक्षण म्हणजे शाळा महाविद्यालयाव्यतिरिक्त दिले जाणारे शिक्षण होय. "A Branch of a University for Students who can not attent the University proper"

शिक्षण Education म्हणजे व्यक्तीने स्वतःच्या वर्तनामध्ये प्रयत्नपूर्वक घडवून आणलेला स्थायी स्वरुपाचा बदल होय. शिक्षणाने किंवा अभ्यासाने ज्ञान संपादन करून सवयीत परिवर्तन घडवून आणण्याची प्रक्रिया म्हणजे शिक्षण. सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिकदृष्ट्या मान्य असलेले बदल जेव्हा इच्छेतून निर्माण होतात तेव्हाच मनुष्याच्या वर्तनात बदल घडून येतात. मानवी वर्तनात घडून

येणारे बदल त्याचे ज्ञान, कौशल्य, विचारसरणी, मुल्ये, विश्वास, जाणीव किंवा आकलनशक्ती इत्यादीमध्ये दिसून येतात. विस्तार कार्यकर्त्यांनी ग्रामीण जनता, शेतकरी, गृहव्यवस्थापक (कुटूंबप्रमुख स्त्रिया), विद्यार्थी यांच्या व्यक्तिमहत्वाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी त्याचे ज्ञान, कौशल्य, विचारसरणी, विश्वास, आकलनशक्ती यामध्ये परिवर्तन घडवून आणावयास पाहिजे. कोणत्याही एका बाबीमधील परिवर्तन म्हणजे शिक्षण नव्हे तर सर्वच बाबीमधील परिवर्तन शिक्षणाने साध्य होत असते.

**विस्तार शिक्षणाची गरज व महत्व** (Need and Importance of Extension Education)

आजच्या परिवर्तनशील युगात विकासाच्या दृष्टीने परंपरावादी ज्ञान व पध्दती कालबाह्य ठरतात. नवीन संशोधित ज्ञान व तंत्राचा अवलंब केल्याशिवाय विकास साध्य होत नाही. भारतासारख्या विकसनशील देशात तरी बहुसंख्य असलेल्या ग्रामीण शेतकरी लोकांचा विकास महत्वाचा ठरतो. ग्रामीण लोकांना वेळोवेळी संशोधन ज्ञानाची माहिती मिळून त्यांनी त्या ज्ञानाचा अंगिकार प्रत्यक्ष कृतीत करणे आवश्यक आहे. तसेच त्याच्या समस्याविषयी अधिक संशोधन करून त्यावर उपाय शोधुन काढण्यासाठी संशोधकांना त्याची माहिती होणे आवश्यक आहे. ग्रामीण लोकांशी संपर्क प्रस्तापित करुन त्यांना नवीन ज्ञान देणे, त्याच्याकडून ते प्रत्यक्ष आचरणात उतरवुन घेणे व त्याच्या समस्या ओळखून त्याप्रमाणे उपायात्मक योजना आखणे इत्यादी गोष्टीसाठी वेळ खर्च करणे संशोधकाला अशक्य आहे. उलटपक्षी, लाखोच्या संख्येने असलेल्या गरीब लोकांना संशोधन केंद्राला भेट देऊन ज्ञान प्राप्त करुन घेणे सूध्दा कठीण आहे. शास्त्रीय संस्थेतील संशोधकांजवळील आधुनिक परतू लोकांना उपयुक्त असलेले ज्ञान लोकांपर्यंत पोहचवून संशोधक व ग्रामीण जनता याच्यामध्ये संपर्क साधण्याकरिता मध्यस्थ (एजन्सी) असणे आवश्यक ठरते. विकास कार्यात अशा प्रकारची मध्यस्थाची भूमिका करणाऱ्या एजन्सीला 'विस्तार' म्हणतात आणि विस्तार कार्य करणाऱ्या व्यक्तींना "विस्तार कर्ता" म्हणतात. विकास कार्याकरिता खालील तीन महत्वाच्याबाबी विस्तार कार्यात अंतर्भूत आहेत.




विकास कार्यातील संशोधन, शिक्षण व विस्तार या तीन महत्वाच्या बाबी एकमेकांशी संबंधित आहेत. विस्तार कार्यकर्ते शास्त्रीय संस्थेमध्ये उपलब्ध झालेले ज्ञान प्रथम आत्मसात करून लोकांमध्ये अशापध्दतीने प्रसारित करतात की, जेणेकरुन ते त्यांचा अंगिकार करतील, त्याचप्रमाणे लोकांच्या समस्या व अडचणी शास्त्रीय संस्थेपर्यंत त्यावर उपाय शोधून काढण्याकरिता पोहचवतील. बहुसंख्य लोक अशिक्षित व अल्पशिक्षित असल्याने त्याच्याकरिता ज्ञानप्रसारासाठी औपचारिक किंवा शालेय पध्दतीचा उपयोग होऊ शकत नाही. तर ज्ञानप्रसाराबरोबरच त्या ज्ञानाचा अंगिकार त्यांनी करावा यासाठी विविध परंतू योग्य विस्तार शिक्षण पध्दतीचाच उपयोग करावा लागतो.

विस्तार शिक्षणाव्दारे लोकांचा सर्वांगीण विकास साधावयाचा असेल तर केवळ विविध विषयाचे ज्ञान विस्तार कार्यकर्त्याला असून चालत नाही, तर त्याचबरोबर ग्रामीण लोकांची सुध्दा संपुर्ण माहिती असावी "To teach John Latin, it is necessary not only to know Latin but also to know John" या इंग्रजी उक्तीप्रमाणे जॉनला शिकविण्याकरिता लॅनिट भाषेचे ज्ञान तर पाहिजेच त्याचबरोबर जॉनची सुध्दा माहिती असणे आवश्यक आहे. तसेच विस्तार कार्यकर्त्याला लोकांना काय शिकवावयाचे आहे याची स्पष्ट कल्पना असणे आवश्यक आहे व त्याच्या दृष्टीने विचार करुन मग ते कसे व कोणत्या पध्दतीने शिकवावयाचे आहे याची माहिती पाहिजे. आपल्या विषयामध्ये तज्ज्ञ असण्याबरोबरच आपले ज्ञान व तंत्र लोकांना प्रभाविपणे पटवून देण्याची क्षमता पाहिजे. याशिवाय लोकांची सामाजिक व आर्थिक

स्थिती, संस्कृती, शैक्षणिक दर्जा, ज्ञानाची पातळी, स्थानिक वातावरण, नेतृत्व, संस्था व संघटना, लोकांच्या अत्यावश्यक गरजा इत्यादीची जाणीव ठेवून व योग्य अशा विस्तार शिक्षण पध्दतीच्या माध्यमातून ज्ञान प्रसार केल्यास अधिक परिणामकारक ठरते. लोकांचे ज्ञान, कौशल्य, विचारसरणी यात विस्तार शिक्षणाने बदल घडवुन आणता येतात. नवीन ज्ञानाबद्दल त्याचे अनुकूल मत तयार करुन त्यांना त्याच्या उणीवांची जाणीव करुन दिल्यास ते नवीन पध्दतीचा अंगीकार करावयास तयार होतात. विस्तार शिक्षणामुळे लोकांचे ज्ञान, कौशल्य, विचारसरणी, आकलनशक्ती यामध्ये बदल होऊन त्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते. याशिवाय त्याच्यातील स्वयंप्रेरणा, स्वप्रयत्न, स्वावलंबन, आत्मनिर्भरता, परस्पर सहकार्य इत्यादी गुणाचा विकास होतो.

## विस्तार शिक्षणाचा अर्थ(Meaning of Extension Education)

सामुदायिक विकास ही आजच्या युगाची अंत्यत आवश्यक गरज आहे आणि ही गरज फक्त विस्तार शिक्षणाव्दारेच सोडविली जाऊ शकते. लोकांचा सर्वांगीण विकास साधावयाचा असेल तर त्या क्षेत्रामध्ये कार्य करणाऱ्या सर्वच व्यक्तींना उदा. शासक, तंत्रज्ञ, विस्तार कार्यकर्ते तसेच ग्रामीण व नागरी लोकांना विस्तार शिक्षणाचा वास्तविक अर्थ माहित असणे आवश्यक आहे.

विस्तार शिक्षण ही एक वैशिष्ट्यपुर्ण पध्दती म्हणून तिचा विकास अमेरिकेमध्ये झालेला आहे. श्री. डग्लस एन्समिंजर याच्या शब्दात "विस्तार हे एक प्रकारचे शिक्षण असून त्याचा उद्देश ज्याच्यासोबत कार्य करावयाचे आहे, अशा लोकांच्या मनोवृत्ती व कृती यामध्ये बदल घडवून आणण्याचा आहे."

श्री. लिगन्स यांच्या मताप्रमाणे "विस्तार शिक्षण ही एक प्रक्रिया असून ज्यामध्ये ग्रामीण लोकांना त्याची घरे, शेती व सामाजिक संस्था याची सुधारणा करुन एकूण जीवनमान कसे सुधारावे यासंबंधी शिक्षण दिले जाते." (Extension Education is a process of teaching rural people how to live better by learning ways that improve their farm, home and community Institution - J.P. Leagans)

श्री. केलसे आणि हरणे यांच्या मताप्रमाणे "विस्तार ही एक शाळेव्यतिरिक्त शिक्षण देण्याची पध्दती असून त्यात प्रौढ व युवक प्रत्यक्ष कृतीव्दारे शिक्षण घेत असतात. ही पध्दती सरकार, अमेरिकेतील लॅड - ग्रॅट कॉलेज व जनता याच्या सहकार्याने चाललेली असुन तिच्याव्दारे लोकांच्या गरजा भागविण्यासाठी सेवा व शिक्षण उपलब्ध केले जाते. विस्तार शिक्षणाचा मूलभूत उद्देश लोकांचा विकास घडवून आणणे हा आहे."

Extension is an out of school system of education in which adults & young people learn by doing, It is a partnership between Government, the Land -Grant. College and the people, which provides services and education, designed to meet the need of the people. Its fundamental objectives is the development of the people - Kelsey L.D. and Harne. C.L.

श्री. कृष्णामाचारी यांच्या मते "ग्रामीण लोकांना त्यांच्या समस्याची जाणीव करून देऊन त्या सोडविण्याकरिता साधने व पध्दती सुचविण्याचे कार्य सतत करणारी एक प्रक्रिया म्हणजे विस्तार शिक्षण होय. यामध्ये ग्रामीणांना, त्यांच्या समस्या निवडून त्या सोडविण्याचे मार्ग सुचविण्याचेच शिक्षण दिले जात नाही तर त्यादृष्टीने त्यांना प्रत्यक्ष कृती करावयास प्रवृत्त केले जाते."

"Extension is a Continuous process designed to make the rural people aware of their problems and of indicating to them to ways and means by which they can solve them. It involves not only education of the rural people in determining their problems and methods of solving them, but also inspiring them towards positive action in doing - Krishnamachari .V.T.

श्री. दहामा यांच्या मते "लोकांच्या राहणीमानात तांत्रिक व शास्त्रीय नवाचाराव्दारे सुधारणा घडवून आणण्यासाठी त्याच्या वर्तमान विभिन्न पध्दतीने अनुकूल परिवर्तन घडवून आणणाऱ्या सामाजिक शास्त्राला विस्तार शिक्षण म्हणता येईल."

"Extension education may be said as a soical science which deals with various strategies of changes in the behaviour pattern of human beings through technolgical & Scientific innovations for the improvement of their standard of living - O.P. Dhama.

डॉ. रेड्डी यांच्या मतानुसार "लोकांचे राहणीमान सुधारण्यास मदत करण्यासाठी त्याचे व्यवसाय, साहसकर्म व संस्था यामध्ये अध्ययनाने विकास घडवून आणून ज्ञाननिर्मिती, संक्रमण व अवलंबन याव्दारे त्यांच्या वर्तनात योजनाबध्द परिवर्तन घडवून आणण्यासाठी उपयोगात येणाऱ्या शास्त्राला विस्तार शिक्षण म्हणतात."

यावरुन एक मात्र दिसून येते की, विस्तार शिक्षण हे एक औपचारिक रीतीने शाळा-महाविद्यालयात दिले जाणारे शिक्षण नसून लोकांना त्यांची शेती, गृहव्यवसाय, सामाजिक संस्था इत्यादींना त्याच्याकडूनच विकास घडवून आणण्यास मदत करणारी व त्याकरिता लोकांचे ज्ञान, मनोवृत्ती व कौशल्यात अनुकूल परिवर्तन घडवुन आणून त्याचे राहणीमान उंचवण्यास मदत करणारी एक शैक्षणिक प्रक्रिया आहे.

अमेरिकेमध्ये विस्तार कार्य शैक्षणिक स्वरुपाचे असून शैक्षणिक संघटना, शैक्षणिक प्रक्रिया आणि शैक्षणिक कार्य असे विविध प्रकारचे आहे. त्याचप्रमाणे भारतात देखील विस्ताराचा उल्लेख कार्य, विस्तार सेवा आणि विस्तार प्रक्रिया असा तीन प्रकारे करता येईल.

विस्तार कार्य **(Extension Job):**

शेती आणि गृह अर्शशास्त्राचे विस्तार कार्य म्हणजे शेती आणि गृहव्यवस्थापनातील स्त्री-पुरुषांना त्याच्या प्रचलित गरजा सोडविण्यास आणि बदलत्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीशी समायोजन साधण्याकरिता त्याच्याजवळील उपलब्ध साधनांचा जास्तीत जास्त उपयोग करण्यास मदत करणे. दुसऱ्या शब्दात विस्तार कार्य म्हणजे लोकांजवळील उपलब्ध साधनसंपत्तीचा उपयोग करुन व त्यांना मार्गदर्शन आणि तांत्रिक मदत व शक्य झाल्यास आर्थिक मदत देऊन विस्ताराचे उद्देश पूर्ण करण्यासाठी त्याच्या आर्थिक, सामाजिक व इतर सर्वच क्षेत्रात प्रगती घडवून आणणे.

विस्तार सेवा **(Extension Services) :**

विस्तार सेवा ही विविध संघटना व संस्थाच्या माध्यमातून ग्रामीण विकास व कल्याणाच्या अनेक कार्यक्रमाव्दारे कार्य करते ज्याकरिता विस्तार प्रक्रिया विस्तार सेवेला विस्ताराचे कार्यक्रम अंमलात आणण्याकरिता मदत करते.

विस्तार प्रक्रिया **(Extension Processes) :**

ग्रामीण लोकांसोबत त्याची आवड व गरजा लक्षात घेऊन ग्रामीण कुटुंबे व समाजाची भौतिक व आर्थिक सुधारणा घडवून आणण्यासाठी अनौपचारिकरीत्या कार्य करण्याची प्रक्रिया म्हणजे विस्तार होय. याकरिता लोकांचा विश्वास संपादन करून त्याचा सतत विकास घडवून आणण्याचा प्रयत्न करावा लागतो.

विस्तार शिक्षणाची आधुनिक कल्पना म्हणजे सामुदायिक विकास साध्य करण्याचे एक साधन म्हणून आहे. ज्यामध्ये ग्रामीण लोकांना सर्वांगीण विकास घडवून आणण्याकरिता सामाजिक, आर्थिक, धार्मिक, नैतिक, सांस्कृतिक, बौध्दिक इत्यादी क्षेत्रात विकास साधण्याकरिता शेती व्यवसाय व गृहव्यवस्थेच्या विकासाला प्राधान्य देण्यात आलेले आहे. यामुळे लोकांचा आर्थिक विकास होईल व त्यासोबतच इतर क्षेत्रातील विकासालाही चालना मिळेल.

**विस्तार शिक्षणाची व्याप्ती** (Scope of Extension Education)

विस्तार शिक्षण हे खऱ्या अर्थाने लोकशिक्षण असून ते वय, जात, धर्म, लिंग भेद विरहित असल्याने त्याचा फायदा सर्वांनाच सारखा होतो. हे शिक्षण मुख्यतः शाळेच्या चार भिंती बाहेरील शिक्षण असून लोकांच्या जीवनाशी निगडीत असलेल्या बाबींशी संबंधित आहे. विस्तार शिक्षणाची व्याप्ती

विस्तृतपणे जाणून घेण्यासाठी विस्तार शिक्षणासंबंधी विचारवंतांनी केलेली काही विधाने पाहणे उचित ठरेल. यावरून या शिक्षणाच्या व्याप्तीची कल्पना येईल.

१. विस्तार हे सर्व ग्रामीण लोकांसाठी असलेले शिक्षण आहे.

२. विस्तार म्हणजे सर्व लोकांच्या मनोवृत्ती, ज्ञान आणि कौशल्य यामध्ये बदल घडवून आणणे.

३. ग्रामीण पुरुष, स्त्रिया, तरुण लोक, मुले आणि मुली यांच्या जीवनातील गरजा भागविण्यासाठी आणि उणीवा दूर करण्यासाठी त्याच्याबरोबर काम करणे म्हणजे विस्तार.

४. लोकांना स्वावलंबी होण्याकरिता मदत करणे म्हणजे विस्तार कार्य.

५.विस्तार कार्य म्हणजे लोकांना कृतीव्दारे शिक्षण देणे आणि प्रत्यक्ष अनुभविलेल्या गोष्टीवरच विश्वास ठेवण्यास शिकविणे.

६. लोकांनी कोणत्या इच्छा - अपेक्षा बाळगाव्यात आणि या इच्छा अपेक्षा पूर्ण करून घेण्यासाठी त्यांनी कोणत्या मार्गाचा अवलंब करावा, हे त्यांना शिकविणे आणि त्याच्या इच्छा पूर्ण करण्याच्या कामी त्यांना उत्तेजन देणे म्हणजेच विस्तार कार्य.

७. विस्तार कार्य याचा अर्थ व्यक्तीच्या दैनंदिन जीवनाचा विकास करणे आणि त्याच्या समाजाचा व एकुण त्याच्या जगाचा विकास करणे हा आहे.

८. जनतेचे कल्याण आणि सुख याची अभिवृध्दी व्हावी म्हणून कुटुंब, खेडे, देश आणि जग या सर्वांनी एकदिलाने काम करणे याचा अर्थ विस्तार कार्य.

९ विस्तार म्हणजे लोकांच्या संस्कृतीशी मेळ राखून काम करणे.

१०. विस्तार हा एक दुहेरी मार्ग आहे. एका मार्गाने शास्त्रीय माहिती ग्रामीण लोकांपर्यंत पोहचविला जाते. त्याचवेळी दुसऱ्या मार्गाने त्याचे प्रश्न व समस्या यावर उपाय शोधून काढण्याकरिता शास्त्रीय संस्थेमध्ये आणले जातात.

११. विस्तार ही सतत चालणारी शैक्षणिक प्रक्रिया आहे. यामध्ये शिकणारा व शिकविणारा दोघेही विचाराची देवाण-घेवाण करतात.

यावरुन विस्तार शिक्षणामध्ये लोकांना ज्ञान देऊन त्याची स्वत:ची कल्पनाशक्ती विकसित करुन, पध्दतशीर व शास्त्रीय रीतीने विचार करून निर्णय घेण्याचे शिक्षण दिले जाते. विस्तार शिक्षणाचे मुख्य कार्यक्षेत्र हे शेतकऱ्याचे शेत आणि घर आहे. या शिक्षणाचा मुलभूत उद्देश चांगली शेती, चांगली घरे आणि सुखी समाज निर्माण करणे हा आहे आणि त्याकरिता लोकांच्या गरजा त्यांच्याच प्रयत्नातून सोडविण्यास मदत करण्याचा आहे. यावरुन विस्तार शिक्षणाची वैशिष्ट्ये शैक्षणिक, सहकारी, अनौपचारीक, लवचिक (स्थळ, काळ, परिस्थितीनुरुप) कुटुंबकेंद्रीत ऐच्छीक आणि बहुव्यापक अशी देता येतील.

**विस्तार शिक्षणाची उदिष्टे** (Objectives of Extension Education)

उदिष्ट्ये म्हणजे हेतू किंवा साद्य विशद करून ते पूर्ण करण्याकरिता प्रयत्न केले जाणे किवा उदिष्ट म्हणजे लोकांत घडवून आणाव्या लागणाऱ्या ज्ञान, भावना व कृती यातील परिवर्तनाचा आराखडा होय. उदिष्ट म्हणजे व्यक्ती, गट किंवा संस्थेने साध्य कराव्या लागणाऱ्या हेतूंची केलेली मांडणी होय, ज्या दिशेने नंतर प्रयत्न केले जातात.

विस्तार शिक्षणाचा मुलभूत उद्देश (Fundamental objectives) लोकांचा सर्वांगीण विकास करणे आणि त्यासाठी त्याच्या वर्तनामध्ये आणि आर्थिक व सामाजिक क्षेत्रामध्ये बदल घडवून आणणे हा आहे. वर्तनामध्ये बदल घडवून आणण्याकरिता त्यांच्या ज्ञानामध्ये (Knowledge) वेगवेगळ्या विषयात आणि सविस्तरपणे, त्यांच्या कौशल्यामध्ये (Skill) कार्यक्षमतेत वाढ करुन नवीन कौशल्ये आत्मसात करणे व त्याची गुणवत्ता वाढविण्यासाठी शारिरिक कौशल्यामध्ये तसेच समस्याची जाणीव होऊन त्यावर उपाय शोधुन काढण्याची क्षमता निर्माण करणे, लोकांच्या अभिवृत्ती आणि

विचारसरणीतील (Attitude) संवेदनशीलता. वैयक्तीक व सामाजिक समायोजन यामध्ये, आकलनशक्तीमधील (Understanding) जीवनविषयक तत्वज्ञानामध्ये आणि आवडीनिवडीमध्ये तत्वज्ञानामध्ये परिवर्तन घडवून आणणे आवश्यक असते. मानवी वर्तनातील वरील प्रकारचे बदल महत्वाचे असून इतर प्रकारचे बदल आर्थिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय हे भौतिक स्वरुपाचे असून या महत्वपुर्ण बदलाचे परिणाम आहेत.

**सामान्य उदिष्ट** (General Objectives) हे मुलभूत उदिष्टापेक्षा जास्त निश्चित केलेले आणि विस्तारसेवेशी प्रत्यक्ष संबंधित असून धोरण किंवा विधानाच्या स्वरुपात आखलेले असतात. विस्तार शिक्षणाचे सामान्य उद्देश म्हणजे लोकांना ज्ञान संपादन करण्यास, त्याचे प्रश्न किंवा समस्या निश्चीत करण्यास, त्या सोडविण्याकरिता आवश्यक कृती करण्यास शिकविणे हे आहेत. **सामान्य उदिष्ट्ये खालील प्रमाणे देता येतील**.

१. लोकांना त्याच्या अतिआवश्यक व आवश्यक समस्या शोधुन काढण्यास व त्याचे विश्लेषण करण्यास शिकविणे.

२. लोकांमध्ये नेतृत्वाचा विकास घडवून आणून त्याचे प्रश्न सोडविण्याकरिता गट किंवा संघटना निर्माण करण्यास मदत करणे.

३. शास्त्रीय संशोधन किंवा कृतीपुर्ण अनुभव यावर आधारित ज्ञान अशा रीतीने प्रसारित करणे की, ज्यामुळे त्या ज्ञानाचे उपयोजन होऊन प्रत्यक्ष कृतीमध्ये ते आणले जाईल.

४. लोकांच्या विविध समस्यांविषयी संशोधनकर्त्यांना परिचित करुन उपाय प्रसारित करणे.

प्रत्यक्ष कार्य करण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेले उदिष्ट म्हणजे कार्य उदिष्ट (Working Objectives) होय. या उदिष्टाप्रमाणेच कार्य केले जाऊन सामान्य उदिष्ट व त्यानंतर मुलभूत उदिष्ट साध्य होत असतात. या उदिष्टानुसार कार्य होत असल्याने ते अधिक निश्चित स्वरुपाचे व म्हणून महत्वाचे ठरतात. विस्तार शिक्षणाची अशी उदिष्टे खालील प्रमाणे आहेत.

१. ग्रामीण समाजाच्या दृष्टिकोनात बदल घडवून आणणे हे विस्तार शिक्षणाचे महत्वाचे उदिष्ट आहे. यासाठी ग्रामीण लोकांना स्वतःच्या गरजा व समस्या ओळखण्याचे शिक्षण देऊन त्या सोडविण्यासाठी त्यांना प्रवृत्त करणे आवश्यक आहे.

२. ग्रामीण भागात जबाबदारी, नेतृत्व, संघटना व संस्था निर्माण करून त्याचा विकास करणे, विस्तार कार्यक्रम सुस्थिर, स्वावलंबी आणि परिणामकारक रित्या यशस्वी करावयाचा असेल तर कार्यक्रम आखणारे व अमलात आणणारे नेतृत्व खेड्यातीलच पाहिजे.

३. भारतातील जनता ही आपल्या देशाजवळ असलेली सर्वात मोठी साधनसंपत्ती होय. यासाठी स्वावलंबी, प्रतिसादक्षम व जबाबदार नागरिक बनविणे आणि राष्ट्रउभारणीच्या कार्यामध्ये कार्यक्षम आणि जाणीरपूर्वक भाग घेण्याची योग्यता व इच्छा त्याच्यात निर्माण करणे.

४. खेड्यातील लोकांमध्ये अन्न, वस्त्र, शिक्षण, आरोग्य, निवारा, रस्ते, मनोरंजन इत्यादी बाबतीत अपेक्षा वाढू लागल्या की त्याचे राहणीमान वाढविण्याकरिता मदत केली पाहिजे. यासाठी लोकांना शास्त्रीय पध्दतीच्या अवलंबनाने शेती उत्पादन वाढविण्यास मदत करणे, त्याच बरोबर हस्तोद्योग व उद्योग विकास करणे आणि नवीन उद्योगधंद्याच्या स्थापनेला चालना देऊन जास्तीत जास्त रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे.

५. देशातील लोकशाहीचा विकास करण्याची जबाबदारी समर्थपणे पार पाडण्याकरिता व देशाला उज्वल करण्याकरिता ग्रामीण युवकांच्या पुढे असे कार्यक्रम ठेवणे की जेणेकरुन त्यांना जबाबदार, कार्यक्षम आणि कर्तव्यनिष्ठ नागरिक बनविण्याचे प्रशिक्षण मिळेल.

६. ग्रामीण जनतेमध्ये त्याचे जीवनमान सुधारण्याची इच्छा निर्माण करुन वाढत्या उत्पन्नाचा योग्य विनियोग करण्यासाठी ग्रामीण स्त्रिया व ग्रामीण कुटूंबे यांना सुसंघटित करणे. प्रत्येक कुटुंबाचा विकास म्हणजेच पर्यायाने खेड्याचा व देशाचा विकास होय.

७. ग्रामीण विकास कार्यात ग्रामीण शाळा व ग्रामीण शिक्षण याचे महत्व ओळखून व शिक्षकांना सामाजिक प्रतिष्ठा देऊन विस्तार कार्यात सफलता मिळविण्याच्या दृष्टिकोनातून त्याचे योगदान प्राप्त करणे,

८. बाल व प्रौढ यांच्यासाठी शिक्षण, करमणूक, आरोग्यसेवा आणि इतर आवश्यक त्या सोयी उपलब्ध करुन देणे. आजार व सांसर्गिक रोग यामुळे अवेळी होणारी प्राणहानी टाळण्याकरिता लोकांना आरोग्यविषयक शिक्षण देणे. शुध्द पाण्याचा पुरवठा गावातील सांडपाण्याची व्यवस्था, आरोग्यदृष्ट्या अनुकूल घरबांधणी स्वच्छतेच्या सवयी लावणे आवश्यक आहे.

**विस्तार शिक्षणाचे तत्वज्ञान (Philosophy of Extension Education)**

तत्वज्ञान म्हणजे ज्ञान किंवा कार्याच्या क्षेत्रातील सर्वसाधारणपणे तत्वे किंवा नियमाचा आधार होय. विशिष्ट विषयाचे तत्वज्ञान त्या विषयातील कार्याची रुपरेषा किंवा तत्वे सूचित करीत असते. यामुळेच विस्तार क्षेत्रात कार्य करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांना विस्तार कार्याचे ध्येयधोरण व कार्यक्रम अमलात आणण्याच्या दृष्टीने विस्तार शिक्षणाचे तत्वज्ञान माहित असणे आवश्यक ठरते.

ग्रामीण जनता अशिक्षित असली तरी त्यांची बौध्दिक पातळी समाधानकारक असून त्यांच्यामध्ये नवीन माहिती मिळविण्याची क्षमता व इच्छा आहे आणि त्याचबरोबर या माहितीचा उपयोग त्याचे स्वतःचे आणि समाजाचे कल्याण करण्याकरिता त्याची तयारी आहे. या गृहीत तत्वावर विस्तार शिक्षणाचे तत्वज्ञान आधारित आहे. याकरिता लोकांपर्यंत नवीन ज्ञान व कल्पना पोहचविण्याची गरज आहे आणि त्यासाठी विस्तार कार्यकर्ते आणि जनता याच्यामध्ये मैत्रीचे आणि विश्वासाचे संबंध निर्माण व्हावयास पाहिजे. लोकांच्या सर्वांगीण विकासाकरिता त्याच्यामध्ये विस्तार शिक्षणाने जागृती निर्माण करता येऊ शकते. ग्रामीण जनतेजवळ असलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीची त्यांना जाणीव करून देऊन त्याचा उपयोग प्रगतीसाठी कसा करता येईल त्याचे ज्ञान त्यांना देता येते. विस्तार शिक्षणाचे तत्वज्ञान वैयक्तीक जीवनातील समाधानाशी निगडीत आहे. उपलब्ध साधनांचा व आधुनिक तंत्राचा उपयोग विकासाकरिता करुन घेण्यासाठी विस्तार शिक्षण हा एकमेव पर्याय आहे. विस्ताराचे तत्वज्ञान अधिक स्पष्ट होण्याकरिता खालील मुद्दे अधिक उपयुक्त ठरतात.

१. विस्तार शिक्षणाचे स्वरुप आणि पध्दती दोन्हीही लोकशाही तत्वावर आधारित आहे कारण विस्तार कार्यक्रमाची रूपरेषा किंवा योजना लोकांकडूनच आणि लोकांकरिताच आखली जाते आणि ती योजना किंवा कार्य लोकांच्या आवश्यक गरजावरच आधारित असते. तसेच या योजना अंमलात आणतांनाही लोकांचा सहभाग महत्वाचा असतो. विस्तार कार्य लोकांच्या विकासाकरिता असले तरी ते सहभागी झाल्याशिवाय यशस्वी होऊ शकणार नाही.

२. विस्तार कार्य ग्रामीण व्यक्ती आणि त्याचे कुटूंब याच्यावर केंद्रित झालेले आहे. विस्तार कार्याची सुरुवात तीन तत्वांना अनुसरून करावी : अ) लोकशाही व्यक्तीप्रधान आहे. ब) विकासाचा मुळ घटक गृह **(Family)** आहे आणि क) कुटूंब हा प्राथमिक प्रशिक्षित गट आहे. या तीन तत्वांना अनुसरुन विस्तार कार्याची सुरुवात प्रत्येक व्यक्ती व कुटंबापासुन केल्यास त्याच्या विकासाबरोबरच आपोआप खेड्याचा व देशाचा विकास होतो.

3. विस्तार शिक्षणाव्दारे सर्वांना आधुनिक ज्ञान व तंत्राचे शिक्षण दिले जाते. सर्व लोकांना उपयुक्त आणि कृतीपूर्ण माहिती पट, वंश, जात, धर्म, गरीब - श्रीमंत असा भेदभाव न करता दिली जाते. तसेच विस्ताराचे कार्यक्रम सामुहिक निर्णय घेऊन निश्चीत केलेल्या गरजा सोडविण्यासाठी घेतले जातात. त्यामुळे त्यात सर्व प्रकारचे लोक सहभागी होतात.

४. विस्तार शिक्षणाचे महत्वाचे दोन घटक म्हणजे सामुदायिक कार्यात स्वेच्छेने सहभागी होणे आणि नेतृत्वाचा किास करणे हे आहेत. ज्या लोकांचा ग्रामीण जनता व त्याची कार्यक्षमता तसेच लोककल्याण यावर विश्वास आहे. अशा लोकांतील नेतृत्व गुणाचा विकास करुन विस्तार कार्यासाठी उपयुक्त नेते निर्माण केले जाऊ शकतात.

५. विस्ताराचा कार्यक्रम सरकारचा नसून लोकांचा आहे. अशी भावना लोकामध्ये जोपर्यंत निर्माण होत नाही तोपर्यंत विस्तार कार्याचे अनुकूल परिणाम मिळणार नाही.

६. विस्तार शिक्षणाचा आदेश किंवा हुकुम देण्यावर विश्वास नाही तर लोकांना शिक्षणाव्दारे ज्ञान देऊन त्याच्यात गोडीगुलाबीने बदल घडवून आणण्यावर आहे. ज्या लोकांसोबत कार्य करावयाचे आहे त्याची मुल्ये, संस्कृती, रीतीरिवाज इत्यादी लक्षात घेऊन त्यात योग्य ते बदल घडवून आणण्याकरिता त्याला अनुसरुनच कार्यक्रम घ्यावेत.

७. विस्तार कार्यामध्ये लोकप्रतिनिधी, संस्था, संघटना इत्यादीच्या माध्यमातून कार्यक्रम यशस्वी करण्याची जबाबदारी लोकांवरच असते. त्यामुळे लोकांना आपल्या विकासाची जबाबदारी आपल्यावरच आहे याचे आकलन होत असल्याने कार्यक्रम यशस्वी होतात.

८. विकास कार्याव्दारे कृती वा पध्दतीमध्ये बदल घडवून आणण्यापेक्षा प्रत्येक व्यक्तीमध्ये परिवर्तन घडवून आणणे महत्वाचे आहे. लोकांच्या विचारसरणीत, ज्ञानात, कौशल्यात कार्यक्षमतेत बदल घडवून आणणे म्हणजेच व्यक्तीच्या वर्तन परिवर्तनास महत्व देणे अगत्याचे आहे. त्याचा सर्वांगीण विकास साधण्याकरिता त्याच्यात उच्च प्रतीचे वैयक्तीक गुण निर्माण करणे आवश्यक आहे.

९. ग्रामीण जनता ऐकलेल्या गोष्टीपेक्षा प्रत्यक्ष पाहिलेल्या आणि कृतीव्दारे अनुभविलेल्या गोष्टीवर जास्त विश्वास ठेवतात.

### विस्तार शिक्षणाचे तत्वे (Principles of Extension Education)

भारतातील विस्तार कार्याचा उद्‌देश लोकांना त्यांच्या कार्यात मदत करुन त्याच्याकडूनच त्याची भौतिक, बौध्दिक आणि मानसिक प्रगती घडवून आणणे हा आहे. लोकांच्या राहणीमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी शिक्षण व प्रशिक्षणाच्या माध्यमातून त्याच्या गरजा सोडविण्याची जाणीव त्यांना करुन देणे व त्या सोडविण्यासाठी त्यांना मदत करणे आवश्यक आहे. विस्ताराचे मुलभूत व इतर उद्‌देश साध्य करण्याकरिता घ्यावे लागणारे विस्तार कार्यक्रम काही निश्चीत तत्वावर आधारित असावे लागतात. ती तत्वे पुढीलप्रमाणे आहेत.

१) स्थानिक परिस्थिती : विस्तार कार्य हे प्रत्येक ठिकाणच्या स्थानिक परिस्थितीवर आधारित असते. भारतासारख्या विस्तृत देशात निरनिराळ्या भूप्रदेशातील भौतिक परिस्थिती वेगवेगळी आहे. तेव्हा तेथील प्रचलित स्थानिक परिस्थितीचा अभ्यास करून विस्तार कार्यक्रमाची रूपरेषा ठरविणे आवश्यक असते.

२) संस्कृती : विस्ताराचे कार्यक्रम व पध्दती सामाजिक वातावरण व संस्कृतीशी निगडीत असावेत, भारतामध्ये विविध प्रदेशातील लोकांची संस्कृती व आचार विचार यात बरीच विविधता आढळते. विस्ताराचा कार्यक्रम लोकांच्या संस्कृतीच्या अगदी विरोधात असेल तर अशा कार्यक्रमाविषयी लोकांमध्ये आकस निर्माण होऊन ते सहकार्य देत नाहीत यासाठी विस्तार कार्यकर्त्याने स्थानिक संस्कृतीचा अभ्यास करुन त्यानुसार विस्तार कार्यक्रम व अनुकुल अशा शैक्षणिक पध्दतीचा वापर करावयास पाहिजे तसेच आवश्यक ते फेरबदल विस्तार कार्यात किंवा पध्दतीत करणे इष्ट ठरते.

३) आवश्यक गरजा : विस्तार कार्यक्रम लोकांच्या अति आवश्यक गरजावर आधारित असावयास पाहिजे. लोकांच्या इच्छया व तातडीच्या गरजा लक्षात घेऊन कार्यक्रमाची आखणी करावी. त्यामुळे लोकामध्ये विस्तार कार्याविषयी अधिक आवड, विश्वास व उत्साह निर्माण होऊन सहकार्य मिळते.

४) लोकांचा स्तर व दर्जा : समाजात विभिन्न दर्जाचे व स्तरातील लोक आढळून येतात. विस्ताराचा कार्यक्रम लोकांचा सामाजिक, मानसिक, तांत्रिक, ज्ञान, शैक्षणिक पात्रता व ज्ञानाची पातळी, आकलन शक्ती इत्यादीचा स्तर लक्षात घेऊन आखावयास पाहिजे. एकापेक्षा जास्त विस्तार पध्दतीचा योग्य वापर लोकांच्या ज्ञानापातळीनुसार केला तर विस्तार कार्य अधिक परिणामकारक होते.

५) लोकशाही पध्दती : भारतामध्ये लोकशाही पध्दती अस्तीत्वात असल्यामुळे सर्वांना आपले मत मांडण्याचा अधिकार आहे परंतु विकास कार्यक्रम लोकशाही पध्दतीवर आधारित असायला पाहिजे अर्थात विकास कार्यकर्त्यांनी आपल्या परीने माहिती देण्याचे कार्य करावे परंतू ती माहिती अवलंबावी की नाही याचा संपुर्ण अधिकार जनतेवर सोपवावा.

६) लोकांचे सहकार्य : विस्तार कार्यात ग्रामीण जनता व विस्तार कार्यकर्ते यांनी एकत्र येऊन एकमेकांच्या सहकार्याने समाजाच्या उन्नतीकरिता प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. यामुळे लोकांत आत्मविश्वासाची जाणीव निर्माण होऊन त्यांना स्वावलंबी व कार्यक्षम बनविता येते. विस्तार कार्याला सरकारी कार्यक्रमाचे स्वरूप येऊ न देता जनतेच्या कार्यक्रमाचे स्वरुप प्राप्त करून देणे यावर कार्यक्रमाचे अर्धे यश अवलंबुन असते.

७) समानता : विस्तार कार्यक्रम कोणत्याही विशिष्ट जाती धर्माकरिता नसावा तो संपुर्ण खेड्यातील/गावातील एक समान कार्यक्रम आयोजित करावा. परंतु काही विशिष्ट परिस्थितीत आदिवासी, मागासलेल्या जाती जमाती युवक संघटना याकरिता विशिष्ट कार्यक्रम आखावयास हरकत नाही.

८) स्थानिक नेतृत्व : विस्ताराचे कार्यक्रम स्थानिक नेत्यामार्फत व त्याच्या सहकार्याने अमलात आणल्यास लोकांचे सहकार्य जास्त प्रमाणात मिळते कारण लोकांचा त्याच्या नेत्यावर विश्वास असतो.

९) कुटूंब विकास : कुटूंब हा एक महत्वाचा सामाजिक घटक आहे. कौटूंबिक विकास म्हणजेच कुटुंबातील सर्व व्यक्तीचा विकास, विस्तार कार्याची सुरुवात प्रथम कुटूंबापासून करावयास पाहिजे. एकदा जर प्रत्येक कुटूंबाचा विकास झाला तर समुदायाचा व पर्यायाने देशाचा विकास होण्यास वेळ लागणार नाही.

१०) सहभागित्व : विस्तार शिक्षण कार्यक्रमात जनतेचे अधिक सहभागित्व मिळण्याला अतिशय महत्व आहे. स्थानिक कार्याची योजना आखतांना व त्याची अमलबजावणी करतांना लोकांना सहभागी करून घेतल्यास त्यांच्यामध्ये जबाबदारी व आत्मविश्वासाची भावना निर्माण होते व ते अधिक उत्स्फूर्तपणे कार्यात सहभागी होतात.

११) विकास किंवा बदल : विस्तारकार्य करीत असतांना समाजात बदल घडून येत असतात. काळाबरोबर परिस्थिती बदलत असते. मानवी वर्तन, संस्कृती, परिस्थिती यामध्ये बदल होत असतात. यासाठी विस्ताराचा कार्यक्रम लवचिक असावा. त्यामुळे तो बदलत्या गरजा, प्रवृत्ती व परिस्थितीशी नीट समायोजन साधू शकेल. लोकशाही पध्दतीत बदलत्या परिस्थितीशी मिळता-जुळता असणारा कार्यक्रमच यशस्वी होऊ शकतो. म्हणुन तो वेळेवर बदल करता येण्याजोगा असावा.

१२) स्थानिक संस्था व संघटना : विस्तार कार्यकर्ता एकाकीपणे विकासाचे कार्य परिणामकारकरित्या करु शकत नाही. विस्तार कार्यामध्ये जास्तीत जास्त लोकांशी संपर्क साधण्यासाठी व योजना तयार करून अंमलात आणण्यासाठी व संघटनाचा उपयोग करणे अधिक फायद्याचे ठरते. या संस्था व संघटनाचे सहकार्य मिळवून त्याच्याकडेच विस्तार कार्याची जबाबदारी सोपविल्यास त्या अधिक प्रभावीपणे कार्य करतात. विस्तार कार्यक्रमात विशेषज्ञ आणि प्रशिक्षीत विस्तार कार्यकर्त्यांचे मार्गदर्शन व पाठिबाही आवश्यक असते.

१३) विस्तार कार्याची सुरुवात : विस्तार कार्याची सुरुवात लोकांची सोपी, सरळ, साधी परंतु तितकीच महत्वाची आणि आवश्यक समस्या सोडविण्यापासून करावी. त्यामुळे लोकांच्या मनात आत्मविश्वास आणि विस्तार कार्याविषयी अनुकूल दृष्टीकोन निर्माण होतो. याचा उपयोग लोकाचे विस्तार कार्यात अधिकाधिक सहकार्य मिळविण्याकरिता होतो आणि नंतर पुढे अधिक बिकट समस्या सोडविण्याकरिता लोकांमध्ये उत्साह निर्माण होऊन ते अधिक प्रयत्नशील होतात.

१४) विस्तार कार्यकर्ता - एक आदर्श शिक्षक : विस्तार कार्यकर्ता लोकविकासाकरिता जबाबदार असतो. विस्तार कार्यकर्ता एक शिक्षक या नात्याने त्याचे कार्य विस्तार कार्यक्रमाचे आयोजन, नियंत्रण करण्याचे व लोकांना उचित पध्दतीने शिक्षण देण्याचे आहे. लोकांमध्ये नवाचारविषयी विश्वास निर्माण करण्यासाठी प्रात्यक्षिकाचा उपयोग होतो.

१५) समाधान : कोणत्याहीलोकोपयोगी कार्याचा शेवट लोकांना प्राप्त होणाऱ्या समाधानाने व्हावयास पाहिज. विस्तार कार्यक्रमापासून मिळणारा लाभ सर्वांना मिळणारा असावा. विस्तार कार्यात स्वेच्छेने भाग घेणाऱ्या लोकाना पैशापेक्षा त्यांनी केलेल्या कार्याची प्रशंसा झाली तर त्यांना जास्त समाधान मिळते व ते अधिक जोमाने पुढील कार्य करण्यास सिध्द होतात.

१६) मूल्यमापन : विस्तार कार्यक्रमाचा एक आवश्यक भाग म्हणजे कार्याचे मूल्यमापन करणे हा आहे. विस्तार कार्य सुरु असतांना व पूर्ण झाल्यानंतर मुल्यमापन करणे आवश्यक आहे. याचा उपयोग विस्तार कार्याचा योग्य परिणाम साधला जातो किंवा नाही हे जाणून घेण्याकरिता होतो. योग्य परिणाम जर साधले जात नसतील तर मुल्यांकनामुळे वेळीच कार्यक्रमात योग्य बदल घडवून आणणे शक्य होते.

विस्तार शिक्षण कार्यक्रमाची दिलेली तत्वे सर्वच ठिकाणी सारख्या प्रमाणात लागू होतीलच अशी ग्वाही देता येत नाही. कारण प्रत्येक ठिकाणची भौतिक परिस्थिती, शिक्षणाचे प्रमाण, संस्कृती, मागासलेपणा इद्यादी भिन्न असल्यामुळे या तत्वामुळे कमी अधिक प्रमाणात बदल करून त्याचा योग्य रितीने वापर केल्यास विस्तार कार्य यशस्वी होऊ शकते.

**विस्तार शिक्षण आणि औपचारिक शिक्षण**

औपचारिक शिक्षण (Formal Education) आणि अनौपचारिक शिक्षण (Informal Education) असेही वर्गीकरण करता येईल. औपचारिक शिक्षण म्हणजे शाळा व महाविद्यालयात दिले जाणारे विविध विषयांचे शिक्षण आणि अनौपचारिक शिक्षण म्हणजे विस्तार शिक्षण जे प्रौढ शिक्षण असून शाळा व महविद्यालयाव्यतिरिक्त दिले जाणारे शिक्षण आहे. जेव्हा विस्तार शिक्षणाव्दारे शेतकऱ्यांना आधुनिक तंत्र व पध्दतीचा अवलंब करुन शेतीतील उत्पादन वाढविण्याचे शिक्षण दिले जाते तेव्हा त्याला कृषि विस्तार शिक्षण' म्हणतात.

विस्तार शिक्षण (अनौपचारिक शिक्षण) व औपचारिक शिक्षण यामध्ये काही मुलभूत फरक आहे. या दोन प्रकारच्या शिक्षणात पुढील प्रमाणे फरक आढळून येतो.

| औपचारिक शिक्षण | विस्तार शिक्षण/अनौपचारिक शिक्षण |
|---|---|
| १. शाळा महाविद्यालयातील शिक्षण भविष्याभिमुख असून भावी जीवनाची तयारी करण्यासाठी एखादा व्यवसाय, उद्योग, नोकरी यासाठी आवश्यक असलेली पात्रता संपादन करण्यासाठी दिले जाते. यात शिक्षण व प्रत्यक्ष जीवन वेगळे असते. | १. विस्तार शिक्षण हे जीवनान्तर्गत शिक्षण असून प्रौढ व तरुणांना वर्तमानकालीन जीवनाची पूर्ती करण्यासाठी प्रत्यक्ष जीवन परिस्थितीतून दिले जाते. यामध्ये शिक्षण आधी व जीवन नंतर असा प्रकार नसतो. |
| २. औपचारिक शिक्षणामध्ये विद्यार्थ्याची उपस्थिती आवश्यक असुन ती सक्तीची असते. | २. विस्तार शिक्षणामध्ये लोकांना त्याच्या गरजा सोडविण्याकरिता आकर्षित केले जात असल्याने त्याची उपस्थितीवर कोणत्याही प्रकारची सक्ती नसते. शिक्षणातील सहभागीत्व पुर्णपणे ऐच्छीक असते. |
| ३. औपचारिक शिक्षणामध्ये विद्यार्थ्याचे वय, अनुभव, शैक्षणिक पात्रता इत्यादीमध्ये बरीच साम्यता आढळून येते. | ३. विस्तार शिक्षणामध्ये वय, शैक्षणिक पात्रता, अनुभव, राहणीमान इत्यादी मध्ये भिन्नता आढळून येते. |
| ४. औपचारिक शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांना | ४. अनौपचारिक शिक्षणात शिक्षण घेणाऱ्या |

| | |
|---|---|
| पूर्वानुभव नसल्याने मिळालेले शिक्षण नावीण्यपूर्ण वाटते | विद्यार्थ्याच्या पूर्वानुभवामुळे काही पूर्वग्रह व कल्पना निश्चित झालेल्या असल्याने त्यापैकी अनावश्यक व निरुपयोगी कल्पना खोडून काढून उपयक्त कल्पना रुजविण्याचे कार्य करावे लागते. |
| ५.औपचारिक शिक्षणामध्ये शिक्षण मंडळ/ विद्यापीठाने निश्चित करून दिलेला अभ्यासक्रम पूर्ण करावा लागतो. अभ्यासक्रमात कोणताही बदल करता येणे शक्य नसते. | ५. विस्तार शिक्षणात अभ्यासक्रम लवचिक असतो. त्यात विद्यार्थ्यांच्या गरजा, आवडीनिवडी, इच्छा यानुसार बदल करावा लागतो. |
| ६. औपचारिक शिक्षण पध्दतीत नियमानुसार अभ्यासक्रम, वेळापत्रक, पाठ्यपुस्तके निश्चीत केलेले वर्ग असून त्याच्या शिक्षणाचे मुल्यमापन करण्यासाठी सत्राच्या शेवटी परीक्षा होतात. | ६. विस्तार शिक्षणामध्ये स्थळ, वर्ग, वेळ, विषय, पुस्तके निश्चित केलेले नसतात. हे शिक्षण प्रत्यक्ष जीवन परिस्थितीशी संबंधित असून ते त्याच परिस्थितीमध्ये दिले जात असते. |
| ७. औपचारिक शिक्षणाचा अभ्यासक्रम निश्चित ठरलेला असल्याने त्यासाठी आवश्यक ते सर्व विषय विद्यार्थ्यांना शिकावे लागतात. | ७. विस्तार शिक्षणात ठराविक अभ्यासक्रम नसल्याने लोकांना त्याच्या समस्या शोधुन काढणे व त्यासोडविण्याचे प्रयत्न केले जातात. |
| ८. औपचारिक शिक्षणात शिक्षणाव्यतिरिक्त इतर जीवनावश्यक बाबीचे ज्ञान मिळत नाही. | ८. विस्तार शिक्षणाचे स्वरुप हे शैक्षणिक व सेवा कार्याचेही असते. |
| ९. औपचारिक शिक्षण अनुमान किंवा सिध्दांतावर आधिरित असते. | ९. विस्तार शिक्षण सिध्दांताबरोबरच प्रत्यक्ष अनुभव आणि कृतीवर आधारित असते. |
| १०. शालेय शिक्षणात विद्यार्थी शिक्षकापेक्षा वयाने आणि अनुभवाने लहान असतात. | १०. विस्तार शिक्षणात शिक्षक बहुदा विद्याद्यापेक्षा वयाने लहान असतात व त्यांचा काही क्षेत्रात अनुभवही कमी असतो. |
| ११. औपचारिक शिक्षणात विद्यार्थी संपुर्ण शिक्षण शिक्षकाकडून प्राप्त करतात. | ११. विस्तार शिक्षणात शिक्षक वयाने व अनुभवाने कमी असल्यामुळे काही गोष्टी त्याला विद्यार्थ्यांकडून देखील शिकाव्या लागतात. |
| १२. औपचारिक शिक्षणात अभ्यासक्रम विशिष्ट क्रमानुसार असुन खालच्या पातळीपासून वरच्या पातळीपर्यंत एकमेकाशी संबंधित व आधारित असतो. | १२. विस्तार शिक्षणातील अभ्यासक्रम विशिष्ट क्रमानुसार आखलेला नसतो. शिक्षणार्थीच्या पूर्वानुभवाशी व ज्ञानाच्या पातळीप्रमाणे बदलता असतो. त्यामुळे त्याची पातळी/ स्तर ठरलेले नसतात. |
| १३. औपचारिक शिक्षणात फक्त शिक्षकच विद्यार्थ्यांना शिकविण्याचे कार्य करतात. | १३. विस्तार शिक्षणात विस्तार शिक्षक स्वतः बरोबर स्थानिक नेत्यांचा आणि तज्ज्ञांचाही उपयोग शिक्षणार्थिंना शिकविण्यासाठी करतात. |

**विस्तार शिक्षणातील महत्वाचे टप्पे** (Major steps in Extension Education)

विस्तार शिक्षणाव्दारे लोकांच्या वर्तनात बदल घडवून आणावयाचा असला तरी विस्तार शिक्षण ही एक प्रक्रिया असल्याने ती सतत सुरु राहते. कोणताही बदल व परिवर्तन एकदम घडून येत नाही. तो टप्प्याटप्याने घडून येत असतो. यासाठी विस्तार कार्यकर्त्याला विस्तार शिक्षणातील महत्वाचे टप्पे व त्या अनुषंगाने उपयोगात आणावयाच्या विस्तार शिक्षण पध्दतीची माहिति असणे आवश्यक आहे. विस्तार शिक्षणात खालील महत्वाचे सहा टप्पे असतात.

६ समाधान प्राप्त होणे Satisfaction

५ कार्यवाही घडून आणणे Action

४ खात्री पटविणे Conviction

३. इच्छा जागृत करणे Desire

२. आवड निर्माण करणे Interest

१. लक्ष वेधून घेणे Attention

१) लक्ष वेधून घेणे (Attention) : दिवसेंदिवस होत असलेल्या संशोधनाव्दारे लोकांना उपयुक्त व आवश्यक असलेली नवीन माहिती प्राप्त होत असते. परंतू या नवीन ज्ञानाची कल्पना सर्व सामान्य लोकांना नसते. नवीन ज्ञान सर्व सामान्य लोकांकरिता असले तरी सहजासहजी व एकदम त्यांना उपलब्ध होत नाही आणि झाले तरी त्यासंबंधी त्याच्याकडून एकदम कार्यवाही केली जात नाही. अशा परिस्थितीमध्ये लोकांचे प्रथम त्यांना आवश्यक असलेल्या आणि नवीन उपलब्ध झालेल्या माहितीकडे लक्ष वेधून घेणे महत्वाचे ठरते. यासाठी अनेक साधनांचा आणि पध्दतीचा उपयोग केला जाऊ शकतो. लोकांचे संबंधित विषयाकडे लक्ष वेधुन घेण्यासाठी भित्तीपत्रक, छायाचित्रे, व्यंगचित्रे, रंगीत चित्रे, रेखाचित्रे, आकृत्या, तक्ते, आलेख, प्रदर्शन, वार्तापत्रे, परिणाम प्रात्यक्षिकास भेटी, आकाशवाणीवरील चर्चा इत्यादी पध्दती उपयुक्त ठरतात. लोकांचे लक्ष वेधून घेतल्याशिवाय विस्तार शिक्षणाची क्रिया सुरुच होत नाही. लोकांचे संबंधित विषयाकडे लक्ष वेधून घेतल्यानंतर त्यांना आपल्या गरजाची जाणीव होते व त्या दृष्टीने प्रयत्न करतात.

२. आवड निर्माण करणे (Interest): नवीन माहितीकडे लोकांचे लक्ष वेधून घेतल्यानंतर ही माहिती त्यांना कशी महत्वपुर्ण आहे हे पटवुन द्यावे लागते. लोकांच्या आवडीनिवडी, गरजा, अपेक्षा इत्यादी लक्षात घेऊन त्याच्यात विशिष्ट माहितीसंबंधी आवड निर्माण करावी लागते. लोकांत त्या विषयासंबंधी आवड निर्माण झाल्याशिवाय त्यांना काही शिकविले जाऊ शकत नाही. आवड निर्माण झाल्यावर मात्र लोक त्याविषयी अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रयत्न करतात. लोकांमध्ये आवड निर्माण करण्यासाठी विस्तार शिक्षण पध्दतीची निवड व उपयोग अशाच रीतीने करावयास पाहिजे की, त्यांना आपल्या गरजा व समस्यांची जाणीव होऊन त्या गरजा विशिष्ट माहितीव्दारे सुटू शकतात असा विश्वास निर्माण झाला पाहिजे. विशिष्ट विषयासंबधी लोकात आवड निर्माण करण्यासाठी गटचर्चा प्रकाशचित्रे, झलकाचित्रे, चित्रपट, सभा, व्याख्याने लिखित साहित्य इत्यादी पध्दतीचा वापर करणे इष्ट ठरते. जेणेकरून त्यांनी विषयाचे महत्व पटेल व त्याच्यात इच्छा निर्माण होईल.

३. इच्छा जागृत करणे (Desire) : लोकांना विषयाचे महत्व पटल्यानंतर ते त्यासंबंधी अधिक माहिती मिळविण्यासाठी उत्सुक होतात. अशावेळी विस्तार कार्यकर्त्याने त्यांना आवश्यक ती माहिती देऊन त्या विषयासंबंधी कल्पना त्यांना स्पष्ट करावी. या माहितीमुळे त्याचे प्रश्न व गरजा कशा रीतीने सुटू शकतील याचा खुलासा करावा. लोकांमध्ये नवीन माहिती बद्दल इच्छा जागृत करण्याकरिता नमुने, प्रतिकृती, छायाचित्रे, प्रयोग व संशोधनाचे निष्कर्ष, परिपत्रके, गटचर्चा इत्यादी पध्दतीचा वापर परिणामकारक ठरतो.

४. खात्री पटविणे (Conviction) : लोकांमध्ये नविन माहितीविषयी इच्छा जागृत होऊन त्यांना त्याविषयी आवश्यक माहिती दिल्यावर त्या पध्दतीच्या उपयुक्ततेबद्दल त्याच्या गरजा सोडविण्याच्या संबंधात खात्री पटवून देणे आवश्यक आहे. लोकांची खात्री पटवुन दिली तरच नवीन माहितीचे अंगीकरण करावे किंवा नाही यासंबंधी ते निर्णय घेतात आणि नवीन माहिती त्याच्या गरजा सोडविण्याकरिता उपयक्त वाटली तरच त्यासंबंधी कृती किंवा कार्यवाही करण्याबाबत अनुकुल निर्णय घेतात. प्रत्यक्ष

पाहणे किंवा कृती करणे याव्दारेच त्याची खात्री पटते. म्हणुन यासाठी विस्तार कार्यकर्त्याने पध्दत प्रात्याक्षिके, परिणाम प्रात्यक्षिके, प्रदर्शन, शैक्षणिक सहली इत्यादी आयोजित करावयात तसेच त्याच्या वैयक्तीक गाठीभेटी घेऊन मार्गदर्शन करावे.

५. कार्यवाही घडवून आणणे (Action) : नवीन माहितीच्या उपयुक्तेबाबत लोकांची खात्री पटल्यावर ती माहिती अमलात आणण्यासाठी पोषक अशी परिस्थिती निर्माण करणे आवश्यक आहे. माहितीची प्रत्यक्ष कार्यवाही करतांना येणाऱ्या संभाव्य अडचणीसंबंधी कल्पनाही लोकांना द्यावयास पाहिजे आणि त्या अडचणी सोडविण्याकरिता आवश्यक ते उपाय आणि व्यवस्था कशी करावी यासंबंधीचे मार्गदर्शनही विस्तार कार्यकर्त्याने करावयास पाहिजे. माहितीच्या उपयुक्ततेबाबत लोकांची खात्री पटुनही त्यासंबंधी कार्यवाही करण्यास संधी किंवा परिस्थिती प्राप्त झाली नाही तर लोकांची कार्यवाही करण्याविषयीची इच्छा हळुहळु नष्ट होत जाते व ते आपल्या प्रचलित पध्दतीचाच उपयोग करणे चालू ठेवतात. कार्यवाही सुलभ होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तू, साधने, साहित्य कोठून व कसे उपलब्ध होईल तसेच कार्यवाही सुरु केल्यानंतर आवश्यक असलेले तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. यासाठी स्मरणपत्रे, वैयक्तिक भेटी, स्थानिक नेत्याचे मार्गदर्शन लिखित साहित्य या पध्दती उपयुक्त ठरतात.

६. समाधान प्राप्त होणे (Satisfaction) : नवीन माहिती कार्यवाहीत आणल्याने लोकांच्या आचारात, विचारात, कौशल्यात, ज्ञानात बदल व त्याचे प्रश्न सोडवून त्यांना समाधान प्राप्त करुन दिले जाते. लोकांनी नवीन माहिती कार्यवाहीत आणल्यानेच विस्तार शिक्षणाचे कार्य पूर्ण होत नाही तर विस्तार कार्यकर्त्याने याबाबतीत लोकांनी किती प्रगती केली, त्यांना काय अडचणी आल्या ते जाणून घेऊन त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी त्याच्याशी नेहमी संपर्क ठेवावा लागतो. इच्छित कार्यवाही यशस्वी ठरली तरच लोकांना त्याबद्दल समाधान प्राप्त होते व पूढील विस्तार कार्यात असे लोक सक्रिय सहकार्य देतात. यासाठी गाठीभेटी, सुचना, प्रसिध्दि, त्याचे अनुभव प्रसारित करणे या पध्दती उपयुक्त ठरतात.

# घटक - ४

## नेतृत्व (Leadership)

नेतृत्व हे व्यक्तिसापेक्ष व परिस्थितिसापेक्ष आहे. विशिष्ट कार्याकरिता विशिष्ट व्यक्तीच योग्य असतात. शेती, गृहविज्ञान, राजकारण व इतर अनेक क्षेत्रांमध्ये पुढाकार घेऊन कार्य करणाऱ्या व्यक्ती निरनिराळ्या असतात. एकच व्यक्ती अनेक क्षेत्रांमध्ये नेतृत्व प्रदान करू शकत नाही तसेच विशिष्ट व्यक्ती विशिष्ट परिस्थितीमध्ये नेतृत्व करू शकते. नेतत्व ही असून नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीची वैशिष्ट्ये व ज्या परिस्थितीत ती व्यक्ती वावरते, त्या सामाजिक परिस्थितीची वैशिष्ट्ये या दोहोंचा संयुक्त विचार करून ही भूमिका पार पाडावी लागते

**नेतृत्वाचा अर्थ :** काही विचारवंतांनी केलेल्या नेतृत्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे

(१) लॅपियर व फ्रान्सवर्थ यांच्या मते, ज्याच्या वर्तनाचा इतरांच्या वर्तनावर परिणाम होतो, परंतु इतरांच्या वर्तनाचा ज्याच्या वर्तनावर परिणाम होत नाही अशा नेत्याचे वर्तन म्हणजे नेतृत्व होय."

(२) श्री हेप्पल यांच्या मतानुसार, "नेतृत्व म्हणजे गट संघटनेच्या रचना व कार्यप्रणालीमध्ये एक किंवा अधिक व्यक्तींची अशी भूमिका व दर्जा की ज्यामुळे गटाच्या गरजा किंवा उद्देश पूर्ण करण्याचे अधिकार एकाला दिले जाऊन गटातील इतर सदस्यांच्या सहाय्याने ते साध्य केले जाऊ शकतात."

(३) हॉपर व गिबसन यांच्या मतानुसार, "नेतृत्व म्हणजे गटामध्येच असलेला असा विशिष्ट प्रकारचा संबंध की ज्या समान कारणांची पूर्तता करण्यासाठी परस्पर प्रोत्साहन देण्याच्या प्रक्रियेमध्ये एक व्यक्ती इतरांना प्रभावित करीत असतो."

**(४)** रॉजर्स व ऑल्मस्टेड यांच्या मतानुसार**,** "ज्या कार्यप्रक्रियेत लोकावर प्रभाव पडून गटाने निश्चित केलेले ध्येय साध्य करण्याकरिता सहकार्य द्यावे म्हणून प्रयत्न केले जातात, तिला नेतृत्व म्हणतात**.**"

वरील व्याख्यांवरून नेत्याच्या अंगी पुढाकार घेण्याचा व समूह सहभागित्वाचा गुणधर्म, निर्णय घेण्याचा अधिकार व त्यासाठी आवश्यक तेवढी सत्ता हे घटक आवश्यक असतात असे दिसून येते. नेता म्हणजे समाजाला विशिष्ट दिशेने नेणारा, मार्गदर्शन करणारा, इतरांवर प्रभाव पडू शकणारा व समाजाला विकसित करण्यासाठी योग्य त्या सूचना व विचार मांडून त्याप्रमाणे कार्य करणारा थोर माणूस होय. अशा व्यक्तीने केलेले वर्तन, त्यामुळे प्राप्त भूमिका व दर्जा, त्यासाठी इतरांशी असलेले संबंध आणि याकरिता घेतलेले कार्यक्रम म्हणजेच नेतृत्व.

समाजाला विधायक अशा कोणत्याही कार्यात, "पुढाकार घेणारा तो पुढारी" म्हणजे नेता. नेतृत्व हे सामाजिक गटाचे आवश्यक कार्य असून अनुयायांकरिता त्याच्यासोबत कार्य करण्यासाठी पुढाकार घेण्याची सामाजिक प्रक्रिया आहे. प्रत्येक व्यक्तीला आपापल्या सामाजिक स्थानाप्रमाणे ही भूमिका पार पाडावी लागते. त्यापैकी काही व्यक्ती मूळच्या अंगभूत गुणांच्या आधारे अथवा प्राप्त परिस्थितीच्या निकडीमुळे ही सामाजिक भूमिका कार्यक्षमपणे पार पाडण्यात यशस्वी होतात.

**नेत्यांचे प्रकार :** अनेक विद्वानांनी नेत्यांचे वर्गीकरण करून निरनिराळे प्रकार दिलेले आहेत. नेत्यांचे विविध वर्ग केले तरी नेते आणि अनुयायी यांच्यात असलेली सामाजिक आंतरक्रिया सारखीच असते.

सर विल्यम मार्टिन कॉनवे झुंडीवर प्रभुत्व गाजविणारा, झुंडीचे विचार किंवा भावना दर्शविणारा आणि झुंडीचा प्रतिनिधी असे तीन प्रकार दिले आहेत.

बोगार्डस या मानसशास्त्रज्ञाने मानसिक नेते, कार्यकारी नेते, सामाजिक नेते, अनियंत्रित सत्साधिकारी, कुटंबप्रमुख आणि लोकशाही नेते असे सहा प्रकार केले आहेत.

क्रच आणि क्रचफिल्ड यांनी औपचारिक नेते व खरे नेते असे दोन प्रकार केलेले आहे.

किंबॉल यंग यांनी दादागिरी करणारा, सुधारक नेता, लोकशाही नेता, शासनाधिकारी, मुत्सद्दी, प्रक्षोभक, सिद्धांतवादी नेता असे नेत्याचे सात प्रकार दिलेले आहेत.

सार्जंट यांनी सुचविलेले आणि नेता व अनुयायी यांच्यातील परस्परसंबंधाला अनुसरून सर्वांना मान्य होईल असे नेत्यांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे देण्यात आलेले आहे :

(१) देवी नेतृत्व (Charismatic): सर्वप्रथम Max Weber या जर्मन समाजशास्त्रज्ञाने ही सज्ञा प्रथम सुचविली. हे नेतृत्व अतिमानवी किंवा दैवी शक्तीवर आधारित असते. एखाद्या धर्माची किंवा पंथाची स्थापना करणाऱ्या किंवा अतिमानवी शक्तीचा संदेश लोकांपर्यंत पोहोचविणाऱ्या किंवा सर्वसामान्य व्यक्तीला अशक्य असणारे महान कार्य करणाऱ्या प्रभावी थोर व्यक्तीची गणना या प्रकारात केली जाते. जसे येशू ख्रिस्त, महमंद पैगंबर, भगवान बुद्ध, श्रीकृष्ण, महात्मा गांधी, हिटलर, लेनिन यांचे दैवी नेतृत्व होय.

(२) दर्शनी नेता (Symbolic Leader): अशा नेत्याला प्रतिष्ठा व मानसन्मान मिळतो परंतु त्याच्या हाती सत्ता किंवा अधिकार मुळीच नसतो. विशिष्ट पदावर असलेल्या व्यक्तीकडे आपोआप नेतृत्व येते. जसे इंग्लंडचा राजा / राणी, काही देशांचे राष्ट्रपती किंवा उपराष्ट्रपती यांचा समावेश या प्रकारात होतो.

(3) संस्थाप्रमुख (Headman): एखाद्या संस्थेचा वंशपरंपरेने होणारा प्रमख या प्रकारात येतो. पिढीजात वतनदारी, वंशपरंपरेने चालत आलेल्या पदव्या, उदा. राजे, सरदार, नवाब किंवा इंग्लंडमधील ड्युक ही पदवी अशी उदाहरणे देता येतील. यांना राष्ट्रीय पातळीवर सत्ता किंवा अधिकार नसतात.

(४) प्रवीण किंवा तज्ज्ञ नेता (Expert) : निरनिराळ्या क्षेत्रात अत्युच्च काम करणारे तज्ज्ञ व अधिकारी व्यक्ती, उदा. न्यूटन, शेक्सपीयर, मादाम क्युरी, रवींद्रनाथ टागोर इत्यादी प्रतिभावान व सर्जनशील व्यक्तींचा या प्रकारात समावेश होतो.

(५) बुद्धिमंत नेता (Intellectual Leader): तज्ज्ञ नेत्यांशी जवळचा संबंध असणारा हा प्रकार आहे. बौद्धिक बळावर व वैचारिक सामर्थ्यावर अद्वितीय काम करणारे या प्रकारात येतात. कित्येकदा अशा नेत्यांची बौद्धिक पातळी इतकी मोठी असते की, त्यांचे विचार सामान्य व्यक्तीला आकलन होत नाही. अब्राहम लिंकन, लेनिन, चाणक्य, रसेल, डार्विन, डॉ. आंबेडकर, महात्मा फुले इत्यादी या प्रकारात येतात.

(६) प्रशासक नेता (Administrative Leader): अधिकार व सत्तेच्या मुख्य पदावर काम करणाऱ्या व्यक्ती म्हणजे प्रशासक नेते होय. उद्दिष्ट गाठण्यासाठी योजना तयार करणे व ती इतरांच्या साहाय्याने अमलात आणण्याचे कसब व व्यवस्थापनाचे कौशल्य या नेत्यामध्ये असाव लागते. उदा. पंतप्रधान, उद्योग केंद्राचा संचालक, संस्थाचालक इत्यादी या प्रकारात येतात.

(७) शासनाधिकारी नेता (Bureacratic Leader): प्रशासकाशी निगडित असलेला आणखी एक नेतृत्व प्रकार म्हणजे शासनाधिकारी नेता होय. शासकीय कार्यक्रम प्रत्यक्ष कृतीमध्ये आणण्यासाठी शासनाधिकाऱ्याची एक श्रेणी निर्माण करण्यात येते. या श्रेणीतील निरनिराळ्या पदांवर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना शासनाधिकारी नेते म्हणतात. हे नेते नियमाना बांधलेले असतात. यांच्या हाती सत्ता व अधिकार असतो. श्रेणीतील स्थानानुसार त्याना आपली  कार्ये करावी लागतात.

(८) प्रक्षोभक किंवा सुधारक नेता (Agitator or Reformer) : कोणत्याही प्रकारचा शासकीय अधिकार नसताना प्रचार व मतपरिवर्तनाच्या तंत्राचा वापर करून समाजामध्ये एखादी तत्त्वप्रणाली रुजविण्याचे कार्य करणारे तसेच सामाजिक, राजकीय व इतर क्षेत्रात क्रांती घडवून आणणारे नेते या गटात समाविष्ट होतात. उदा. लोकमान्य टिळक, महर्षी कर्वे, महात्मा फुले, मार्टिन ल्युथर किंग, गांधीजी, विनोबा भावे इत्यादी नेते या प्रकारात येतात.

(९) सत्तालोलुप नेते (Authoritarian Leader): असे नेते हट्टी स्वभावाचे असून आपलाच अधिकार गाजविण्याचा प्रयत्न करतात. आपल्या हाती सत्ता यावी व आपल्या मर्जीनुसार जनतेने कार्य करावे यासाठी वाटेल ते प्रयत्न करून सत्ता प्राप्त करतात. उदा. नेपोलियन, हिटलर, स्टॅलिन अशी या नेतृत्वाची उदाहरणे देता येतील.

(१०) लोकशाही नेते : या प्रकारचे नेते स्वत:कडे सर्व अधिकार न घेता त्याची विभागणी करतात. जनसामान्याकडून यांची निवड केली जाऊन लोकांकडून व अनुयायाकडून आपल्या धोरणाला पाठींबा मिळेल असे वर्तन ते करतात. सर्वांचा सल्ला विचारात घेतल्याने नेत्याला सर्वोत्कृष्ट सहकार्य मिळते. अशा नेत्याची वृत्ती आपला स्वार्थ साधण्यापेक्षा जनतेचे कल्याण करावे अशी असते. जनतेने दिलेल्या सहकार्यावर त्यांचे यशापयश अवलंबून असल्याने लोकांच्या आशा-आकांक्षा लक्ष्यात घेऊन कार्य करतात. सत्तेतील इतर पक्ष, उपपक्ष व गटाशी विचारविनिमय करून सर्व संमतीने लोकाक्ल्यानाचे कार्य करतात.

११) हुकुमशाही नेते :  अशा नेत्याची सत्ता अधिक केंद्रित झालेली असते. राजकीय धोरण व योजना आखण्याचे कार्य सर्वस्वी एकट्याकडेच असते. सत्तेखाली येणाऱ्या समूहातील प्रत्येक सभासदाचे जीवनभवितव्य हुकुमशहाच्या हातात असते. स्वत:कडेच सर्व सत्ता राहील व कोणीही विरोधक राहणार नाही अशाप्रकारे धोरण आखतो. आपल्या पदाला धोका निर्माण आहे अशी शंका जरी आली तरी परिस्थितीत सत्तेला बळकट करण्यासाठी विविध तंत्रांचा उपयोग करतो. आपल्याशिवाय समूहाचे कल्याण होणार नाही असे लोकांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न करतो. यामुळे अनुयायांना नेत्यावर अवलंबून राहण्याची सवय होते. थोडक्यात, हकुमशाहीमध्ये अनुयायी गुलाम बनतात. त्याच्या ठिकाणी असलेली बौद्धिक व मानसिक गुलामगिरीच शारीरिक गुलामगिरीपेक्षा जास्त शोचनीय असते.

**सामूहिक नेतृत्व** : (Collective Leadership): अलीकडच्या काळात सामूहिक नेतृत्वाची एक नवीन कल्पना विकसित होत असलेली दिसून येते. ज्यावेळेस समाजाचे किंवा राष्ट्राचे नेतृत्व एका नेत्याकडे न येता विशिष्ट समूह किंवा गटाकडे येते व त्या गटातील व्यक्ती इतरांवर प्रभूत्व गाजवितात, त्याला सामूहिक नेतृत्व म्हटले जाते. सामूहिक नेतृत्वामध्ये विशिष्ट गटाच्या हाती सत्ता असल्याने तो गट अनियंत्रित सत्ता राबविण्याची व स्वार्थी बनण्याची शक्यता असते. कारण जबाबदारी आपली नसून गटाची आहे ही वृत्ती प्रत्येकामध्ये निर्माण होते. ज्या समहाकडे नेतृत्व आहे, त्यातील सर्व व्यक्ती उच्च नीतिमत्ता असलेले, नि:स्वार्थी व बुद्धिमान असतील तर सामूहिक नेतृत्व यशस्वी होऊ शकते.

राष्ट्र विकासाच्या दृष्टीने सामुदायिक विकास योजना व राष्ट्रीय विस्तार योजना तसेच इतर विकासात्मक योजना राबविण्याचे कार्य ग्रामीण स्तरावर असलेल्या ग्रामीण नेत्यांना करावे लागते.

कारण या नेत्याचा प्रत्यक्ष व घनिष्ठ संबंध ज्यांच्याकरिता विकास योजना आहे, अशा लोकांशी येतो त्यांच्याच सहकार्याने अमलात आणाव्या लागतात. या दृष्टीने उपयुक्त असलेले नेत्याचे दोन प्रकार देता येतील :

**१) व्यावसायिक नेते** : लोकविकासाच्या योजना ग्राम स्तरावर राबविण्याकरिता शासनातर्फे नियुक्त केलेले अधिकारी व कर्मचारी, उदा. विस्तार अधिकारी, ग्रामसेवक, ग्रामसहायक नेते होय. त्यांनी विशेष प्रकारचे प्रशिक्षण प्राप्त केलेले असते. ग्रामीण विकासाचे धोरण निश्चित करणे, योजना आखणे, योजना राबविणे, उच्च स्तरावरून आलेल्या योजनांची अमलबजावणी करणे, लोकांचे सहकार्य मिळून योजना यशस्वी करणे ही जबाबदारी या नेत्यावर असते. यांची शासनातर्फे नियुक्ती केली असल्याने ते पूर्ण वेळ आपला व्यवसाय समजून कार्य करतात व त्यांना या कामाचा मोबदला (वेतन) मिळते. हे नेते मूळचे त्या खेड्यातील नसल्याने त्यांना कार्यपूर्तीसाठी स्थानिक लोकांचे सहकार्य घ्यावे लागते.

**(२) ऐच्छिक किंवा स्थानिक नेते** : कोणत्याही प्रकारची अभिलाषा न बाळगता ग्राम स्तरावर खऱ्या अर्थाने विकास कार्यात पुढाकार घेणारे असे हे नेते असतात. त्यांनी नेतृत्व प्रशिक्षण किंवा इतर प्रकारचे प्रशिक्षण घेतलेले किंवा न घेतलेले असू शकते. त्यांना विकास कार्याची आवड असल्याने ते आपल्या फुरसदीच्या वेळेत नेतृत्व कार्य करतात. त्यांना कार्याचा कोणत्याही प्रकारे मोबदला किंवा मानधन मिळत नाही. हे नेते स्थानिक संघटनांशी संबंधित असतात. विशिष्ट क्षेत्रातील कार्याची आवड असल्याने व नेतृत्व गुण असल्याने स्वेच्छेने विकास कार्यात पुढाकार घेतात. लोकांना अनुकूलरित्या प्रभावित करून व्यावसायिक नेत्यांना विकास कार्यात लोकांचे सक्रिय सहकार्य मिळवून देतात.

**नेत्यांचे कार्य** : (Work of Leaders): समूहाचे आकारमान, रचना व गतिमानता यानुसार नेत्यांचे कार्य काही प्रमाणात बदलत असते. नेता आपल्या अनुयायांपेक्षा श्रेष्ठ व प्रभावी असतो. नेतृत्व हे वर्चस्व गाजविण्याचे साधन नसून एक जबाबदारीचे पद आहे. नेता कोणत्याही प्रकारचा असो, त्यांच्याकडून काही जबाबदाऱ्या पार पाडल्या जाव्यात अशी समूहातील लोकांची अपेक्षा असते व ती रास्त आहे. नेत्याला खालील प्रकारची विविध कार्ये करावी लागतात.

(१) धोरण ठरविणे : समाजाच्या काही निश्चित गरजा व उद्दिष्टे असतात. ती साध्य करण्याकरिता योग्य धोरण आखण्याची महत्त्वाची जबाबदारी नेत्याची असते. योजनेचे स्वरूप, लागणारा कालावधी, आर्थिक व्यवस्था व इतर बाबींविषयी कार्यक्रमाची सूत्रबद्ध आखणी नेत्यांनी करावयाची असते. कार्यक्रमाच्या आखणीमध्ये वास्तविकता व दूरदर्शीपणा असावा लागतो. समाजाचे कल्याण होईल अशी योजना आखण्याची क्षमता आपल्या नेत्यामध्ये आहे असा विश्वास अनुयायी व लोकांमध्ये निर्माण झाल्यास ते सहकार्य करून योजना यशस्वी करतात.

(२) प्रशासन : धोरण ठरवून कार्यक्रमाचे नियोजन करणे जेवढे महत्त्वाचे तेवढेच त्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे अधिक कौशल्याचे असते. नेत्याच्या चातुर्याचा कस येथे लागतो. नेता हा जसा उत्कृष्ट संघटक असतो तसाच तो कुशल प्रशासकही असावा लागतो. अन्यायाच्या क्षमतेनुसार निवड करून, त्यांच्याकडे कामाची विभागणी करून योग्य ते कार्य सोपवावे. एकंदर कार्यावर देखरेख ठेवून आवश्यकतेनुसार अनुयायांना सल्ला देणे एवढेच कार्य प्रशासनिक दृष्टिकोनातून नेत्यांनी करावयाचे असते.

(3) तज्ज्ञ : नेत्याला संबंधित क्षेत्राचे ज्ञान व तंत्र पूर्णपणे अवगत असल्याशिवाय तो यशस्वी होऊ शकणार नाही. प्रत्येक प्रश्नाविषयीचे उत्तम ज्ञान नेत्याला असण्याची अपेक्षा करणे योग्य नाही. कारण नेता हा सर्वज्ञ नसतो, त्याला काही मर्यादा असतात. अशावेळी नेत्याने संबंधित विषयाचे ज्ञान असणाऱ्या विद्वानांचा सल्ला घेणे योग्य असते. नेता जर व्यासंगी असेल तर अभ्यासाने तो आपल्या ज्ञानाच्या कक्षा वाढवू शकतो. अशा अभ्यासू नेत्याचा समूहाला अधिक उपयोग होतो.

४) प्रवक्ता किंवा प्रतिनिधी : नेता आपल्या समूहाचा किंवा गटाचा प्रवक्ता असतो. समाजातील अनेक प्रकारच्या गटात परस्परसंबंध असतात. दोन गटातील परस्परसंबंध वाढीला लागून एकोपा निर्माण करण्यासाठी किंवा सामूहिक गरजा सोडविण्यासाठी दसऱ्या गटाशी विचारविनिमय करणे आवश्यक असल्यास नेताच नेहमी पुढाकार घेतो. संबंधित गटाचा प्रतिनिधी म्हणून नेता आपले विचार मांडतो,

विचारविनिमय करतो, आपल्या गटाच्या हक्कांचे जतन करतो दुसऱ्या गटाशी झालेल्या चर्चेचा वृत्तांत आपल्या अनुयायांना सांगतो.

क) समूह नियंत्रण : नेत्याला समूहावर प्रभाव कायम ठेवण्यासाठी नियंत्रकाचे कार्य करावे लागते. विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन व्यक्ती गटात समाविष्ट होत असला तरी प्रसंगी त्यांच्यात मतभेद निर्माण होऊ शकतात. नेत्याला आपल्या अनुयायांतील परस्परविरोध, असंतोष, दुरावा वेळीच नष्ट करावा लागतो. समूह सुसंघटित राहण्यासाठी, अनुयायांचे सहकार्य मिळविण्यासाठी नेत्यांना प्रसंगी कठोर होऊन नियंत्रण ठेवावे लागते.

(६) शिक्षा व पारितोषिके यांचा पुरस्कर्ता : समूहात चालणाऱ्या आंतरक्रियांवर नियंत्रण ठेवण्यासाठी नेत्याला शिक्षा व पारितोषिकांचा वापर करावा लागतो. अधिक जिद्दीने कार्य व्हावे यासाठी लायक व कुशल व्यक्तीची स्तुती करणे, त्यांचा गौरव करणे, त्यांची उच्च पदावर नेमणूक करणे किंवा उत्तेजनपर बक्षिसे देणे तसेच एखाद्या व्यक्तीकडे सोपविलेले कार्य पूर्ण झाले नाही किंवा बेशिस्त वर्तन करणे, नियमबाह्य वागणे अशा कारणांसाठी शिस्तभंगाची कारवाई करणे, बढती देण्यास अपात्र ठरविणे, समूहातून काढून टाकणे, वेळप्रसंगी कठोर शासन करणे इत्यादी स्वरूपात नेता शिक्षेचा वापर करतो.

(७) मध्यस्थ : नेता हा समूहात आदरणीय असल्याने त्याने मध्यस्थाचे व न्यायनिवाड्याचे कार्य करावे अशी अनुयायांची अपेक्षा असते. हे काम त्याला नि:पक्षपातीपणे करावे लागते. समूहात लहान गट-उपगट असतात. त्यांच्यातील स्पर्धा व मतभेद विकोपाला जाण्यापूर्वीच नेत्यानी दोन्ही पक्षांचे विचार शांतपणे ऐकून तटस्थ व नि:पक्षपातीपणे त्यांच्यातील मतभेद मिटवून समेट घडवून आणावा लागतो.

(८) आदर्शाचे प्रतीक : नेता आपल्या समूहाचे जिवंत प्रतीक असून आदर्शभूत मानला जातो. नेत्याचे चरित्र, नीतिमत्ता, धैर्य इत्यादी गुण आपल्यात विकसित व्हावे अशी अन्यायांची इच्छा असते. नेता अनुयायांचे स्फर्तिस्थान असल्याने सर्वांचे लक्ष त्याच्या कार्यावर व वर्तनावर केंद्रित झाले असते. आपल्या स्फुर्तिदायक विचारांनी समूहाला भारावणारा, विचाराची कार्यवाही करण्यासाठी समूहाला प्रेरणा देणारा, मार्गदर्शन करणारा व सहकार्याने कार्य पार पाडणारा नेता आदर्श मानला जातो. नेत्याकडून अपेक्षित आदर्शाचे उल्लंघन झाले तर मात्र नेत्याचे स्थान टिकून राहू शकत नाही.

नेतृत्व प्रकारानुसार व परिस्थितीनुसार निरनिराळ्या क्षेत्रात नेत्याचे निरनि तरी सर्वसाधारणपणे प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर असलेल्या नेत्याला इतर कार्याशिवाय करणे आवश्यक ठरते, तेव्हाच नेता यशस्वी होऊ शकतो.

**नेत्यांचे गुण :** नेत्याच्या कार्यस्वरूपावरून असे दिसून येते की, नेत्याचे अंगी काही असल्याशिवाय समूहाचे स्थैर्य टिकणार नाही व नेत्यालाही नेतृत्वाची जबाबदारी सांभाळता येणार नाही. परंतु नेतृत्व हे व्यक्तिसापेक्ष व परिस्थितिसापेक्ष असल्याने नेत्याच्या गुणांची यादी करणे सोपे नाही. सर्वसाधारणपणे नेत्याच्या असाव्या लागणाऱ्या आवश्यक अशा गुणांविषयी माहिती पुढीलप्रमाणे देता येईल :

(१) बुद्धिमत्ता : नेता हा त्याच्या अनुयायांपेक्षा अधिक बुद्धिवान असावा लागतो. समाजात समस्या निर्माण झाल्यावर त्या सोडविण्याकरिता नेत्याची आवश्यकता असते. बुद्धिवान व्यक्तीच समस्या सोडविण्यात पुढाकार घेतात. अलौकिक बुद्धिमत्तेच्या व्यक्ती राजकारणात न येता आपल्या क्षेत्रात तज्ज्ञ म्हणून काम करतात. उच्च दर्जाची बुद्धिमत्ता असली म्हणजेच नेतृत्व यशस्वी होते असे नाही, तर नेत्याच्या अनेक गुणांपैकी बुद्धिमत्ता हा एक गुणविशेष आहे.

(२) उपक्रमशीलता : समूहाच्या गरजा भागविण्यासाठी नेत्याला विविध उपक्रम योजावे लागतात. हे उपक्रम कार्यक्षमतेने यशस्वी करण्यासाठी सर्वांचे सहकार्य मिळविण्याचे प्रयत्न तो करीत असतो. नेत्याला आपला प्रभाव कायम ठेवण्यासाठी अनुयायांची कुवत, अभिरुची, महत्त्वाकांक्षा, उपलब्ध साधनसामुग्री यांचा विचार करून विविध उपक्रम आयोजित करावे लागतात. यासाठी नेत्याजवळ उपक्रमशीलता असावयास पाहिजे.

(३) दूरदृष्टी : भविष्यकाळाचा अंदाज घेण्यासाठी नेत्याच्या अंगी दूरदृष्टीपणा असणे अत्यंत आवश्यक आहे. भविष्यात येणाऱ्या अनुकूल किंवा प्रतिकूल प्रसंगाची आधीच जाणीव व्हावयास पाहिजे. त्यामुळे

भविष्यात मिळणाऱ्या यशाबद्दल त्याला आश्चर्य वाटत नाही, तसेच प्रतिकूल परिस्थितीशी सामना करण्याचे सामर्थ्य प्राप्त करण्याचा अवधी मिळून यश मिळविण्याचा प्रयत्न केला जातो.

(४) परिवर्तनशीलता : नेत्यामध्ये काळाबरोबर बदलण्याचे सामर्थ्य असण्यासाठी परिवर्तनशीलता असावी लागते. परंपरागत संस्कृती आणि नवीन विचारप्रणाली व मूल्ये यात समायोजन घडवून आणण्याचा गुण नेत्यामध्ये असणे आवश्यक आहे. काळाच्या गरजा व नवीन पिढीच्या अपेक्षा काय आहेत ? बदलत्या परिस्थितीचा कसा सामना करता येईल ? व जुन्या संस्कृतीचा त्यावर काय परिणाम होईल ? याचा नेत्याने सतत विचार करावयास पाहिजे. यासाठी त्याने आपले मन व विचार खुले, प्रवाही व मोकळे ठेवावे लागते.

(५) कल्पनाशक्ती : नेत्यामध्ये प्रभावी कल्पकता व प्रतिभा असावयास पाहिजे 'कल्पनाशक्तीच्या सहाय्याने समस्यांचा विस्तार, तीव्रता, दीर्घत्व याचा अचूक अंदाज येतो व त्याची उत्तरे शोधून काढण्यास मदत होते. प्रत्यक्ष अनुभवापेक्षा कल्पनाशक्तीची धाव नेहमी जास्त असते. जनतेच्या गरजा ओळखून त्याच्या पूर्ततेसाठी मार्ग शोधण्याकरिता कल्पनाशक्तीचा उपयोग होतो. कल्पकतेमुळे कार्यशक्तीचा अपव्यय न होता योग्य मार्गाचा अवलंब करणे अधिक सोपे जाते.

(६) चतुरस्र पांडित्य : नेत्याच्या ठिकाणी एका विशिष्ट क्षेत्रातील अत्याधिक नैपुण्य असण्यापेक्षा त्याची बुद्धी सर्वगामी व चतुरस्र असावी. त्याला अनेक शास्त्र, विद्या व कला याबद्दल माहिती असावी. एकाच विषयात प्रभुत्व असलेली माणसे बहुधा एकांगी असतात. बुद्धीची झेप व आवाका जितका जास्त असेल, तेवढे निरनिराळ्या क्षेत्रात विचार करण्याचे सामर्थ्य अधिक असते.

(७) निरोधन : नेत्यामध्ये निरोधनशक्ती असावी लागते. विशिष्ट ध्येयाप्रत जाऊन पोहचावयाचे असेल तर शक्ती व वेळेची बचत करून सर्व सामर्थ्य एकवटावे लागते. निरोधनाने नेत्याला आपले सामर्थ्य केंद्रित करता येते. उच्च ध्येयप्राप्तीकरिता संयम व निरोधन यांची फार आवश्यकता आहे. अमेरिकेचे अध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन नेहमी म्हणायचे की, “प्रतिभावान नेत्याला उत्तम चारित्र्याची आवश्यकता आहे व उत्तम चारित्र्य प्राप्त होण्यासाठी संयम व निरोधन आवश्यक आहे.”

(८) सहानुभूती : समूहाला सुसंघटित ठेवण्याकरिता नेत्याला सर्वांशी आपले संबंध जिव्हाळ्याचे, प्रेमाचे व आपुलकीचे ठेवावे लागतात. एखाद्या अनुयायाकडून चूक झाली तर त्याच्यावर दोषारोप करून कडक शिक्षा देण्याऐवजी त्याची समजूत घालून चूक निदर्शनास आणून द्यावी. नेता समूहापैकीच एक असला तरी इतरांपेक्षा प्रभावी व श्रेष्ठ असतो व अशा श्रेष्ठाकडून अनुयायांची सहानुभूती, मार्गदर्शन, सहृदयता यांची अपेक्षा असते.

(९) जबाबदारीची जाणीव : नेता कुशल संघटक व प्रशासक असला तरी त्याला आपल्या जबाबदारीची पूर्णपणे जाणीव असावयास पाहिजे. कार्याची योजना आखल्यावर त्याचे स्वरूप पाहून कार्यविभागणी करावी लागते व योग्य अशा अनुयायाकडे विशिष्ट कार्य सोपवावे लागते. कार्यविभागणी केली असली तरी कार्याची अंतिम जबाबदारी नेत्याचीच असते. अनुयायाची चूक झाली तरी जो त्याची जबाबदारी स्वीकारतो, तोच खरा नेता होय.

(१०) आत्मविश्वास : नेत्यामध्ये आत्मविश्वास असणे हा महत्त्वाचा गुण समजला जातो. विशिष्ट ध्येयाची स्पष्ट कल्पना, ते कसे गाठता येईल याचे मार्ग व त्याकरिता लागणारे श्रम व प्रयत्न याविषयी जितकी तयारी जास्त असेल तितका जास्त आत्मविश्वास नेत्याला अधिक वाटेल व अनुयायांमध्ये आत्मविश्वास निर्माण होईल.

याशिवाय नेत्यामध्ये वक्तृत्व, प्रभुत्व, चिकाटी, आशावादीपणा, प्रसंगावधान, विनोदबुद्धी, धैर्य, स्पष्टवक्तेपणा, सभ्यता, प्रामाणिकपणा, सत्यता इत्यादी व इतर सद्गुण आवश्यक आहेत.

**नेत्यांचे ग्रामीण विकासात महत्व** : ग्रामीण नेत्यांचा विकास कार्याचे ध्येय धोरण ठरविणे, योजना आखणे व त्या कार्यान्वित करणे याकरता उपयोग होतो. स्थानिक नेत्यांचा ग्रामीण विकास कार्यात कसा उपयोग होऊ शकतो हे खालील मुद्द्यांवरुन स्पष्ट होईल.

1) गटाच्या प्रयत्नांचा समन्वय साधून निश्चित केलेले ध्येय साध्य करणे.
2) गटामध्ये निरोगी सामाजिक वातावरण निर्माण करणे.
3) गटाला एकत्र आणून विकास कार्यासाठी संघटीत करणे.
4) विस्तार यंत्रणेमार्फत आलेले संदेश गावकऱ्यांपर्यंत पोचविण्यास मदत करणे.
5) विस्तार कार्यकर्त्यांना विकास कार्यक्रमाचे नियोजन व अमंलबजावणी करण्यास मदत करणे.
6) नवाचारांचा प्रसार करण्याकरता स्वतः नवाचार प्रथम अंगिकार करणे.
7) गटात व गटागटात सौदाहाऱ्यांचे वातावरण निर्माण करणे.
8) गटाचा प्रवक्ता म्हणून प्रतिनिधीत्व करणे.
9) गटाला शास्त्रीय पद्धतीने चांगला निर्णय घेण्यास मदत करणे.
10) एकमेकांच्या अनुभवातून शिकण्याकरता गटातील सभासदांना उद्युक्त करणे.
11) गटामध्ये त्यांचे प्रश्न सोडविण्याकरता आत्मविश्वास निर्माण करणे.
12) अनुयायांकरता स्वतःचा आदर्श निर्माण करणे.
13) गटामध्ये निरनिराळे विकास कार्यक्रम सुरु करण्याकरता अनुकूल वातावरण निर्माण करणे.
14) ग्रामीण क्षेत्रातील संस्थांना संघटित करुन त्यांच्यामार्फत विकास कार्यक्रम घेणे.
15) अनुनायांना त्यांच्या गरजा ओळखण्यास व त्या पूर्ण करण्याकरता मदत करणे.

विकास कार्य करत असतांना स्थानिक राजकारण, गटबाजी व संघर्ष करण्याचे प्रसंग ग्रामीण नेत्यांवर येतील. या प्रसंगाना तोंड देवन गटाला/गावाला विकासाच्या दिशेने नेण्यातच ग्रामीण नेत्याचे कौशल्य आहे. आपल्या प्रयत्नावर जर नेत्याची श्रद्धा असेल तर तो या अडचणींवर मात करेल व गटाला यशोशिखराकडे नेण्यामध्ये यशस्वी होईल.

## कृषी विज्ञान केंद्र (के.व्ही.के. / KVK) Farm Science Centre

शिक्षण आयोगाच्या (१९६४-६६) शिफारशीनुसार तसेच शिक्षण मंत्रालय, कृषी मंत्रालय आणि योजना आयोग यांच्या निर्देशानुसार भारतीय कृषी संशोधन परिषदेद्वारा १९७३ मध्ये डॉ. मोहन सिंग मेहता यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली. त्या समितीने कृषी विज्ञान केंद्र स्थापन करण्याची सूचना केली. अशाप्रकारे समितीच्या सकारात्मक निर्णयानंतर १९७४ मध्ये पॉन्डेचेरी येथे देशातील प्रथम कृषी विज्ञान केंद्राची स्थापना तामिळनाडू कृषी विद्यापीठ, कोईम्बतूर यांच्या प्रशासकीय नियंत्रणात करण्यात आली.

कृषी विज्ञान केंद्र अर्थात के.व्ही.के. एक असे ज्ञान केंद्र आहे की जेथे शेतकरी शेतीशी संबंधित नवनवीन माहिती घेतो आणि आपल्या समस्यांचे समाधान करतो. थोडक्यात के.व्ही.के. हे शेतकरी, वैज्ञानिक, शोधकर्ता, विद्यार्थी यांना कृषी क्षेत्रातील व्यावहारिक आणि आधारभूत माहिती उपलब्ध करून देते. भारतीय कृषी संशोधन परिषद (Indian Council of Agricultural Research - ICAR ), नवी दिल्ली आणि शेतकरी यांच्या मध्ये शेतीशी संबंधित माहितीचे संप्रेषण तसेच नवीन तंत्रज्ञानाची माहिती व त्याचे आदानप्रदान करण्याचे के.व्ही.के. हे एक महत्वपूर्ण मध्यम आहे तसेच कृषी विस्तार आणि विकासाचा आधारस्तंभ आहे.

प्रशासकीय नियंत्रणाच्या दृष्टिकोणातून कृषी विज्ञान केंद्र हे भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या विविध संस्था, राज्य कृषी विद्यापीठ, केंद्रीय कृषी विद्यापीठ, अभिमत विद्यापीठ, स्वयंसेवी संस्था, राज्यातील कृषी विभाग व सार्वजनिक क्षेत्रातील संस्था यांच्या अंतर्गत कार्य करणार. प्रत्येक जिल्ह्याकरिता एक के.व्ही.के. स्थापन करण्याची योजना आहे. के.व्ही.के. हे भारतीय कृषी संशोधन पद्धतीचा एक महत्वाचा भाग आहे ज्याचा उद्देश म्हणजे कृषी व कृषी पूरक उद्योगामध्ये मूल्यमापन, परिष्करण आणि प्रात्यक्षिक याद्वारे स्थानिक परिस्थितीला समायोजित तंत्रज्ञानाचे मूल्यमापन करणे हा होय. अशाप्रकारे ज्ञान व कृषी तंत्रज्ञानाचे संसाधन केंद्र म्हणून के.व्ही.के. कार्य करेल.

प्रसाद, चौधरी व नायर (१९८७) यांच्यानुसार कृषी विज्ञान केंद्राची रचना शेतकरी, ग्रामस्तरावरील विस्तार कार्यकर्ते आणि स्वयंरोजगार करण्यास इच्छुक व्यक्ती यांना गरजेवर आधारित व कौशल्यावर आधारित प्रशिक्षण देण्याकरिता करण्यात आली आहे.

**कृषी विज्ञान केंद्राचे उद्देश :**

कृषी विज्ञान केंद्राचा मुख्य उद्देश म्हणजे कृषीक्षेत्रात भरीव अशी उत्पादन वृध्दी आणण्याकरिता बळकट प्रशिक्षण सहाय्य प्रदान करणे हा होय तसेच विशिष्ट उद्देश पुढीलप्रमाणे आहेत.

1. विशेषतः शेतकऱ्यांच्या प्रशिक्षण गरजा ओळखून स्रोत यादी तयार करण्यासाठी कार्यक्षेत्राच्या सर्वेक्षणाचे नियोजन व अंमलबजावणी करणे
2. जिल्हयाकरिता प्रशिक्षण कार्यक्रम व विस्तार कार्यक्रमांमध्ये उपयोगात आणलेल्या महत्वपूर्ण अशा सर्व संबंधित शिफारशी किंवा पिक पध्दती यांचे एकत्रीकरण करणे
3. वेगवेगळ्या लक्ष्य गटांकरिता (target groups) विशेषतः गरीब आणि दुर्बल घटकांकरिता गाव तसेच कृषी विज्ञान केंद्र अशा दोन्ही ठिकाणी उत्पादनावर आधारीत व गरजेवर आधारीत अल्प आणि दीर्घ कालावधीच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचे नियोजन व अमलबजावणी करणे
4. कृषी व संबंधित शास्त्र तसेच शास्त्रोक्त शेतीविषयी युवा पिढीमध्ये आवड आणि रुची वाढविण्याबाबत ग्रामीण भागातील शाळा व गाव अशा दोन्ही ठिकाणी पर्यवेक्षी प्रकल्पांतर्गत शेती विज्ञान मंडळ स्थापन करणे
5. प्रशिक्षणार्थ्यांना कार्यानुभव देणे तसेच नवीन तांत्रिक माहिती प्रसारित करण्याकरिता शास्त्रोक्त पद्धतीवर आधारित प्रक्षेत्र आणि प्रात्यक्षिक क्षेत्र विकसित व व्यवस्थापन करणे
6. उच्चमाध्यमिक शाळेच्या कृषी कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमाच्या शिक्षक व विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करून देणे
7. ग्रामीण भागातील अशिक्षित आणि शाळाबाहय व्यक्तीकरिता काही सामान्य शिक्षण प्रदान करणे कि जेणेकरून ते फक्त चांगले शेतकरीच नाही तर उत्तम नागरिकसुद्धा बनतील

ग्रामीण भागातील लोकांना गृहपाक कला आणि पोषण आहार शिक्षणाबाबत प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देणे व संबंधित संघटनांच्या सहयोगातून एकात्मिक ग्रामीण विकासाची गरज लक्षात घेऊन हळूहळू इतर महत्वाचे क्षेत्र जसे गृहउद्योग व कुटीर उद्योग यांचा समावेश करणे.

**कृषी विज्ञान केंद्राचे कार्ये :**

- वेगवेगळ्या पिक पध्दती अंतर्गत कृषी तंत्रज्ञानाची स्थानिक योग्यता तपासण्यासाठी प्रक्षेत्र चाचणी घेणे
- तंत्रज्ञानाची उत्पादन क्षमता निश्चित करण्यासाठी शेतकऱ्यांच्या शेतावर प्रथम रेषीय प्रात्यक्षिक आयोजित करणे
- शेतकरी आणि विस्तार कार्यकर्त्यांचे कौशल्य विकसित करण्यासाठी आधुनिक कृषी तंत्रज्ञानावर आधारीत त्यांचे ज्ञान व कौशल्य अद्ययावत करणे
- जिल्हयाची कृषी अर्थव्यवस्था सुधारण्यामध्ये तसेच सार्वजनिक, खाजगी आणि स्वयंसेवी क्षेत्राच्या पुढाकाराला सहाय्यभूत ठरण्याच्या दृष्टिकोणातून कृषी तंत्रज्ञानाचे माहिती व स्रोत केंद्र म्हणून कार्य करणे
- शेतकऱ्यांच्या आवडीनुसार विविध विषयांवर आधारित माहिती संप्रेषण तंत्रज्ञान आणि इतर माध्यमांचा वापर करून कृषी सल्ला देणे

कृषी विज्ञान केंद्राची रचना

